म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २०५५

आव्हान

REFBK-0009780

विश्वसाहित्य प्रकाशन

1242
लेखांक
८५०००
१६३।८१
2044

विश्वसाहित्य : ३०

आव्हान

राजा राम ग्रंथालय, गव. ग्रंथालय
क्रमांक ८५००० किं. निर्लेख
वर्ष २०४५ दि. १६।३।८१

लेखक :

ॲण्डर हेलर

अनुवादक :

व्यंकटेश वकील

REFBK-0009780

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४.

मूल्य २ रुपये

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, ३९३ सी,
शिवाजी रोड, कोल्हापूर.

प्रकाशक :
वि. ग. परचुरे,
ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर,
गोरेगांवकर चाळ क्र. २, मुंबई ४.

आवृत्ति पहिली
१९५८

Henry Regnery Co., 1957

अनुक्रम

पृष्ठ

प्रकरण पहिलें : कामगिरी १–६

प्रकरण दुसरें : स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध ७–४२

मंगळवार, २३ ऑक्टोबर १९५६ ... ८
बुधवार, २४ ऑक्टोबर ... १६
गुरुवार, २५ ऑक्टोबर ... २०
शुक्रवार, २६ ऑक्टोबर ... २२
शनिवार, २७ ऑक्टोबर ... २८
रविवार, २८ ऑक्टोबर ... ३१
सोमवार, २९ ऑक्टोबर ... ३५
मंगळवार, ३० ऑक्टोबर ... ३८
बुधवार, ३१ ऑक्टोबर ... ४१

प्रकरण तिसरें : क्रांतीकडे जाणारा मार्ग ४३–९९

कम्युनिझमच्या वर्चस्वाखालील जीवन ... ४३
कामगार ... ४५
शेतमजूर ... ५८
घरांचा प्रश्न ... ६५
शिक्षण ... ६९
कुटुंब-परिवार ... ७६
धर्म ... ७७
खेळ-क्रीडा ... ७९
पोलिस ... ८२
प्रचार ... ८४

प्रकरण चौथें : तहकूब झालेला विजय १००–११६

चार दिवसांचें स्वातंत्र्य ...१०१
रशियनांचें पुनरागमन ...१०७
हंगेरी स्वतंत्र होईलच ! ...११३

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, ३९३ सी,
शिवाजी रोड, कोल्हापूर.

प्रकाशक :
वि. ग. परचुरे,
ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर,
गोरेगांवकर चाळ क्र. २, मुंबअी ४.

आवृत्ति पहिली
१९५८

Henry Regnery Co., 1957

अनुक्रम

पृष्ठ

प्रकरण पहिलें : कामगिरी १–६

प्रकरण दुसरें : स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध ७–४२

मंगळवार, २३ ऑक्टोबर १९५६ ... ८
बुधवार, २४ ऑक्टोबर ... १६
गुरुवार, २५ ऑक्टोबर ... २०
शुक्रवार, २६ ऑक्टोबर ... २२
शनिवार, २७ ऑक्टोबर ... २८
रविवार, २८ ऑक्टोबर ... ३१
सोमवार, २९ ऑक्टोबर ... ३५
मंगळवार, ३० ऑक्टोबर ... ३८
बुधवार, ३१ ऑक्टोबर ... ४१

प्रकरण तिसरें : क्रांतीकडे जाणारा मार्ग ४३–९९

कम्युनिझमच्या वर्चस्वाखालील जीवन ... ४३
कामगार ... ४५
शेतमजूर ... ५८
घरांचा प्रश्न ... ६५
शिक्षण ... ६९
कुटुंब-परिवार ... ७६
धर्म ... ७७
खेळ-क्रीडा ... ७९
पोलिस ... ८२
प्रचार ... ८४

प्रकरण चौथें : तहकूब झालेला विजय १००–११६

चार दिवसांचें स्वातंत्र्य ...१०१
रशियनांचें पुनरागमन ...१०७
हंगेरी स्वतंत्र होईलच ! ...११३

वसंतदादा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र
क्रमांक ६५००० दिः निबंध
दाखल २०५५ दिः २९/३/०१

प्रकरण पहिलें

कामगिरी

हंगेरींतील अधिकृत वृत्त-वितरक संस्था–'अेम्. टी. आय.'कडे ३० ऑक्टोबर १९५६ ला सकाळीं दोन तारा पोंचत्या करण्यांत आल्या. मी याच संस्थेकडे छायाचित्रें घेण्याच्या कामावर नोकरीला होतों. त्या तारा लंडन आणि पॅरिस येथील वृत्तसंस्थांकडून आलेल्या होत्या. हंगेरीच्या स्वातंत्र्यासाठीं एका आठवड्याआधीं भडकलेल्या क्रांतीच्या रण-कुंडाचीं छायाचित्रें पाठविण्याबद्दल 'अेम्. टी. आय.'ला त्या दोहोंतून अगत्याची विनवणी केलेली होती.

त्या खात्याचीं सूत्रें हातीं असणाऱ्या सनातन कम्युनिस्ट विचारसरणीच्या बाईनें त्या तारा आपल्या सकंपित हातीं धरलेल्या होत्या. उरल्यासुरल्या रशियनांच्या विरुद्ध लढाईचा नेट निकराचा करण्यासाठीं टॅनाक्स बोले-व्हार्डच्या रोखानें धडधडत जाणाऱ्या, स्वतंत्रतेच्या लढवय्यांच्या–नव्या राष्ट्रीय फौजेच्या ताब्यांतील, रणगाड्यांचा आवाज आतां तिच्या कानीं पडत होता.

आमच्या कॉम्रेड प्रमुखानें–कदाचित् घाबरगुंडी उडाल्यानें असेल, नाहीं तर देशभक्त विजयी झाले कीं श्रेय आपल्याला लाटण्यासाठीं असेल– माझ्याकडे वळून म्हटलें, "लंडनला कांहीं चित्रें पाठवितां आलीं असतीं, तर मला तें हवेंच आहे. परंतु सध्यां दुर्दैवानं बाहेर टपालच जात नाहीं."

त्याच दिवशीं सकाळीं 'अेम्. टी. आय.' च्या सेवकवर्गानें देशांतील सर्वत्र कारखाने आणि दुकानें यांच्यांतल्या कामगारांच्या पावलांवर पाऊल टाकून आपलें एक क्रांतिकारी कार्यकारी मंडळ निवडलें. अध्यक्षपदीं माझी निवड झाली. आमच्या स्वतंत्रतेच्या क्रांतियुद्धाचीं छायाचित्रें बाहेरच्या स्वतंत्र जगाच्या हातीं कशीं पडतील, यासंबंधीं आम्हीं आगाऊच चर्चा केली होती. रशियनांच्या कचाटींतून आमची मातृभूमि मुक्त करण्यासाठीं आमच्या राष्ट्रानें केलेल्या लढ्याबद्दल जगांतल्या जनतेला माहिती व्हावी अशी देखील आमची इच्छा होती. त्याचप्रमाणें लाल फौजा आणि रशियाच्या 'अेम्. व्ही. डी.' च्या कित्त्याबरहुकूम बनविण्यांत आलेलें निर्घृण सरकारी सुरक्षा पोलिसदल 'अे. व्ही. एच्.', यांच्या गुन्हेगारीविषयीं सत्य हकीगत-सुद्धां जगाच्या कानीं पडावी, अशी आमची मनीषा होती. तत्क्षणीं पश्चिमेकडील जगाशीं आमचे टपाली संबंध तुटून अडथळे उत्पन्न झाल्याच्या वस्तुस्थितीनें आमची कुचंबणा झालेली होती.

त्या कारणानें मींच तीं चित्रें स्वतः स्वतंत्र जगांत घेऊन जावींत, अशी सूचना मीं पुढें मांडली.

मी कांहीं कम्युनिस्ट नव्हतों, परंतु धंदेवाईक छायाचित्रकार या नात्यानें तरबेज झाल्यामुळें मला 'अेम्. टी. आय.' कडे नोकरीचें जमवून घेतां आलें होतें. ऑक्टोबरच्या २३ ला स्वतंत्रतेच्या क्रांतीचें रणकुंड पेटल्या-पासून मी अहोरात्र घडलेल्या प्रसंगांचीं छायाचित्रें घेत बुडापेस्टच्या रस्तोरस्तीं हिंडत होतों. माझ्याकडे तीनशें चित्रांच्या मूळ प्रती (निगेटिव्ह) होत्या, आणि त्या प्रती प्रथम व्हिएन्नाला व तेथून स्वतंत्र जगांतल्या प्रत्येक देशाला नेण्याचा मीं दृढ निर्धार केलेला होता.

दुसरे दिवशीं, ऑक्टोबर ३१ ला, मी परराष्ट्र मंत्र्याच्या कचेरींत गेलों. कचेरीच्या कारभारावर एका क्रांतिकारी समितीचें नियंत्रण होतें. तेथें मीं

माझा बेत समजावून सांगितला आणि सोबत न्यावयाच्या चित्रांपैकीं कांहीं त्यांना दाखविलीं. माझ्या बालमित्रांपैकीं एकजण समितीचा सदस्य होता, त्यानें माझी ग्वाही दिली.

परराष्ट्रांत राजकीय कामगिरीवर जाणारांसाठीं देण्यांत येणारें 'प्रवास-परिपत्र' (डिप्लोमॅटिक पासपोर्ट) मला देण्यांत आलें. हंगेरीच्या क्रांतिकारक सरकारचा तो पहिल्या क्रमांकाचा 'पासपोर्ट' होता. "हंगेरीच्या स्वतंत्रतेच्या क्रांतियुद्धाविषयींचें सत्य जगांतल्या जनतेला निवेदन करण्यासाठीं शक्य त्या मार्गांचा अवलंब करणें," ही कामगिरी माझ्यावर सोंपविण्यांत आली होती. व्हिएन्नामधल्या हंगेरीच्या दूतनिवासांत होणाऱ्या घडामोडींवर नजर ठेवून त्यांच्यासंबंधीं टेलिफोनवरून खबर देण्याबद्दल देखील मला सूचना देण्यांत आली.

मी मंत्रणालयाबाहेर पडलों, तेव्हां रशियन रणगाडे बुडापेस्ट सोडून जातांना दिसत होते. अजून रणधुमाळी संपली नव्हती, तरीदेखील प्रत्येकजण उल्लसित होता. आपण एक जंगी विजय मिळविला आणि आतां रशियनांच्या दडपणाखालील कम्युनिस्ट राजवटीचा अंत झाल्यासारखा आहे, असें आम्हांला वाटत होतें.

दुपारची वेळ होती, तरी पण तोफखान्यांची गोलंदाजी कानीं पडतच होती. मी ऑस्ट्रियाच्या दूतनिवासमध्यें माझा 'प्रवेश-परवाना' (व्हिसा) घेण्यासाठीं गेलों. मी मोटारनें व्हिएन्नाला जाणार असल्याचें तेथील अधिकाऱ्यांना कळलें, तेव्हां त्यांनीं मला आपल्याबरोबर एका ऑस्ट्रियन मुलीला घेऊन जाण्याबद्दल विनंति केली. मीं ती मान्य केली आणि आम्ही तासाभरानें निघूं असें सांगितलें.

दुसरी एक स्त्री आमचें संभाषण ऐकत तेथें बसलेली होती. तिनें रडायला सुरुवात केली आणि मला विचारलें, "तुम्ही मला देखील न्याल का?" व्हिएन्नाला निसटून जाण्याच्या आणि तेथून आपल्या आई-वडिलांकडे पोहोंचण्याच्या आशेनें ती रुमानियांतल्या तेमेस्वारहून आलेली होती. त्यांना इस्त्रायलमध्यें देशांतर करण्याची परवानगी मिळालेली होती,

परंतु रुमानियांतल्या कम्युनिस्ट सरकारनें तिला त्यांच्याबरोबर जाण्यासाठीं 'पासपोर्ट' (प्रवास–परिपत्र) देण्याचें नाकारलें. तिच्याजवळ 'प्रवास-परिपत्र' नसल्यामुळें ऑस्ट्रियन वकिलातींत तिला प्रवेश-परवाना मिळूं शकत नव्हता. परंतु तिचा कंठ निराशेनें भरलेला होता आणि मीं तिला नेण्याचें आश्वासन दिलें.

आपलीं छायाचित्रें नेण्यासाठीं लागणारी चामड्याची लहान पेटी (ब्रीफ् केस) घ्यायला मी घाईनें घरीं परतलों; तीनचार दिवसांनीं घरीं परतण्याच्या बोलीनें घरच्या माणसांचा निरोप घेतला. हातावर तुरी देऊन निसटणाऱ्या दोन स्त्रियांना सोबत घेऊन मी १९४७ सालीं बनविलेल्या ऑस्टिन मोटारींतून व्हिएन्नाला निघालों.

रस्त्यांतून बरीच वाहतूक होती. स्वतंत्र जगानें पाठविलेल्या औषधी आणि खाद्यवस्तु आणण्यासाठीं सरहद्दीकडे जाणारे मालवाहतुकीचे मोटार-गाडे विपुल होते; परंतु गाडींत अत्यंत बिकट मौन होतें. मागच्या बैठकींत दाटीवाटीनें बसलेल्या त्या दोघी स्त्रिया लांब अंतरावर होत असलेल्या तोफखान्यांचा गडगडाट ऐकत होत्या.

कोमारोम शहराबाहेर पडल्याबरोबर आमच्या गाडीवर रशियन सैनिकांनीं गोळीबार केला. सुदैवानें त्यांचे नेम हुकले आणि त्यांचा मार गाडीच्या मागच्या फलकावर (फेंडर) बसला. सरहद्दीच्या अर्ध्या वाटेवर गियोर शहरीं 'स्वातंत्र्यसैनिकां'नीं आम्हांला रोखून आमचीं ओळखपत्रें मागितलीं. मी त्यांना माझा नवा 'राजकारणी प्रवास परवाना' दाखवून, त्यांना माझी कामगिरी सांगितली, तेव्हां त्यांनीं तात्काळ मला रस्ता मोकळा करून दिला. ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर जाऊन पोहोंचण्यापूर्वीं सातापेक्षां अधिक वेळां 'स्वातंत्र्यसैनिकां'नीं आम्हांला अडविलें होतें. त्या विभागांतून रशियनांची आणि 'अे. व्ही. अेच्.' हस्तकांची हकालपट्टी झाली, हें उघडच दिसत होतें; निदान आम्हांला तरी त्यांपैकीं कुणाचें नांवनिशाण तेथें आढळलें नाहीं.

त्याच रात्रीं (ऑक्टोबर ३१ ला) आम्ही व्हिएन्नाला पोहोंचलों. माझ्या उतारूंना सोडून मी तडक हंगेरीच्या वकिलातींत गेलों आणि माझी

ओळख पटवून दिली. माझ्या आगमनामुळें राजदूत आणि त्याचा सबंध नोकरवर्ग अस्वस्थ झाले होते. आतां हंगेरियन राष्ट्रभक्तांच्या सत्तेखालीं आमचा देश आल्याचें आणि कम्युनिस्ट व त्यांचे साथीदार हे सरकारी हुद्याच्या जागा लवकरच गमावणार असल्याचें त्यांना कळून चुकलें होतें.

शनिवारीं नोव्हेंबर तीनला मी व्हिएन्नामधल्या दूतनिवासांतून बुडापेस्टच्या परराष्ट्रीय मंत्रणालयाशीं थेट संबंध जोडून टेलिफोन केला. चित्रांचें वितरण करण्यासंबंधीं केलेली व्यवस्था, आणि आमच्या स्वातंत्र्य-युद्धाशीं व राष्ट्रीय स्वातंत्र्याशीं संबंध असलेल्या इतर गोष्टी यांच्याबद्दल मीं माझा अहवाल सादर केला. राजदूतनिवासांत मला जी परिस्थिति दिसली, तिच्याबद्दल देखील मीं संपूर्ण वृत्तांत सादर केला. मी आणखी थोडे दिवस व्हिएन्नांत आपले कान आणि डोळे उघडे ठेवून राहावें, असें मला सांगण्यांत आलें.

सगळ्या जगाला माहीत आहे कीं नोव्हेंबर चारला भल्या पहाटेच्या प्रहरीं लाल फौजांनीं तोफखाना, पायदळ आणि शेंकडों रणगाडे यांच्यासह बुडापेस्टवर चढाई केली. या नव्या स्वारीच्या प्रतिकारार्थ हंगेरियन स्वतंत्रतेचे लढवय्ये आणि संपूर्ण नगरी जणुं एका व्यक्तीप्रमाणें उठली. कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील रशियनांची सगळी कल्पनातीत निर्घृणता हंगेरीच्या जनतेला चिरडूं लागली. बाह्य जगाशीं असलेलें संपूर्ण दळण-वळण तुटून गेलें.

अशा प्रकारें स्वतंत्र जगांत करावयाच्या माझ्या कामगिरीला होतें त्यापेक्षांहि अधिक आवश्यक महत्त्व प्राप्त झालें. आमच्या स्वतंत्रतेच्या क्रांतियुद्धाची कहाणी स्वतंत्र जगाच्या कानीं घालण्यासाठीं आणि तें कसें घडून आलें हें सांगण्यासाठीं मला स्वतंत्र जगांत राहिलेंच पाहिजे. हंगेरीच्या राष्ट्राचा लढा स्पष्ट समजावून सांगण्याचा आणि रशियाचा कम्युनिझम प्रत्येक राष्ट्राचें व जगांतील सर्व जनतेचें स्वातंत्र्य आणि स्वायत्तता यांना कसा धाक घालीत आहे, याचा धोक्याचा इषारा सगळ्या जनतेला देण्याचा प्रयत्न मला केलाच पाहिजे.

नंतर थोड्याच दिवसांनीं अमेरिकेच्या सीनेटनें (कायदेमंडळानें) नेमलेल्या एका समितीपुढें आमची कहाणी निवेदन करण्यासाठीं मी अमेरिकेला यायला निघालों. अजून हंगेरींतच असलेली माझी पत्नी आणि बाळ, यांच्या प्राणांवर संकट येऊं नये म्हणून मी मुखवटा घालून 'अर्पद हजाफी' या नांवानें साक्ष दिली. नंतर त्यांना अमेरिकेंत आश्रय मिळाल्यामुळें स्वतंत्र जगाला माझ्या कामगिरीचें स्वरूप आणि माझा स्वतःचा खरा परिचय प्रगटपणें करून देतां येणें शक्य झालें आहे.

मानवी स्वातंत्र्याप्रीत्यर्थ हंगेरींत प्राणार्पण करणाऱ्या सर्व वयांच्या आणि जीवनांतल्या प्रत्येक परिस्थितीमधील सकल शूरवीरांना, आणि सध्यां आपल्या शस्त्रसामर्थ्याच्या व दहशतीच्या बळावर माझा देश बळकावून बसलेल्या रशियन कम्युनिस्टांवर भविष्यकाळांत अंतीं विजय मिळविणाऱ्या हंगेरी राष्ट्राच्या अजिंक्य चैतन्याला हें पुस्तक अर्पण करण्यांत येत आहे.

प्रकरण दुसरें

स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध

हंगेरींत प्रथम मिणमिणत असलेलें आणि नंतर, रशियन रणगाडे आणि पलटणी यांच्या प्रचंड जमावामुळें दबून–विझून नव्हे–जाण्यापूर्वीं भडकून पेट घेणारें स्वातंत्र्य कम्युनिझमच्या राखेमधून वर येतांना मीं पाहिलेलें आहे.

ज्या स्वातंत्र्याबद्दल केवळ इतरांच्याकडून ऐकायला मिळालें म्हणून किंवा स्वतःच्या अंतःकरणाची साक्ष पटली म्हणून, त्याच्यासाठीं, कम्युनिस्ट आणि रशियन नियंत्रणांखालील जीवनाव्यतिरिक्त अन्य कशाचीहि जाणीव नसणारे, तरुण विद्यार्थी मरतांना मीं पाहिलेले आहेत.

कम्युनिझमच्या दडपणाखालीं आपल्या निराशामय अस्तित्वांत सहनशीलतेच्या मर्यादेचा अतिक्रम झाल्यामुळें, प्राणपणानें आमच्या देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं आपलीं अवजारें खालीं ठेवणारे आणि शस्त्रें हातीं घेणारे कामगार मीं पाहिलेले आहेत.

रशियन रणगाडा उडवून लावणारी एक चौदा वर्षांची बालिका आणि रशियन तोफांच्या तोंडांपुढें चालत जाणाऱ्या अनेक आजीबाई मीं पाहिलेल्या आहेत.

कम्युनिझमच्या विरुद्ध यशस्वी झालेल्या इतिहासामधल्या पहिल्या उठावांत सबंध राष्ट्र–वृद्ध आणि तरुण, पुरुष आणि स्त्रिया, कलाकार, इंजिनियर आणि डॉक्टर, कारकून, किसान आणि कारखान्यांतले कामगार–एका रात्रींत शूरवीर बनल्याचें मीं पाहिलेलें आहे.

मीं हंगेरीचें स्वातंत्र्ययुद्ध माझ्या स्वतःच्या नेत्रांनीं आणि माझ्या कॅमेऱ्याच्या डोळ्यानें बघून घेतलें आहे.

मंगळवार, २३ ऑक्टोबर १९५६

कोणत्याहि हंगेरियनाला या दिवसाचा विसर पडणार नाहीं.

काल विद्यार्थ्यांनीं विश्वविद्यालयांत सभा घेतल्या. तिसऱ्या प्रहरीं त्यांनीं पोल लोकांची स्वतंत्र राजवट आणि मॉस्कोपासून अधिक स्वाधीनता, या मागणीला सहानुभूति दर्शविण्यासाठीं पोलिश वकिलातीपुढें मूक निदर्शन केलें.

कम्युनिस्ट पक्ष चिटणीस अर्नो गेरो याच्या आज्ञेवरून वर्तमानपत्रांनीं आणि आकाशवाणीनें त्याचा एका वाक्यानेंदेखील उल्लेख करण्याचें टाळलें; तरीहि तिसऱ्या प्रहरीं दान्युब नदीच्या पूर्वेकडील कांठावरल्या पेटोफी चौकामधील स्मारकापुढें विद्यार्थ्यांचें एक निदर्शन होणार असल्याचें आम्हां सर्वांना माहीत आहे (पेटोफी हा हंगेरीच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांतील एकोणिसाव्या शतकांतला सुप्रसिद्ध कवि होता). थंडी आणि दाट धुकें असून देखील पहाटेच्या प्रहरीं रस्त्यांतून विद्यार्थी कवायत करीत आणि गात गात जमत आहेत. विश्वविद्यालयांतील आपापल्या वर्गांत कुणीच गेलेले नाहींत. आमच्या देशावरील कम्युनिस्ट सत्तेच्या एका दशकानंतर आम्हीं आमच्या पद्धतीनें आमच्या भावना अन्तःस्फूर्तीनें प्रगट करीत आहोंत–असें कांहीं करायला कम्युनिस्ट राजवटींत परवानगी नसते.

आतांपर्यंत आम्हीं केवळ आपल्या स्वतःच्या कुटुंबीजनांपुढेंच–आणि त्यादेखील प्रत्येक कुटुंबांत नव्हे–ज्या घोषणा उच्चारण्याचें धैर्य कधींकाळीं करीत असूं, त्या घोषणांचे फलक विद्यार्थ्यांच्या हातांत आहेत. त्या घोषणा अशा आहेत :—

रशियनांनो, चाल्ते व्हा !
आमचा हंगेरी स्वतंत्र होवो !
खेंचा राकोसीला न्यायालयांत !
आम्हांला हवें, नेतृत्व नवें !
पोलिश जनतेला आमची साथ !
इम्रे नागीवर आमचा विश्वास,–
आणा इम्रे नागी सरकार !

बुडापेस्टच्या भिंतीभिंतीवर रात्रीच्या वेळीं विद्यार्थ्यांनीं पत्रकें चिकटवलेलीं आहेत. युनिव्हर्सिट्यांमधून झालेल्या प्रक्षुब्ध सभांमधून मान्य करण्यांत आलेल्या चौदा मागण्या अशा आहेत—

(१) हंगेरींतून सर्व सोवियट लष्कर काढून घ्यावें.

(२) हंगेरीच्या अंतर्गत कारभारांत हस्तक्षेप न करतां, सोवियट युनियनबरोबर त्याला संपूर्ण आर्थिक आणि राजकीय समानता मिळावी.

(३) हंगेरीचे व्यापारी करार प्रसिद्ध करण्यांत यावेत आणि सोवियट युनियनला हंगेरीनें द्यावयाच्या नुकसानभरपाईविषयीं अहवाल जाहीर करावा.

(४) हंगेरीचे युरेनियमचे सांठे, त्यांचा अयोग्य स्वार्थी वापर आणि रशियाला दिलेल्या सवलती यांविषयीं माहिती द्यावी.

(५) हंगेरियन कम्युनिस्ट पक्षाची परिषद नवे नेते निवडण्यासाठीं भरविण्यांत यावी.

(६) * इम्रे नागीला पंतप्रधान नेमून राज्यकारभाराची पुनर्घटना करावी.

---

*इम्रे नागीला एप्रिल १९५५ मध्यें कम्युनिस्ट पक्षांतून–'मार्क्सविरोधी राष्ट्रीय प्रवृत्ति आणि उजव्या मवाळ गटाकडे झुकणारा'–या आरोपांवरून बडतर्फ करण्यांत आलें होतें. हंगेरीला मॉस्कोपासून बहुतेक अंशीं स्वतंत्र ठेवण्यांत यावें, त्याला राजकीय स्वतंत्रता असावी आणि त्याला आपल्या राहणीच मान वाढविण्यासाठीं आपलें स्वतंत्र आर्थिक धोरण ठेवतां यावें, अशा मतांचा तो होता. त्याला ऑगष्ट १९५६ मध्यें पुन्हां पक्षांत प्रवेश देण्यांत आला.

(७) मिहाली फर्कास आणि मात्यास राकोसी यांची जाहीर न्यायालयीन चौकशी करावी.

[जुलै १९५६ पर्यंत फर्कास हा संरक्षणमंत्री असून राकोसी हा पक्षाचा चिटणीस होता; दोघांनाहि बदनाम स्टॅलिनवादी म्हणून हांकून देण्यांत आलें होतें.]

(८) एक बहुपक्षीय सार्वजनिक निवडणूक गुप्त पद्धतीनें घेण्यांत यावी.

(९) हंगेरीच्या प्रत्यक्ष सांठ्याच्या आधारावर हंगेरीच्या अर्थव्यवस्थेची पुनर्घटना करण्यांत यावी.

(१०) कामगारांच्या उत्पादनाच्या हिस्सेरशीची फेर आकारणी करण्यांत येऊन, त्यांचा संपावर जाण्याचा हक्क मान्य व्हावा.

(११) शेतकीच्या सक्तीच्या हिस्सेरशीच्या पद्धतीची फेर तपासणी करण्यांत यावी.

(१२) व्यक्तिगत शेती करणारे आणि सहकारी शेतीचे सदस्य यांना समान हक्क असावेत.

(१३) हंगेरीचे परंपरागत राष्ट्रचिन्ह, आणि परंपरागत हंगेरियन लष्करी गणवेष, यांचें पुनरुज्जीवन करण्यांत यावें.

[कम्युनिस्ट राजवटींत हंगेरियन लष्कराला रशियन पद्धतीचा गणवेष चापरावा लागत होता.]

(१४) स्टॅलिनच्या प्रचंड पुतळ्याचा विध्वंस करण्यांत यावा.

[नंतर एक १५ वी, आणि त्याहीनंतर एक १६ वी मागणी जोडण्यांत आली : (१५) पोलंडच्या राष्ट्रीय चळवळीशीं एकरूपता दर्शविण्यांत यावी. (१६) 'अे. व्ही. अेच्.'चें विसर्जन करण्यांत यावें.]

दरम्यान सकाळीं अंतर्गत खात्याच्या मंत्रणालयानें 'आगामी सूचनेपर्यंत' सर्व सार्वजनिक सभा आणि निदर्शनें यांच्यावर बंदी घातल्याची बातमी आकाशवाणीवरून जाहीर होते, आणि विद्यार्थ्यांचीं निदर्शनें भरवितां येणार नाहींत, असें विश्वविद्यालयांना कळविण्यांत येतें. त्याच क्षणीं विद्यार्थी निर्णय घेतात कीं रशियनांच्या नियंत्रणाखालील हंगेरियन

गुप्तपोलिस दलाच्या–'अे. व्ही. अेच्. 'च्या–धाकापेक्षां स्वतंत्रतेची आकांक्षा अधिक श्रेष्ठ आहे, सभा घेण्यांत येईल.

राकोसी सरकारनें ज्याची मुस्कटदाबी, त्यानें केलेल्या जाहीर टीकांच्यामुळें, केलेली होती, तो कम्युनिस्ट कवि पीटर कुक्का विद्यार्थ्यांच्या वतीनें उत्तर देतो आणि सांगतो, कीं ठरल्याप्रमाणें तीन वाजतां दुपारीं निदर्शन करण्यांत येईल. अंतर्गत खात्याचा मंत्री आपल्या अधिकाराची उघड अवहेलना टाळण्यासाठीं दुपारीं दोन वाजतां माघार घेतो. 'टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी'त जमलेल्या सहस्रावधि विद्यार्थ्यांना तो निरोप पाठवितो कीं सरकारनें निदर्शन करण्याची 'परवानगी देण्याचा' निर्णय घेतलेला आहे. मात्र विद्यार्थ्यांना 'अतिरेका'विरुद्ध आणि 'सरकारवर टीका करण्या'-विरुद्ध तो इषारा देतो.

हंगेरीची वृत्त-वितरक संस्था–अेम्. टी. आय्.–हिचा प्रतिनिधि या नात्यानें मी सकाळपासून माझा कॅमेरा घेऊन रस्तोरस्तीं हिंडत आहें. तिसऱ्या प्रहरीं जरा लवकरच मी दान्युब नदीच्या उजव्या कांठावर नगराच्या पेस्ट भागांत पेटोफी चौकांत आणि बोलेव्हार्ड वस्तुसंग्रहालयापुढें जमलेल्या विद्यार्थ्यांच्या गर्दींत मिसळतों.

आम्ही पेटोफी स्मारकाकडे कांहीं अंतर चालून जातों, तोंच दर मिनिटागणिक आमच्या घोळक्याचा विस्तार वाढूं लागतो. अधिकाधिक विद्यार्थी आमच्यांत सामील होतात, आणि मग रस्त्याच्या कडेनें चालणारे कांहीं बघे लोक, आम्हांला हात हालवून प्रोत्साहित करून, आमच्या रांगांत दाखलसुद्धां व्हायला प्रारंभ करतात.

तीन वाजतां दुपारीं पेटोफी स्मारकापुढें आम्ही २५,००० लोक जमलेलों आहोंत. इम्रे सिंकोव्हिट हा तरुण नट ओजस्वी शलींत 'नेमझेटी दल' (राष्ट्रगीत), सांदोर पेटोफीचें हंगेरीचें स्तोत्र आणि आमच्या १८४८ मधील स्वातंत्र्याचें क्रांतिगीत गात असतांना आम्ही अश्रू ढाळीत आहोंत. डोळ्यांत आंसवें आणून आम्ही सिंकोव्हिटबरोबर पुनःपुन्हा पालुपद आळवूं लागतों—

"इस्कुस्झंक, इस्कुस्झंक, होगी रॅबोक टोव्हाब्ब नेम लेस्झंक"

["आम्हीं वाहतों आण, आम्ही वाहतों प्राण
यापुढतीं आम्ही नसूं गुलाम "]

विद्यार्थ्यांचे कंठस्वर भावनांनीं गद्गद झालेले आहेत. दृष्टिपथांत कुठेंहि पोलिस शिपाई किंवा कम्युनिस्ट अधिकारी दिसत नाहीं. स्वयं-प्रेरणेनेंच तरुण सुव्यवस्था राखीत आहेत.

पेटोफी स्मारकापुढलें हृदयस्पर्शी आणि शांततामय निदर्शन समाप्त होतें, परंतु मुक्त अभिव्यक्तीच्या अशा अनभ्यस्त आस्वादानें आमची पुरेशी तृप्ति झालेली नाहीं. खांद्याला खांदा लावून सहाजण असे आम्ही रांगांनीं दान्युबवरला 'सांखळी पूल' (चेन ब्रिज) पार करून बुडा-मध्यें–नगराच्या डाव्या भागांत–चालून येतों. आम्ही जोसेफ बेमच्या पुतळ्याकडे पुढें जाऊं लागतों. या पोलिश सेनानीनें १८४८ मध्यें हॅप्सबर्ग राज्यकर्त्यांच्या विरुद्ध आणि नंतर सरतेशेवटीं, त्याआधींच्या बंडाळीला चिरडून टाकणाऱ्या रशियन पलटणींच्या विरुद्ध देखील, हंगेरियन देशभक्तांच्या लष्कराचें नेतृत्व केलेलें होतें.

आम्ही बेम पुतळ्याजवळ जाऊन पोहोंचेपर्यंत आमचा जमाव ६०,००० पर्यंत फुगतो. कुणीतरी एकजण हंगेरियन राष्ट्रध्वज हिरावून घेतो आणि त्याच्या मध्यभागीं कम्युनिस्टांनीं रोवलेला तिरस्कृत असा हातोडा आणि कोयता कापून काढतो.

एकामागून एक असे शुद्धीकृत ध्वज प्रगट होतात. एकाएकीं कुणाला तरी कम्युनिस्ट चिन्हाच्या ऐवजीं जुनें कोस्सुथचें मानचिन्ह लावण्याची आठवण होते. (लाजोस–लुई कोस्सुथ हा १८४८ च्या क्रांतीमधला थोर हंगेरियन शूरवीर होता.)

आम्हीं स्वातंत्र्याचें नवें निशाण निर्माण केलें आहे!

दरम्यान स्झोझातचें 'राष्ट्राला आवाहन' आणि 'हंगेरीची राष्ट्रीय प्रार्थना,'–जिचें ध्रुवपद,–'माग्याराला ठेव सुखी' असें आहे, ती गाऊं लागतों. त्या दोन्हींवर कम्युनिस्ट राजवटींत बंदी घालण्यांत आलेली होती.

आमची पुरेशी तृप्ति होत नाहीं. फेरेन्क बेस्सेनेयि हा नट पुन्हां राष्ट्रगीत म्हणतो आणि पाठोपाठ पुन्हां एकदां 'राष्ट्राला आवाहन' गाऊं लागतो.

हंगेरियन लेखक संघाचा प्रमुख पीटर व्हेरे हा दूरध्वनिक्षेपकांनीं सुसज्ज अशा गाडीच्या टपावर उडी मारतो. हंगेरीच्या लेखकांनीं अधिक स्वातंत्र्यासाठीं केलेल्या मागण्या तो वाचून दाखवितो. त्यांतल्या बहुतेक विद्यार्थ्यांच्या चौदा कलमी मागण्यांप्रमाणेंच आहेत.

दिवस मावळत आहे. आम्ही पार्लमेंट भवनाकडे चालून जाण्यास सुरुवात करतों. जमाव शांत असून पद्धतशीर शिस्तीच्या रांगांत पुढें जात आहे. आम्ही हंगेरीचा नवा ध्वज घेऊन जात आहोंत.

आम्ही चालत असतांना आपल्या कामावरून सुटलेले कामगार आमच्यांत सामील होतात. आम्ही कोस्सुथ लाजोस चौकांत येऊन पोहोंचेपर्यंत आमची संख्या पार्लमेंट भवनापुढें १,५०,००० तरी होते. चौकांत सर्व वाहतूक अडते.

अजूनहि जमाव शिस्तींत असला तरी तो इम्रे नागी याच्या दर्शनाची मागणी करीत आहे–लोकांना ज्याच्याबद्दल कांहींतरी आपुलकी वाटते, असा तो एकच प्रमुख कम्युनिस्ट आहे.

एकाएकीं सायंप्रकाशांत पार्लमेंट भवनाच्या कळसावरील–आमच्या देशावरील मॉस्कोच्या प्रभुत्वाचें प्रतीक असलेला–लाल तारा प्रकाशित होतो. जमाव गर्जना करूं लागतो, "लाल तारा मालवून टाका!"–आणि जसा एकाएकीं प्रकाश आला, तसाच तो पुन्हां नाहींसा होतो.

भवनाच्या पुढील सज्जावरून एक क्षीण दुबळा आवाज आम्हांला ऐकायला येतो : "आम्हांला वीस मिनिटं अवधि द्या. कॉम्रेड नागी येत आहेत आणि दूरध्वनिक्षेपक बसवणें सुरू आहे."

अंधार अधिक दाट्टूं लागतो. जमावांत दूरध्वनिक्षेपक यंत्रें असलेल्या किती तरी गाड्या आहेत, परंतु त्यांतलीं माणसें आमचे मित्र आहेत कीं कम्युनिस्ट आहेत याची खात्री आम्हांला नाहीं, म्हणून आम्ही त्यांना भाषण करूं देत नाहीं.

वीस मिनिटें संपून जातात आणि एक मासलेवाईक कम्युनिस्ट लबाडी करण्यांत येते. अभिवचन दिल्याप्रमाणें नागीचे दर्शनाऐवजीं, जरी त्याच्या

योगानें सर्व कांहीं शांत होऊं शकलें असतें तरी, कोस्सुथ चौकांतील रस्त्यावरील दिवे आकस्मिक मालवण्यांत येतात. दीड लक्ष लोक काळोखांत जुटीनें उभे आहेत.

एकाएकीं प्रत्येकजण वर्तमानपत्राची दिवटी पेटवितो. एक आश्चर्यकारक दृश्य दिसूं लागतें–पार्लमेंट भवनापुढील चौकांत अशा दशसहस्र दिवट्या पाजळलेल्या दिसूं लागतात.

नागी अजूनहि दिसत नाहीं आणि आम्ही अधीर होऊं लागतों. "चला, स्टालिन चौकाकडे जाऊं," कुणी तरी ओरडतो,–"आतां गीतें गायचीं नाहींत. स्टालिनचा पुतळा ओढून काढूं."

परंतु शेवटीं इम्रे नागी सज्जांत प्रगट होतो. "कॉम्रेड!"–तो बोलूं लागतो, परंतु जमाव गर्जना करून त्याला अडथळा आणतो : "आपण सारे हंगेरियन आहोंत! कॉम्रेड नष्ट झाले आहेत!"

आम्ही ज्याच्यावर पूर्वी विश्वासून होतों, त्या नागीविषयीं आतां जमाव उदासीन आहे. एक तर त्याला दोन तास उशीर होतो. नंतर तो आम्हांला 'कॉम्रेड' या तिरस्कृत कम्युनिस्ट संज्ञेनें संबोधन करतो. कुणी तरी म्हणतो, "आपण इम्रे नागीवर प्रकाश पाडूं या," आणि तीन प्रकाश झोत तो बोलत असतांना त्याच्या मुद्रेवर तळपत होते.

विद्यार्थी आणि कामगार यांच्या मागण्या न्याय्य आहेत, असें सांगून इकडे नागी आम्हांला शांत करीत आहे, तोंच दुसरा एक आवाज बुडापेस्ट आकाशवाणीवर बोलत आहे. हा आवाज सबंध हंगेरी राष्ट्राला ज्याचा तिरस्कार वाटत आहे त्या माणसाचा, हंगेरियन कम्युनिस्ट पक्षाचा चिटणीस आणि वरिष्ठ, अर्नो गेरो याचा आहे. गेरो म्हणतो कीं, "वैभवशाली सोवियट युनियन" बरोबरचे आपले "निकटचे आणि मैत्रीचे बंध" हंगेरी सैल करूं पाहत असल्याची कोणतीहि अफवा "धादांत असत्य असून, ती खरेपणाचा लवलेशहि नसलेली व शत्रुभाव दर्शविणारी एक शिवी" आहे. तो निदर्शनाला 'फॅसिस्ट घातपात' आणि विद्यार्थ्यांना 'दंगेखोर फॅसिस्ट आणि दरोडेखोरांची टोळी' असें संबोधितो.

गेरोच्या आकाशवाणीवरील भाषणाची बातमी जमावांत पसरते. आम्हांला संताप येतो. ज्या क्षणीं नागी आम्हांला उद्देशून बोलत आहे, त्या क्षणींच हा हंगेरीचा कम्युनिस्ट सर्वसत्ताधीश नागीचें म्हणणें खोडून काढीत आहे.

जमाव आणखी अधिक वाढत आहे आणि आम्ही स्टॅलिनच्या पुतळ्याकडे निघालों आहोंत. आतां निदर्शनाचा विस्तार इतका वाढला आहे कीं तें एकाच वेळीं तीन जागीं–पार्लमेंट भवन, स्टॅलिन चौक आणि बुडापेस्ट आकाशवाणी भवन–येथें चालू आहे. स्टॅलिन चौकांत जमाव ट्रॅक्टर (मोटार खटारे) व दोर यांच्या साधनांनीं स्टॅलिनचा प्रचंड पुतळा उलथून पाडण्याचा प्रयत्न करीत आहे, तर आकाशवाणी भवनापुढें जमावाचा कांहीं हिस्सा आकाशवाणीवर देशभक्तांना भाषण करण्याच्या हक्काची मागणी करायला गेलेला आहे.

स्टॅलिन चौकाकडे निघालेल्या जमावाबरोबर मी जातों. कांहीं कामगारांनी गॅसच्या दिवट्या मिळवलेल्या आहेत. ते आणि विद्यार्थी हुकूमशहाची पंचवीस फुटी धातूची आकृति कापून खालीं ओढण्याच्या प्रयत्नांत आहेत. जमावाच्या कडेला पहिलेवहिले रशियन रणगाडे प्रगटतात, परंतु त्या क्षणीं ते केवळ प्रेक्षक आहेत. स्टॅलिनच्या पुतळ्याला बांधलेल्या तारा जमाव जोरानें ओढूं लागतो. पुतळा पुढें झुकतो, तरीदेखील बुटांच्या पकडीनें अजून तो स्थिर आहे,–आम्हांला तें प्रतीकात्मक वाटतें. आतां ट्रॅक्टरच्या योगानें तारा ओढण्यांत येतात, आणि हातीं दिवट्या असलेलीं माणसें उत्कंठातिरेकानें कामाला लागलेलीं आहेत. पुतळा अजूनहि अखंड असला तरी गुडघ्याजवळ तो वांकूं लागतो. लोक आनंद व्यक्त करतात.

अशा आनंदाच्या जल्लोषांत असतांनाच आमच्या कानीं अशुभ वार्ता पडते,–बुडापेस्ट आकाशवाणीपुढें गोळीबार झाला आहे. आम्ही 'ट्रक'-मधून आकाशवाणी भवनाकडे निघतों. दोइस्सा गिआर्गि स्ट्रीटवरून आम्ही मागें पाहतों, तेव्हां स्टॅलिनचा पुतळा गुडघ्यांजवळ भंगून, कडाडून गडगडत भुईवर आदळल्याचें आम्हांला दिसतें.

आम्ही जेव्हां अलेक्झांडर ब्रॉडी स्ट्रीटवरील कम्युनिस्ट नियंत्रित

आकाशवाणी भवनाकडे जातों, तेव्हां आम्हांला प्रत्यक्ष काय घडलें तें कळतें. आकाशवाणीवर आपल्या 'चौदा मागण्या' ध्वनिक्षेपित करण्यांत याव्यात, यासाठीं युवकांच्या एका शिष्टमंडळानें दारांत शिरण्याचा प्रयत्न केला होता. इमारतीचें संरक्षण करणाऱ्या संरक्षक पोलिसांनीं ताकीद न देतां त्यांच्यावर अश्रुधुराचे बॉंबगोळे टाकले.

एकाएकीं चहूंबाजूंनीं जमावावर गोळीबार होतो. सुरक्षा पोलिस–'अे. व्ही. अेच्.'–जमावावर गोळीबार करीत आहेत. कांहीं मिनिटांच्या अवधींत रस्तोरस्तीं मृतांचा आणि घायाळांचा सडा पडूं लागतो. 'अे. व्ही. अेच्.'नें केलेल्या हल्ल्याची वार्ता पसरते. सर्वत्र बुडापेस्टभर कामगार आणि विद्यार्थी घृणास्पद 'अे. व्ही. अेच्.'बरोबर लढूं लागलेले आहेत.

युवक आणि कामगार यांच्या शांततामय निदर्शनांचें स्वरूप कम्युनिस्टांच्या बंदुकांनीं पालटून त्याचें राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं होणाऱ्या क्रांतियुद्धांत परिवर्तन केलेलें आहे.

बुधवार, २४ ऑक्टोबर

बुडापेस्टच्या मध्यभागापासून पंधरा मिनिटांच्या अंतरावर बाहेर, ज्या स्झेकेस्फेहरवर शहराचा उपयोग चढाईचा रशियन लष्करी तळ म्हणून उपयोग करण्यांत येत आहे, त्याच्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कोपऱ्यावर आमचा 'फ्लॅट'–(राहत्या खोल्या) आहेत. ऑक्टोबर २३–२४ च्या रात्रभर माझी पत्नी आणि मी आम्हांला परिचित असलेल्या खणखणाटानें जागे होत आहोंत : स्झेकेस्फेहरवरकडून येणारे रशियन रणगाडे आणि चिलखती गाड्या आमच्या कोपऱ्यावरून बुडापेस्टच्या मध्यभागाकडे जात आहेत.

रस्ता खूपच निसरडा आहे, आणि कांहीं वाहनें कोपऱ्यावर वळण घेतांना भलतीकडे घसरूं लागत आहेत. सकाळीं आम्ही बाहेर पाहतों, आणि एका रणगाड्यानें दिवाबत्तीचे तीन खांब मोडून तोडून टाकल्याचें आम्हांला दिसतें.

आम्हांला समजतें कीं रात्रभर विशेषतः आकाशवाणी भवन, राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, किलियन बराकी यांच्या भोंवतालीं आणि मुख्यतः कामगार वस्ती असणाऱ्या नगराच्या आठव्या व नवव्या विभागांत निकराचें युद्ध जुंपलें आहे.

आम्ही ऐकतों कीं उजाडलें तेव्हां देशभक्त फौजांच्या स्वातंत्र्यसैनिकांनीं आकाशवाणी भवनांत मुसंडी मारलेली आहे. परंतु आकाशवाणीच्या साधनसोयी मात्र अजून अर्नो गेरो आणि 'अे. व्ही. अेच्.' यांच्या ताब्यांत आहेत; खडकांमधील तळघरांतल्या आश्रयस्थानीं असलेले 'साहाय्यक स्टुडिओ' वापरण्यांत येतात हें स्पष्ट आहे.

बुडापेस्ट आकाशवाणीवरून गेरोच्या आज्ञेनें खोट्या थापा ध्वनिक्षेपित करण्यांत येतात. पण नगराच्या रस्त्यांवरून एक दृष्टिक्षेप टाकल्यास त्या खंडन करतां येतात : "प्रतिगामी वृत्तीच्या फॅसिस्टांनीं आमच्या सार्वजनिक इमारतींवर शस्त्रसज्ज होऊन हल्ले केलेले आहेत आणि आमच्या सशस्त्र फौजांवर चढाई केली आहे...प्रतिक्रांतिकारक टोळ्यांनीं रात्रीच्या वेळीं केलेल्या भेंकड सशस्त्र हल्ल्यांमुळें अत्यंत गंभीर परिस्थिति निर्माण केलेली आहे. लुटारू गुंडांनीं आमच्या सार्वजनिक इमारती आणि कारखाने यांच्यांत शिरकाव करून घेतला आहे..." चला, या ध्वनिक्षेपणांवरून आम्हांला अप्रत्यक्ष रीत्या असें समजतें कीं हंगेरियन देशभक्तांनीं आणि स्वातंत्र्यसैनिकांनीं कांहीं तशी अगदींच कमी कामगिरी बजावलेली नाहीं.

नंतर आणखी एक मासलेवाईक कम्युनिस्ट लबाडी सकाळीं सात वाजतां बुडापेस्ट आकाशवाणीवरून घोषित होते कीं नवें सरकार नुकतेंच स्थापन करण्यांत आलें असून इम्रे नागी पंतप्रधान झालेला आहे. आम्हीं आमची दुसरी मागणी प्राप्त करून घेतली आहे! (स्टॅलिनचा पुतळा उलथून पाडणें, ही पहिली होती!) नंतर आठ वाजतां आकाशवाणीवर घोषणा होते,–"या अशा भ्याड रक्तपाती हल्ल्यांचा बंदोबस्त करण्याची उपाययोजना सरकारला करतां न आल्यामुळें, वार्सा कराराच्या अटीअन्वयें हंगेरीत तळ देऊन बसलेल्या सोव्हियट सशस्त्र फौजांकडे मदतीची याचना करण्यांत आलेली आहे." या दोन ध्वनिक्षेपित घोषणांच्या अनुक्रमामुळें

आम्हां बहुतेकांना असें वाटतें कीं जणुं काय इम्रे नागी यानेंच सोव्हियट हस्तक्षेपांची विनंति केली होती. अर्थातच मला माहीत आहे कीं मीं ज्या रणगाड्यांचा आवाज ऐकला, ते काल रात्रीं कितीतरी लवकर, नागीला सरकारांत कोणतेंहि पद प्राप्त होण्यापूर्वीच, आणि निदर्शनें अजूनहि जेव्हां शांततामय होतीं तेव्हांच, बुडापेस्टला रवाना झाले असले पाहिजेत. पक्ष-चिटणीसपदीं अजून चिकटून बसलेल्या अर्नो गेरोनें ही दुसरी फसवेगिरी केली आहे!

रात्रीच्या समयीं कितीतरी रशियन रणगाडे खुद्द नगरांत येऊन थडकले आहेत आणि आम्हीं काल स्टॅलिन चौकांत पाहिलेल्या रणगाड्यांच्याबरोबर त्यांची सांखळी जुळविण्यांत आलेली आहे. परंतु आज सकाळीं आम्ही जेव्हां एकत्र जमतों—कारण त्या क्षणाला गोळीबार शांत झालेला होता—त्या वेळीं त्यांतले कांहीं आमच्या स्वातंत्र्यसैनिकांनीं आधींच हस्तगत केलेले आम्हांला दिसून येतात. ते त्यांच्यावर हंगेरीचे नवे राष्ट्रध्वज लावीत आहेत आणि मग कोस्सुथ लाजोस चौकाकडे आणि पार्लमेंट भवनाकडे पुढें जात आहेत.

मी चौकाकडे पुढें घाईनें जातों, आणि तेथें दुपारीं पोंचतों. एक भयाण निराश दृश्य तेथें माझ्या दृष्टीला पडतें. घायाळ आणि मरणोन्मुख शरीरांनीं तो खुला चौक व्यापून गेलेला आहे. धसका बसलेले, घाबरलेले, परंतु प्राण बचावलेले लोक जें जें घडलेलें आहे, त्याची हकीगत आम्हांला सांगत आहेत.

कांहीं मिनिटांपूर्वीं सहस्रावधि निःशस्त्र कामगार आणि विद्यार्थी सरकारला एक अर्ज सादर करण्यासाठीं पार्लमेंट भवनापुढील चौकांत शांत-पणानें एकत्र जमलेले होते. कांहीं थोडे रशियन रणगाडे निष्काळजीपणानें कडांच्या भोंवताल ठेवण्यांत आले. चौकाच्या विरुद्ध बाजूला असलेल्या शेतकी खात्याच्या मंत्रणालय भवनाच्या छपरांवर ठाणें देऊन बसलेल्या 'ॲ. व्ही. ॲच्.' दलानें एकाएकीं पाठमोऱ्या जमावावर गोळीबार केला. रशियनांना गोळीबार कुठून होत आहे, याची स्पष्ट खात्री नसल्यामुळें त्यांनीं आपल्या रणगाड्यांमधून चौकांत गोळीबार करायला प्रारंभ केला.

फरसबंदीवर निदान सहाशें लोक तरी जखमी किंवा ठार होऊन पडलेले असावेत, असा अंदाज आहे. माझा सोळा वर्षें वयाचा मदतनीस पीटर गार्डोस तेथें छायाचित्रें घेण्यासाठीं गेला असतांना ठार झालेला होता.

आतां प्रक्षुब्ध झालेले कामगार, त्याचप्रमाणें विद्यार्थी शस्त्रें मिळविण्यास प्रारंभ करतात. कांहीं शस्त्रास्त्रें किलियन आणि बेम बराकींतील हंगेरियन सैनिकांकडून वांटण्यांत येत आहेत; कांहीं दान्युबमधल्या क्सेपेल बेटावरील मात्यास राकोसी या प्रचंड कारखान्यांतून आणि दानुव्हिया दारूगोळयांच्या कारखान्यांमधून कामगारांनीं आणलेलीं आहेत. कम्युनिस्ट ज्याची ओळख आम्हांला कंदिलांचा कारखाना म्हणून करून देत, परंतु वास्तविक जेथें कम्युनिस्ट फौजांसाठीं युद्धसाहित्य तयार होत असल्याचें आम्हांला माहीत होतें, त्या कारखान्यामधून इतर शस्त्रसामुग्री आली आहे.

तिसऱ्या प्रहरापर्यंत त्वरेनें संघटित झालेल्या देशभक्त स्वातंत्र्य-सैनिकांच्या तुकड्या, लाल फौजांच्या पलटणी, रणगाडे आणि चिलखती गाड्या व 'अे. व्ही. एच्. 'वाले यांना सर्वत्र नगरभर तोंड देत आहेत. आम्हांला "ऑटोमॅटिक पिस्तुलें, तोफा, स्फोटक हातगोळे, आणि इतर शस्त्रांनीं सुसज्ज असलेले लढणारे गट" असें संबोधून, अधिकृत आकाशवाणी-वरून आमचा होणारा धिक्कार, आम्हांला प्रोत्साहित करीत आहे.

आकाशवाणीवरून गेरो आणि त्याचे तोंडपुजे रशियन पलटणीच्या उपयोगाचें समर्थन करीत आहेत, आणि म्हणत आहेत कीं हंगेरीनें 'आमचे मित्र आणि मदतनीस यांचें स्वागत प्रेमभरानें' केलेंच पाहिजे. संचारबंदी, आणि हंगेरींत सर्वत्र आणीबाणीची परिस्थिति लष्करी कायद्यासकट जाहीर करण्यांत येते. "बंड केल्याचा किंवा शस्त्रें बाळगल्याचा" अपराध ज्या व्यक्तींच्या हातून घडल्याचें शाबीत होईल, त्यांना देहांताची शिक्षा देण्याचा अधिकार असलेलीं खास न्यायालयें एक फर्मान काढून स्थापन करण्यांत येतात.

सोवियट उपपंतप्रधान मिकोयान आणि अंकित राष्ट्रांसंबंधीं क्रेमलिनचा तज्ज्ञ मिखेल सुस्लाव हे पुन्हां सत्ता प्रस्थापित करण्यासाठीं आलेले आहेत, अशी अफवा प्रसृत होते. कम्युनिस्ट आकाशवाणी, जरा नंतरच्या ध्वनि-

क्षेपणानें, आणखी एक फसवणूक करण्याचा प्रयत्न करते... "अधिकाधिक कारखान्यांतून काम सुरू होतें...रस्त्यावरील मोटारगाड्यांची वाहतूक पुन्हां चालूं,...आतां पुढील रक्तपात मूर्खपणाचा आहे. सरकारनें परिस्थिति कह्यांत आणलेली आहे, शक्य त्या अनेक ठिकाणीं—कारखान्यांतून, उद्योगधंद्यांतून आणि दुकानांतून—शांततामय आणि विधायक कामें चालूं द्या."

घरीं परत येतांना मला वॉर्टत राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय रशियन रणगाड्याच्या गोलंदाजीनें पेटून जळत असलेलें दिसत आहे. सेंट स्टीफन रस्त्याच्या कोपऱ्याला रशियनांनीं खून केलेल्या तिघा निःशस्त्र निदर्शकांच्या प्रेतांवर जवळ जवळ मी पाय देतों. त्यांच्या चिलखती गाड्यांनीं आणि रणगाड्यांनीं उल्लोइ रस्त्यावरलें एक बालकांचें रुग्णालय उडवून लावलें आहे.

गुरुवार, २५ ऑक्टोबर

सरकार गोंधळून गेलें आहे. एका घटकेला तें संचारबंदी जारी करतें आणि प्रत्येकाला रस्त्यावर न हिंडण्याबद्दल आणि आपापल्या घरांत बंद दारांना कड्याकुलुपें लावून बसण्याबद्दल ताकीद देत आहे, तर दुसऱ्या तासाला तें प्रत्येकाला आपापल्या कामावर जाण्याविषयीं आर्जव करीत आहे.

वस्तुतः झालें आहे असें, कीं एक सार्वत्रिक हरताळ पडतो आणि अखंडित चालूं राहतो. कारखाने आणि जवळ जवळ प्रत्येक कचेरी ओस पडलेली आहे. शाळा बंद आहेत. रस्त्यांतील वाहनें जागच्या जागीं उभीं आहेत. वीज आणि प्रकाशोपयोगी वस्तु यांची खूपच नासधूस झालेली आहे.

जे लढाई चालूं ठेवतील किंवा शस्त्रें देखील बाळगतील, त्यांना देहांत शासन देण्याचा सरकारी धाक आकाशवाणीवर ध्वनिक्षेपित करणें सुरूच आहे. परंतु सरकारची सत्ता संपुष्टांत येत आहे. आज मी अनेक हंगेरियन सैनिकांना आपल्या टोप्यांवरील कम्युनिस्ट बिल्ले तोडून फेंकतांना आणि बंड ठरणाऱ्या निदर्शनांत सामील होतांना पाहिलेलें आहे. आम्ही ऐकतों कीं हंगेरीच्या लष्करांतील सहस्रावधि सैनिक स्वातंत्र्यसैनिकांच्या

पथकांत सामील होत आहेत आणि शस्त्रें आणि दारूगोळा त्यांच्या हवालीं करीत आहेत.

किलियन झल्कामेट बराकीवरून जातांना सैनिक खिडक्यांमधून बाहेरच्या नागरी लोकांना बंदुका आणि दारूगोळा देत असल्याचें मला दिसतें. बुडापेस्टमध्यें सर्वत्र स्वातंत्र्यसैनिक इमारतींवरील लाल ताऱ्यांची मोडतोड करतात आणि लाल निशाणें जाळून टाकतात. त्यांनीं 'स्झाबाद नेप' या कम्युनिस्ट पक्षाच्या अधिकृत वृत्तपत्राच्या इमारतीचा ताबा घेतला आहे आणि तिच्या कळसावरला प्रचंड लाल तारा नेस्तनाबूद केला आहे.

कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयांतून निघालेल्या पत्रकाच्या आकाशवाणी-वरील वृत्तांतानें प्रत्येकाला उल्हास वाटत आहे : "केंद्रीय समितीनें कॉम्रेड अर्नो गेरो ह्याला वरिष्ठ चिटणिसाच्या हुद्यावरून मुक्त केलें आहे. केंद्रीय समितीनें वरिष्ठ चिटणीस म्हणून जानोस कादर याची नेमणूक केली." तिरस्कृत झालेल्या गेरोची हकालपट्टी झाली तर! राज्कबरोबर अटक झालेला आणि तुरुंगवास भोगलेला व स्टॅलिनविरोधी असल्याचा लौकिक मिळविलेला कादर त्याच्या जागीं येणार आहे.

इम्रे नागी हा आकाशवाणीवरील एका भाषणांत, पार्लमेंट भरविण्याचें आणि 'सर्वव्यापी व मूलभूत कार्यक्रम असलेली सुधारणा सादर करण्याचें' अभिवचन देतो. 'हंगेरींत ठेवण्यांत आलेलें सोवियट लष्कर काढून घेण्या-संबंधीं' सोवियट युनियनबरोबर सरकार बोलणें सुरू करील, असें तो म्हणतो. "हीं बोलणीं कम्युनिस्ट पक्ष आणि समाजवादी देश यांच्यामध्यें समता आणि राष्ट्रीय स्वाधीनता यांना पाया ठरवून करण्यांत येतील." परंतु बुडापेस्टच्या रस्त्यांतून लढणाऱ्यांना हे शब्दप्रयोग निरर्थक वाटतात.

रात्रीं उशिरां आम्हांला निष्ठावंत हंगेरियनांच्या ताब्यांत आलेल्या पहिल्या आकाशवाणी केंद्रावरून ध्वनिक्षेपित झालेली पहिली घोषणा मिस्कोल्क या प्रांतिक शहरांतून ऐकायला येते. "बुडापेस्टमधल्या हंगेरियनांची कत्तल थांबवा." घोषणा सुरू झाली,—"खोट्यानाट्या गोष्टींवर विश्वास ठेवूं नका. त्यांना हंगेरींतून सोवियट लष्कर मागें घेऊं द्या. संपावर जा!"

शुक्रवार, २६ ऑक्टोबर

अगदीं मध्यरात्रीनंतर मिस्कोल्क आकाशवाणीनें आपलें स्वातंत्र्य-विषयक ध्वनिक्षेपण सुरूच ठेवलें आहे. मिस्कोल्क आणि भोंवतालचा बोरसोद परगणा यांच्यांत रक्तहीन क्रांति यशस्वी झाल्याचें आम्हांला कळतें. कामगारांच्या कार्यमंडळांतून तयार केलेल्या संयुक्त 'राष्ट्रीय समिती'च्या हातीं सत्ता आहे. मिस्कोल्क आकाशवाणी घोषणा करते:—

"कामगारांना उद्देशून काढलेला आमचा मागण्यांचा जाहीरनामा पुढीलप्रमाणें पांच कलमी आहे:—

(१) सोवियट लष्करानें ताबडतोब देश सोडून चालतें व्हावें, (२) नवें हंगेरियन सरकार स्थापन करावें, (३) कामगारांना संप करण्याचा हक्क असावा, (४) क्रांतीच्या लढ्यांत भाग घेतलेल्या हंगेरियन लोकांना संपूर्ण क्षमादान मिळावें, (५) जोंपर्यंत या मागण्या पूर्ण होत नाहींत तोंपर्यंत बोरसोद परगणा आणि महा मिस्कोल्क मधील लोक आगगाड्या, खाणी, आरोग्यविषयक संस्था, सार्वजनिक पुरवठा, विद्युत्शक्तीचा पुरवठा आणि वर्तमानपत्रें हीं खातीं वगळून संपावर जातील...

"तरुण कामगारांनो आणि विद्यार्थ्यांनो, स्वत:च्या वर्तनांत शिस्त पाळा;...कसलेंहि प्रक्षोभाचें अथवा घातपाताचें कृत्य करूं नका;... रक्तपाताशिवाय आपल्या मागण्या मिळविण्याचें सामर्थ्य आपल्यांत आहे."

हें आतां स्पष्ट होत आहे कीं स्वातंत्र्याच्या लढ्यांत बुडापेस्ट संबंध देशाशीं संयुक्त झालें आहे! दक्षिणेकडे पेक्सला थोड्याशा लढ्यानंतर आकाशवाणी केंद्रदेखील ताब्यांत घेण्यांत आलें आहे, आणि क्रांति-कारकांच्या देखरेखीखालीं तेथें ध्वनिक्षेपण देखील सुरू झालें आहे. सगळ्या दक्षिण प्रदेशासाठीं पेक्स येथें क्रांतिकारकांचें सरकार स्थापन झाल्याची देखील एक बातमी आहे.

देशांत सर्वत्र क्रांतीचा प्रसार होत असल्याचें आमच्या कानीं येत आहे. टाटाबान्या, सालगोतार्जान, आणि गिओर येथें लढाई चालू आहे. आणि डेब्रेकेन, स्झोलनाक, आणि स्झेगेड येथें देखील थोडीफार लढत

चालल्याचें उघड आहे. मॅग्यारोवार आणि सीमाप्रदेशांतलें शहर हेग्येशालोम यांच्यामधला सगळा मुलुख आमच्या ताब्यांत आहे. बहुतेक खेडेविभागांत लढ्यावांचून क्रांति यशस्वी होत आहे, कारण तेथें कम्युनिस्ट राजवटीला पाठिंबा देणारा कुणीहि नसतो. कांहीं शहरीं जेथें लाल फौजांच्या तुकड्यांचे तळ आहेत, तेथें 'क्रांतिकारक समिति' किंवा 'राष्ट्रीय समिति' स्थापन झाली म्हणजे ते दुसऱ्या बाजूला आपलें तोंड फिरवून घेतात.

परंतु बुडापेस्ट मात्र, उजाडण्यापूर्वीच रणगाडे आणि तोफखान्याचा भडिमार यांच्यामुळें जागृत झालेलें आहे. रशियन पलटणींना स्वातंत्र्य-सैनिकांवर 'सार्वत्रिक चढाई' करण्याची आज्ञा देण्यांत आलेली आहे. बुडापेस्ट आकाशवाणीवरून घोषणा होते कीं 'सभाबंदी, आणि तिघांपेक्षां अधिक व्यक्तींनीं सार्वजनिक स्थळीं जमण्याची मनाई अजूनहि जारी आहे, आणि रस्त्यावर शस्त्रें घेऊन हिंडतांना जर नागरिक आढळले तर त्यांना, जागच्या जागीं गोळी घालून ठार करण्यांत येईल.' परंतु बुडापेस्ट आकाश-वाणीच्या आज्ञा अतःपर कुणीहि पाळणार नाहीं. सार्वत्रिक संप चालूच आहे. स्वातंत्र्यसैनिक आपापल्या ठाण्याला चिकटून आहेत आणि सामान्य नागरिक रस्त्यावर, बहुधा लाल तोफांच्या थेट तोंडाखालीं देखील, जमून आपली अवज्ञेची वृत्ति दर्शवीत आहेत.

आज रस्त्यांवर ट्राम, बसगाड्यांची वाहतूक नाहीं, स्वातंत्र्यसैनिकांनीं निःशस्त्र देशभक्तांच्या साहाय्यानें जवळ जवळ प्रत्येक रस्त्यावर प्रतिबंधक अडथळे उभारलेले आहेत. रणगाड्यांना अडथळे आणण्यासाठीं त्यांनीं ट्रामगाड्यांचे रूळ उखडून टाकले आहेत, आणि मोक्याच्या ठिकाणीं ट्रामगाड्या आणि बसगाड्या उलटून टाकलेल्या आहेत. पुष्कळ ट्रामगाड्या खिडक्या चक्काचूर झालेल्या, तशाच रस्त्यावर अगतिक पडून आहेत; कारण त्या चालविणारीं माणसें स्वातंत्र्याच्या क्रांतींत भाग घेण्यासाठीं तेथेंच टाकून निघून गेलीं आहेत.

अन्नाची टंचाई पडत आहे. बटाटे, दूध किंवा पाव विकत घेण्यासाठीं दुकानांपुढें लोकांच्या लांबच्या लांब रांगा तास तास तिष्ठत आहेत. परंतु अन्नपुरवठ्याच्या बाबतींत एक उज्ज्वल आशास्थान आहे.

बुडापेस्टच्या भोंवतालच्या खेड्यांतून शेतकऱ्यांनीं नगरामधील देश-भक्तांसाठीं अन्नांनीं लादलेले गाडे आणि खटारे पाठविण्यास प्रारंभ केला आहे. त्यांतलें बरेंच कम्युनिस्ट अधिकाऱ्यांपासून आणि सक्तीनें भरणा करावयाच्या व्यवस्थेपासून दडवून ठेवण्यांत आलें आहे. आतां ते रस्त्याच्या कोपऱ्यांवर फुकट अन्न वांटत आहेत; स्वातंत्र्यसैनिकांना त्यांना लागेल तितकें अन्न नेण्याची मुभा शेतकरी देत आहेत. स्वातंत्र्याच्या क्रांतीमधून उदय पावलेल्या नव्या देशभक्त फौजेला रसद पोंचवण्याची कुमक गृहिणी आणि लहान बालकें करीत आहेत.

आज नगराच्या आसमंतात् हिंडतांना मीं अनेक अशीं 'फुकट अन्न-वांटपस्थळें' पाहिलेलीं आहेत. एका कोपऱ्यावर एक दाढी असलेला शेतकरी आणि त्याची पत्नी खेळांतल्या चेंडूप्रमाणें बटाटे फेकत आहेत. दुसऱ्या एका रस्त्यावर अजूनहि एक जिवंत असलेले मासे लादलेला खटारा ओढून आणण्यांत येतो. ते मासे बाहेर उधळण्यांत येतात, आणि त्यांतले पुष्कळ बोटांतून निसटून बाजूच्या वाटेवर पडतात, तेव्हां ते जणुं काय नुकतेच पकडल्याप्रमाणें भोंवताल उसळया घेत आहेत.

आतां संचारबंदी अधिकृतपणें सकाळीं दहा वाजेपासून दोनप्रहरीं तीन वाजेपर्यंत जारी आहे; पण त्याची कुणी देखील पर्वा करीत नाहीं. स्वातंत्र्य-सैनिक अष्टौप्रहर बाहेर असतात. इतरेजन अन्न घेण्यासाठीं, अथवा अन्य कामानिमित्तें किंवा केवळ काय होत आहे, हें बघण्यास्तव बाहेर निघत असतात.

त्यांतल्या कित्येकांना गोळ्या घालण्यांत येतात. एका रशियन चिलखती गाडींतून रस्त्यानें जाणाऱ्या तीन स्त्रिया आणि चार पुरुष यांच्यावर, ते सर्व निःशस्त्र असूनहि, विनाकारण गोळीबार करण्यांत आल्याचें मी पाहतों. आतां मी जात आहें तरी अजून त्यांचीं प्रेतें रस्त्यांत पडलेलीं आहेत.

बुडामध्यें आमच्या लष्करानें आतां बऱ्याच मोक्याच्या जागा व्यापलेल्या आहेत. गॅन्झ कारखान्यांतील कामगारांनीं स्झेना चौक आणि स्झेल कलमान चौक यांच्यावर ताबा बसविला आहे. तथापि तिसऱ्या

2044 9413109

प्रहराच्या मधल्या सुमारास मार्गीत पूल, पश्चिम रेल्वेचें स्टेशन, राकोक्झी रस्ता, कोस्सुथ लाजोस रस्ता हीं महत्त्वाच्या दळणवळणाचीं बहुतेक ठाणीं रशियनांनीं काबीज केलेलीं आहेत.

परंतु आज आम्हांला असें कळतें कीं एक संपूर्ण हंगेरियन चिलखती पलटण आपल्या रणगाड्यांच्यासह एकाच वेळीं आम्हांला येऊन मिळाली आहे. वास्तविकपणें बहुतेक सगळें हंगेरियन लष्कर राष्ट्राच्या पाठीशीं आंदोलित होत आहे. 'रशियन जोखडापासून आपला देश मुक्त करण्यासाठीं' लोकांना एकत्र संघटित होण्याचे आर्जव करणारीं, नकलून काढलेलीं, पत्रकें रस्त्यांत दिसूं लागतात. दुकानांच्या तावदानांवर पुढील घोषणा चिकटवलेल्या आहेत : "रशियनांनो, घरीं चालते व्हा! संयुक्त राष्ट्रसंघाच्या देखरेखीखालीं मुक्त निवडणुका हव्यात!"

आमचे चिमुरडे आम्हांला धैर्य म्हणजे काय, याची शिकवणूक देत आहेत. फरसबंदीच्या दगडांचे रणगाड्यांना अडथळे उभारण्याचें काम ते करीत आहेत. चौदा किंवा पंधरा वर्षांचे मुलगे आणि मुली सरपटत रशियन रणगाड्याकडे जातात आणि त्यांच्या पुढें सरकणाऱ्या सांखळींत फरशीचे दगड ठेवतात. रणगाडा चालू होतो, दगडाच्या दडपणानें चाकांवरून सुरवंटासारखी असलेली सांखळी घसरून पडते आणि यंत्र थांबतें.

तरुण लोकांना रणगाड्यांच्या मर्मस्थानांची आणि अगदीं त्यांच्याजवळ मोलोटोव्हचें मद्य, पेट्रोल भरलेल्या बाटल्या व पेट्रोलनें भिजवलेली चिंध्यांची वात घेऊन जाण्याची योजना माहिती झालेली असते. ते डझनावारी रणगाड्यांचा विध्वंस करून टाकीत आहेत. पेट्रोलच्या ज्वालांमुळें रशियनांना जबरीनें बाहेर यावें लागतें आणि भोंवतालच्या इमारतींच्या खिडक्यांमधून त्यांच्यावर गोळ्या झाडण्यांत येतात.

चिमुरडे मुलगे आणि मुली रायफली व ऑटोमॅटिक बंदुकांनीं देखील लढत आहेत. तीं शस्त्रास्त्रें—मग हंगेरियन लष्करी शस्त्रागारांतील असोत कीं लढतांना काबीज केलेलीं असोत—रशियनांचींच होतीं—रशियनांवर त्यांचीं स्वतःचींच काडतुसें डागण्यांत येत आहेत. आज विद्यार्थ्यांच्या एका

गटानें एका बाझूकाच्या साहाय्यानें कित्येक कम्युनिस्ट रणगाड्यांचा विध्वंस केला आहे; आणि स्त्रिया देखील सामील होत आहेत; कित्येकजणी शस्त्रें घेऊन तर दुसऱ्या ध्वज आणि अन्न नेण्यासाठीं आणि घायाळांची निगा राखण्यासाठीं !

रशियनांचे अत्याचार चालूंच आहेत. रशियन सैनिकं आणि 'अे. व्ही. अेच्. 'वाले हंगेरियन देशद्रोही, यांच्या संयुक्त पथकांनीं साधीं चिन्हें धारण करणाऱ्या रेडक्रॉस कार्यकर्त्यांवर आणि जखमी लोकांना इस्पितळांत नेण्यासाठीं वापरण्यांत येणाऱ्या, व देशभक्तांकडून–विशेषतः मुलींकडून चालविण्यांत येणाऱ्या मोटार ट्रकवर ढोबळ तांबडा क्रॉस रंगविलेला असून देखील, गोळीबार केल्याचें मला दिसत आहे. हा वेळपर्यंत बुडापेस्ट-मधलीं इस्पितळें खचून भरलेलीं आहेत, आणि अनेक जखमी लोकांना आमच्या राजधानीच्या आसमंतात् असणाऱ्या खेड्यापाड्यांत नेणें भाग पडणार आहे.

रशियन फौजांचे रणगाडे घरांच्यावर बेगुमानपणें, तेथें आंत एखादा स्वातंत्र्यसैनिक दडून बसला असेल या दूरच्या आशंकेनें, गोळीबार करीत असल्याचें देखील माझ्या दृष्टीस पडतें. आंतल्या खोल्यांवर थेट नजर टाकणें शक्य व्हावें म्हणून अनेक घरांचे पुढील भाग तोफांच्या माऱ्यांनीं विध्वंस करून उघडे पाडलेले आहेत.

मालमत्तेची उघडपणें नासधूस करण्यासाठीं स्वतः लाल फौज तुटून पडलेली आहे. रशियन रणगाडे निशाणबाजीचा अभ्यास करण्यासाठीं चर्चेच्या घुमटींचा उपयोग करीत आहेत. ते विनाकारण दिव्यांच्या आणि टेलिफोनच्या खांबांना धडका देतात आणि मोटारींच्या वाहतूक सुरक्षा वर्तुळांची मोडतोड करतात.

प्रांतांमधील आमच्या एका स्वतंत्र आकाशवाणीवरून बातमी येते कीं ऑस्ट्रियन सरहद्दीजवळ मॅग्यारोवार येथें कांहीं हंगेरियन मुलगे एका बराकीच्या आढ्यावर तेथें असलेला लाल तारा काढून टाकण्यासाठीं चढलेले असतांना, त्यांना रशियन सैनिकांनीं गोळ्या घालून ठार केलें.

बुडापेस्टमध्यें जखमी लोकांना ठेवायला जरा देखील जागा उरलेली

नाहीं. मृतांनाहि पुरेशी जागा नाहीं. लढाईला सार्वत्रिक स्वरूप प्राप्त झाल्यापासून शहराच्या कडेला असलेल्या स्मशानभूमींत आमच्या मृतांना नेणें अशक्य होऊन बसलेलें आहे. आतां धारातीर्थीं पतन पावणाऱ्या आमच्या शूरवीरांचें दफन करण्यासाठीं आमच्या उद्यानांचा उपयोग आम्हांला करणें भाग आहे.

परंतु आज आणखी एका आघाडीवर स्वातंत्र्याच्या क्रांतीनें एक महान् नवा विजय संपादन केलेला आहे. एका स्वतंत्र वर्तमानपत्राच्या—'इझास्झाग'—(सत्य) च्या पहिल्या अंकाच्या प्रती छापून निघाल्या आहेत आणि त्या बुडापेस्टच्या प्रत्येक विभागांत त्वरेनें पाठविण्यांत येत आहेत. कम्युनिस्ट नियंत्रकांची कात्री लावल्याशिवाय धडपणीं प्रसिद्ध होणारें दशकभराच्या अवधींतलें हेंच पहिलें वार्तापत्र होय. आमच्या स्वतंत्र पत्राचे दुसरे अंक खेड्यांत नेण्यांत आले आहेत.

आज स्टॅलिन चौकांत कामगार आणि पोरें यांनीं उलथून पाडलेल्या पुतळ्याचा—पतन पावलेल्या हुकुमशहाचा—शिरच्छेद करण्याची करामत, शेवटीं व्यवस्थितपणें, पार पाडलेली आहे. निदर्शक हे धातूच्या त्या तिरस्कृत प्रतीकाचे तुकडे तुकडे करीत आहेत, आणि एक हंगेरियन ध्वज त्याच्या एका बुटामधून कलत्या स्थितींत फडफडत आहे.

तिसऱ्या प्रहरीं बुडापेस्ट आकाशवाणीवरून कम्युनिस्ट पक्षाच्या पुनःसंघटित केंद्रीय समितीची घोषणा ध्वनिक्षेपित होते. 'नवी निवडणूक, मॉस्कोबरोबर वाटाघाटी, गतदोषांचें परिमार्जन, सार्वत्रिक क्षमादान, वेतनवाढ, आणि कारखान्यांमधून निवडण्यांत आलेल्या कामगारांची कार्यमंडळांना मान्यता' देण्याबद्दल समिति प्रतिज्ञा करते.

आज रात्रीं मला ॲस्टोरिया हॉटेल जवळची एक जागा दाखविण्यांत येते. याच ठिकाणीं एका लाल रणगाड्यांतल्या गोलंदाजानें एका तरुण घायाळ स्वातंत्र्यसैनिकाला प्राथमिक उपचार करीत असलेल्या तरुण डॉक्टरणीला जाणून बुजून गोळी घातली होती. देशभक्तांनीं तिचें प्रेत उचलून नेलें होतें आणि त्या ठिकाणीं त्यांनीं पांढऱ्या फुलांचा एक हार ठेवलेला होता.

आतां बुडापेस्टमध्यें घराघरांवर स्वातंत्र्याप्रीत्यर्थ नवा हंगेरियन ध्वज, आणि स्वतंत्रतेसाठीं प्राणार्पण करणारांसाठीं काळा ध्वज, फंडकवण्यांत आलेले आहेत. सबंध नगर पतन पावणारांसाठीं सुतक पाळत आहे.

शनिवार, २७ ऑक्टोबर

आज देखील बुडापेस्टमध्यें प्रचंड रणधुमाळी चालू आहे. अन्नाची टंचाई वाढत आहे आणि सार्वत्रिक संप चालूंच आहे. आमची क्रांति दडपून टाकण्यासाठीं झेकोस्लोव्हाकियामधून रशियन रणगाडे येत असल्याच्या अफवा पण आहेत.

परंतु एक चमत्कारिक गोष्ट घडून येत आहे. हंगेरियनांची भीतीची भावना लुप्त होत आहे. एखादें बालक जर रणगाडा उडवून देऊं शकतें तर मग कुणाला रणगाड्याची भीति कां वाटावी ? चकमकीच्या ठिकाणीं जायला निघालेल्या रणगाड्यांच्या सांखळींचा खणखणाट रस्त्यावरून कानीं पडला कीं हातांत हात घालून गृहिणी हिंडूं लागतात आणि जणुं सर्कशींतल्या प्रदर्शनीय जनावरांकडे पहाण्याच्या कुतूहलानें त्यांचेवर नजर टाकतात. चकमकीच्या नंतर दोन मिनिटांनींच बाजूचे रस्ते निकामी करण्यांत आलेल्या रणगाड्याची पाहणी करण्यासाठीं लोकांनीं गजबजूं लागतात.

परंतु रशियनांच्या बाबतींत अगदीं विरुद्ध घडत आहे. ते भयभीत झालेले आहेत आणि भुकेले आहेत. त्यांना हंगेरियन शेतकऱ्यांकडून अन्न मिळूं शकत नाहीं आणि त्यांची स्वतःची पुरवठापद्धति कोलमडून पडलेली दिसते. शहरांतल्या जुन्या वस्तीचे अरुंद रस्ते रात्रीच्या वेळीं रणगाड्याच्या प्रकृतीला हितकर ठरत नाहींत, आणि आपल्या यांत्रिक धुडाच्या बाहेर पडल्यास सैनिकांवर गोळ्या घालण्यांत येऊं शकतील, म्हणून रात्रीच्या प्रहरीं बहुतेक रणगाडे शहरांच्या मध्यभागांतून उपनगरांत माघारीं नेण्यांत येतात.

आमचा नवा पंतप्रधान नागी याच्याबद्दल कोणता विचार मनांत आणावा, हें अजूनहि आम्हांला कळत नाहीं. आज बुडापेस्ट आकाश-

वाणीवरून घोषणा झाली कीं एक नवें सरकार स्थापन करण्यांत आलें असून त्यांत दोघां बिगर कम्युनिस्टांकडे–झोल्टान टिल्डीला राज्यमंत्रीपद आणि बेला कोवाक्सला कृषिमंत्रीपद–अशीं महत्त्वाचीं खातीं सोंपविलेलीं आहेत. ते दोघेहि बऱ्याच काळापासून कम्युनिस्टांनीं बंदी घातलेल्या 'अल्पभूमिधारक' (स्मॉल होल्डर्स) पक्षाचे सभासद आहेत. परंतु आम्हांला पेक्सच्या स्वतंत्र आकाशवाणीवरून समजतें कीं कोवाक्स बुडापेस्टमध्यें नसून, पेक्समध्यें तेथें स्थापन झालेल्या क्रांतिकारक सरकारांत आहे.

त्यामुळें नव्या वर्षाच्या दिनापर्यंत रशियन फौजा आमच्या देशांतून निघून जातील, या नागीला श्रेय देणाऱ्या दुसऱ्या घोषणेवर विश्वास ठेवावा कीं नाहीं, हें कळेनासें झालेलें आहे. मध्यंतरीं कामगारांच्या कार्यमंडळाचें एक प्रतिनिधिमंडळ आपल्या एकवीस मागण्यांचा एक खलिता पंतप्रधानाला सादर करतें.

आम्हांला ठाऊक आहे कीं अजूनहि कम्युनिस्ट नियंत्रणाखालीं असलेल्या बुडापेस्ट आकाशवाणीपेक्षां देशभक्त फौजेच्या ताब्यांत असलेल्या आकाशवाणी केंद्रांवर अधिक विश्वास आम्ही ठेवूं शकतों. स्वतंत्र आकाशवाणी केंद्रांची नामावळी दररोज वाढत आहे. आतां तींत मिस्कोल्क, पेक्स, गिआर, मॅग्यारोवार आणि स्झोम्बाथेली हीं नांवें सामील झालेलीं आहेत.

या तिसऱ्या प्रहरीं स्वतंत्र मिस्कोल्क आकाशवाणीवर बोरसोद परगण्याच्या कामगार कार्यमंडळानें नव्या सरकारचें स्वागत केलें आहे, परंतु असेंहि घोषित केलें आहे कीं, " आपल्या मागण्या–विशेषतः सोवियट लष्कराच्या माघारी जाण्याविषयींची मागणी–जोंवर पूर्ण होत नाहींत " तोंवर आपला संप ते चालूं ठेवतील.

स्वतंत्र मिस्कोल्क आकाशवाणी आणखी सांगत आहे–" मिस्कोल्क नगरी दोन दिवस कामगारांचें कार्यमंडळ आणि विद्यार्थ्यांची लोकसभा यांच्या नेतृत्वाखालीं आहे. कामगारांच्या कार्यमंडळानें शहरांत ठेवलेलें सैन्य आणि पोलिस यांच्यावर ताबा केलेला आहे–" पेक्स आकाशवाणी

स्थानिक लष्करी पथकें आणि कामगार यांच्यामधील संपूर्ण ऐक्याची बातमी सांगत आहे.

इतर आकाशवाणीवरील घोषणा आणि बुडापेस्टमध्यें आणलेलीं पत्रकें यांच्यामुळें आम्हांला कळतें कीं वाक, हात्वान, आणि स्झोल्नोक या शहरांनीं स्वतःला 'स्वतंत्र नगरें' म्हणून घोषित केलेलें आहे. असें कळतें कीं सोप्रोन हें स्वातंत्र्यसैनिकांच्या ताब्यांत आहे आणि हेग्ये शालोम एका क्रांतिकारी समितीच्या नियंत्रणाखालीं आहे.

परंतु एक उग्र स्वरूपाची वार्ता आलेली आहे कीं मॅग्यारोवार येथें ऑस्ट्रियन सरहद्दीपासून केवळ दहा मैलांच्या अंतरावर लाल सैनिकांनीं स्त्रिया व मुलें यांच्यासह पंच्याऐंशी शेतकऱ्यांची कत्तल उडविली. त्याचप्रमाणें रशियनांनीं बऱ्याच शेतवाड्यांतून आणि खेड्यांतून सबंध कुटुंबांना गोळ्या घातल्याची देखील वार्ता आहे.

आणखी एक वार्ता आहे कीं लाल फौजेंतील युक्रेनी सैनिक आमच्या विरुद्ध लढण्याचें नाकारीत आहेत आणि रशियनांच्या विरुद्ध आमच्या लढ्यांत सामील होण्यास त्यांनीं प्रारंभ केला आहे. माझ्या घराकडे पायीं परत येत असतांना मला या वार्तेची पुष्टि आढळून येते. आमच्यापासून कांहीं घरें अंतरावर एक पूल आहे. मी त्या बाजूनें येतांना बरेच स्वातंत्र्य-सैनिक कांहीं प्रेक्षकांसह त्याच्या एका टोंकाला होते. एक लाल रणगाडा धडधडत येत होता, परंतु तो चालविणाऱ्या युक्रेनी तरुणानें गोळीबार करण्याच्याऐवजीं आपलें डोकें बाहेर काढून हात हालविला. आमच्या मुलांच्या जवळ बाजूला तो थांबला, खालीं उडी घेतली आणि निघून गेला. स्वातंत्र्यसैनिकांतील तिघेजण आंत चढले आणि नगराच्या मध्यभागीं होत असलेल्या गोळीबाराकडे निघाले.

आम्हांला आज समजलें आहे कीं २४ किंवा २५ तारखेपासून एक तल्लख सैनिक कर्नल पालमाल्टेर स्वतंत्र हंगेरीचें एक नवें देशभक्तांचें लष्कर—एक स्वातंत्र्यसैनिकांची सार्वत्रिक संघटना—उभारण्याचा उद्योग करीत आहे. किलियन बराकींत त्यानें प्रमुख ठाणें स्थापन केलेलें आहे.

कम्युनिस्टांनीं आमच्या देशाची सत्ता हिरावून घेतल्यापासून आज

पहिल्यांदा चर्चमधील घंटा वाजूं लागल्याचें आमच्या कानांवर पडत आहे. आम्हा हंगेरियन लोकांना दुपारीं चर्चच्या घंटा वाजण्याचा विशिष्ट अर्थ माहीत आहे. पंधराव्या शतकांत नंदोरफेहरवार येथें हंगेरियन लोकांनीं तुर्कांवर एक प्रचंड विजय मिळविला होता. पोपनें त्याला ख्रिस्ती धर्माचा एक विजय मानून त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ दररोज दुपारीं घंटानादाचा आदेश दिलेला होता. दहा वर्षें घंटा नीरव होत्या. आज दुपारीं बुडा-पेस्टच्या लोकांनीं आपल्या डोक्यावरच्या टोप्या काढल्या आणि भक्ति-भावानें रस्त्यांत उभे राहून घंटानाद श्रवण केला.

रविवार, २८ ऑक्टोबर

रात्रीं त्या मानानें बरीच शांतता होती. आज सकाळीं सर्व चर्च आणि सिनॅगॉग यांच्यांत गेल्या दशकांत कोणत्याहि दिवशीं लागली नसेल इतकी जास्त रीघ लागून कृतज्ञताभावानें पूजाप्रार्थनेसाठीं गर्दी जमली होती. आज सरकारी आकाशवाणीवरून देखील एक धार्मिक प्रवचन झालें.

आम्हांला वाटतें कीं आमचें स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध आम्ही जिंकूं शकूं. कम्युनिस्ट पक्षाचें अधिकृत वृत्तपत्र 'स्झाबाद नेप' आपल्या आजच्या सकाळच्या आवृत्तींत घोषणा करीत आहे :

"एक प्रचंड राष्ट्रीय लोकसत्ताक आंदोलन आमच्या देशांत विकास पावलेलें आहे, याची जाणीव आपल्याला अवश्यमेव व्हायला पाहिजे... या आंदोलनानें कारखान्यांचे खरेखुरे मालक कामगार असावेत या त्यांच्या हक्काच्या दाव्याची अभिव्यक्ति झालेली आहे. या आंदोलनानें शेतकरी वर्गाचा, अस्तित्वाची सतत अशाश्वति आणि असमर्थनीय गांजणूक यांच्यापासून मुक्ति मिळविण्याचा आणि व्यक्तिगत अथवा सामुदायिकपणें शेतकरीजीवन स्वेच्छेनें पत्करून आपली जीवनक्रमणा चालविण्याचा, मानवी हक्कांचा दावा व्यक्त होत आहे...

"केवळ देशप्रेमामुळेंच जनतेच्या या आंदोलनाला येवढें प्रचंड सामर्थ्य, उत्साह आणि प्रसंगीं स्वेच्छेनें मरण पत्करण्याची शक्ति प्राप्त झाली.

"आपण बोलत असलेल्या मातृभाषेप्रमाणेंच समता आणि स्वतंत्रता यांची मागणी सर्वस्पर्शी आहे. ज्यांना जनतेची भाषा समजत नव्हती अशा कम्युनिस्टांनीं प्रमुख अधिकारांच्या जागीं असावें, हा पराकाष्ठेचा निर्लज्जपणा होय....."

बुडापेस्ट आकाशवाणीवर स्पष्टपणें प्रतीत झालेल्या या सत्य आशयाचा पुनरुच्चार पंतप्रधान नागी करतो,–"या भीतिदायक लोकमान्य आंदोलनाची संभावना प्रतिक्रांति म्हणून करण्याचा दृष्टिकोन सरकारला अमान्य आहे... या आंदोलनामुळें आमच्या सर्व जनतेला व्यापून टाकणारी आणि एकत्र आणणारी एक प्रचंड राष्ट्रीय आणि लोकाभिमुख चळवळ निर्माण झालेली आहे."

तिरस्कृत सुरक्षा पोलिसदलाचें–'अे. व्ही. अेच्. 'चें विसर्जन करण्यांत येईल, असेंहि नागी म्हणतो. तो पुनश्च अभिवचन देत आहे, कीं सगळ्या बुडापेस्टमधून रशियन सैन्य माघारीं जाईल. लाल फौजांचे रणगाडे नगरांतून निघून जात आहेत, अशी घोषणा बुडापेस्ट आकाशवाणीवरून होते, परंतु तसा एकहि जातांना कुणाला दिसलेला नाहीं; आणि काल रात्रींच शस्त्रास्त्रांसाठीं घरांच्या झडत्या घ्यायला रस्त्यावर 'अे. व्ही. अेच्. 'वाले दिसत होते.

आज नगराचे अनेक विभाग शांत असले तरी किलियन बराकीवर लाल फौजांचे रणगाडे हल्ले चढवीत आहेत आणि तेथें पालमालेटरच्या आधिपत्याखालीं तीन हजार स्वातंत्र्यसैनिक शर्थीनें लढत आहेत. रशियनांनीं दान्युबवरील पूल देखील सर्व वाहतुकीसाठीं बंद केले आहेत. पुलांच्या प्रवेशद्वारांवर लाल रणगाडे आणि चिलखती गाड्या यांचे पहारे बसलेले आहेत. आपले जखमी अगर बेपत्ता नातेवाईक शोधण्यासाठीं नगराच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे जाणाऱ्या व्यक्तींना देखील पूल ओलांडण्याची परवानगी नाहीं. लाल रणगाड्यांच्या चौक्या पार्लमेंट भवन आणि 'अे. व्ही. अेच्. ' प्रमुख ठाणें यांच्यापुढें सुद्धां बसविण्यांत आलेल्या आहेत.

अन्न अधिकाधिक दुर्मिळ होत आहे. एका जिल्ह्यांत अन्नाच्या

दुकानापुढें उभ्या असलेल्या लोकांच्या (बहुतेक स्त्रिया असलेल्या) रांगेवर रशियन पलटणीनें अकस्मात् गोळीबार केला.

आमचें आवडतें नगर ज्वालांच्या भक्ष्यस्थानीं इतकें पडत असल्याचें पाहून आमचें अंतःकरण दुभंग होत आहे. परंतु आज आम्हांला प्रिय वाटणारी आग पहायला मिळाली. कामगारांनीं आणि विद्यार्थ्यांनीं आज कोस्सुथ लाजोस रस्त्यावरील कम्युनिस्ट प्रकाशक आणि पुस्तकविक्रेते– 'होरायझन' (क्षितिज) मधून प्रचार ग्रंथ, पुस्तिका व पत्रकें बाहेर काढलीं. इमारतीच्या पुढेंच रस्त्यावर त्यांनीं त्यांची होळी पेटविली. ते दुष्ट असत्य शब्द ज्वालांच्याबरोबर वर जातांना पाहून आम्हा सर्वांना आनंद होत होता.

देशांतील सर्वच स्वतंत्र आकाशवाणींवरून आम्ही दिवसभर चांगल्या बातम्या ऐकत आहोंत. देशभक्तांचा हंगेरीमधील बऱ्याच मोठ्या विभागांवर, विशेषतः पश्चिम आणि दक्षिण बाजूंतील विभागांवर कबजा झालेला आहे. प्रत्येक ठिकाणीं कामगारांचीं क्रांतिकारी कार्यमंडळें आणि स्थानिक 'राष्ट्रीय समित्या' अधिकार हातीं घेत आहेत. बऱ्याचशा विभागांत फारच थोडी लढत झाली किंवा अजिबात झाली नाहीं आणि बंदोबस्त चांगला आहे. (बुडापेस्टमध्यें देखील सर्वत्र हिंसा दंगल माजली तरी लुटालूट झाली नाहीं. मोडतोड झालेल्या दुकानांच्या तावदानांपलीकडे पडलेल्या जवाहिरांना कुणीहि हात लावलेला नाहीं.)

स्थानिक राष्ट्रीय समित्या आतां परस्पर संपर्क जोडीत आहेत, आणि आतां आपल्या नियंत्रणाखालील आकाशवाणींमुळें त्वरित संबंध जोडूं शकत आहेत. देशाच्या अनेक भागांतून समान मागण्या पुढें करण्यांत आल्याः–

–लाल लष्कराच्या सर्व फौजांची माघार.

–हंगेरी आणि सोवियट युनियनमधील आर्थिक आणि राजकीय संबंधांत समता.

–'अे. व्ही. अेच्.'चें विसर्जन.

–कामगारांच्या वतीनें कामगारांच्या कार्यमंडळांना बोलण्याच्या अधिकाराला मान्यता.

–वेतनांत वाढ आणि कामाच्या परिस्थितींत सुधारणा.

–बिगर कम्युनिस्ट वर्तमानपत्रें आणि मासिकें प्रसिद्ध करण्याचें स्वातंत्र्य.

–अनेक पक्षांच्या सहित नव्या सार्वत्रिक निवडणुकी.

स्वतंत्र गिओर आकाशवाणीनें हंगेरीनें वार्सा करारामधून बाहेर पडण्याची आणि हंगेरीच्या लष्करी तटस्थतेची आणखी एका मागणीची पुस्ती जोडली.

हंगेरियन लष्कराचीं आणखी सात दळें स्वातंत्र्यासाठीं चाललेल्या रणांत आम्हांला सामील झालेलीं आहेत; आतां जवळ जवळ आमचें सगळें सैन्यच आमच्या पाठीशीं आहे. सहस्रावधि हंगेरियनांचें रक्तलांच्छन ज्यांच्या हातावर आहे असे 'अे. व्ही. अेच्. 'वाले देशघातकीच फक्त रशियनांकडे झुकत आहेत.

बऱ्याच ठिकाणीं लाल लष्करांच्या तुकड्या आणि स्थानिक रहिवासी यांच्यांत स्नेहाचे संबंध आहेत असें आमच्या कानीं पडत आहे. स्वतंत्र गिओर आकाशवाणीवरून सांगण्यांत येतें : "गिओरमधील सोवियट लष्कराच्या सेनापतीनें घोषित केलें आहे,–"तुमच्या अंतर्गत राजकीय कामकाजांत हस्तक्षेप करण्याचा आमचा जरा देखील हेतु नाहीं. हंगेरियन जनतेचा जुलमी नेत्यांविरुद्धचा उठाव माझ्या मतें समर्थनीय आहे."– "काल ज्यांनीं स्थानिक सोवियट लष्करांच्या आवश्यक गरजांसंबंधीं विचारपूस केली आणि लष्करी छावणीमधील बालकांना चाळीस लिटर दूध ज्यांनीं न मागतां पुरविलें, त्या सर्वांच्याबद्दल सेनापतीनें कृतज्ञता व्यक्त केली आहे." "

बुडापेस्ट आकाशवाणीवरून आज रात्रीं स्वातंत्र्यसैनिकांना उद्देशून केलेल्या भाषणांत म्हटलें आहे—"तुमचा जय झाला,...तुमच्या मागण्या पूर्ण करण्यांत येतील." परंतु त्याच क्षणाला लाल रणगाडे स्वातंत्र्यसैनिकांच्या दोन बालेकिल्ल्यांवर कुलपी गोळ्यांचा भडिमार करीत होते. स्वतंत्र गिओर आकाशवाणीवरून घोषणा होते, "क्रांतिकारी फौजांनीं आपलीं शस्त्रें खालीं ठेवूं नये, कारण कम्युनिस्टांच्या अभिवचनांचा भरंवसा कुणालाच धरतां येणें शक्य नाहीं."

सोमवार, २९ ऑक्टोबर

आमची परिस्थिति आतां वाट कोंडलेल्या खिंडींत सांपडल्यागत झालेली आहे. बुडापेस्टमधल्या मोक्याच्या ठाण्यांचा ताबा अजूनहि रशियन रणगाड्यांकडे आहे आणि त्यांनीं नगराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांची नाकेबंदी केली आहे. आमच्या स्वातंत्र्यसैनिकांनीं देखील त्याच वेळीं मजबूत मोके निर्धारपूर्वक ताब्यांत ठेवले असून, लाल सैन्य बाहेर पडेपर्यंत युद्धतहकुबी मान्य करण्यास किंवा शस्त्रें खालीं ठेवण्यास नकार दिलेला आहे.

बऱ्याच जिल्ह्यांमधून भीषण रणधुमाळी पेटली आहे, आणि रस्तोरस्तीं होणाऱ्या हातघाईच्या चकमकींत रक्ताचे सडे शिंपले जात आहेत. आमचे स्वातंत्र्यसैनिक त्यांच्यांतल्या बहुतेकांना लष्करी शिक्षण नसून देखील विस्मयकारक कौशल्य प्रगट करीत आहेत. त्यांच्या तांतडीनें उभारलेल्या पथकांत, आपल्या स्वतःच्या पसंतीच्या अधिनायकांच्या हुकमतीखालीं, ते कडक शिस्तीचें पालन करीत आहेत. हजारांत सगळेच शूरवीर, आणि कुणीच भेंकड नाहीं. आमच्या शूर मुली रशियन यांत्रिक बंदुकांच्या माऱ्यांतून निधडेपणानें दारूगोळा आणि अन्न घेऊन जातात.

आमच्या प्रिय नगरीचा विध्वंस करण्यांत येत आहे. दुसऱ्या जागतिक युद्धाच्या अंतीं करण्यांत आलेल्या नासाडीपेक्षां अत्यंत नासधूस अनेक जिल्ह्यांमधून करण्यांत आली आहे. इमारतींचे सर्वच भाग जणुं एखाद्या बाँबहल्ल्यामुळें चुराडा झाल्यासारखे दिसत आहेत.

आम्हांला स्वतंत्र आकाशवाणीवरून समजतें कीं देशाचा बराच उर्वरित भाग, तेथील बहुतेक ठिकाणीं युद्ध थांबल्याबरोबर, आमच्या ताब्यांत आलेला आहे. परंतु अशा भीतिदायक अफवा उठत आहेत, कीं रशियनांनीं रुमानियांतून अधिक रणगाडे पाठविले आहेत आणि मिकोयान पुन्हां बुडापेस्टला परतला आहे.

लाल लष्करी रणगाडे पुन्हां किलियन बराकी, झल्कामेट बराकी, आणि बेम चौकाकांठच्या बराकींमधून तळ देऊन बसलेल्या स्वातंत्र्यसैनिकांवर हल्ले चढवीत आहेत. परंतु बुडापेस्ट विमानतळ आमच्या हातीं पडल्याचें आमच्या कानीं आलें आहे.

आज लोकांनीं आपल्या एका शत्रूला,—लाल फौजेपेक्षां देखील ज्याचा त्यांना अत्यंत कडवट तिरस्कार वाटत असतो, त्या रशियन 'अेम्. व्ही. डी.'च्या हुकमतीखालील देशद्रोही सुरक्षा पोलिस दलाच्या—'अे. व्ही. अेच्.'च्या—हस्तकांना घेरणें सुरू केलें आहे. गेलीं दहा वर्षें हिटलरच्या गेस्टापोपेक्षां देखील रानटी क्रौर्यानें 'अे. व्ही. अेच्.'नें आमच्या जीवनांत दहशत आणि पशुता यांची भर घातली आहे. त्यांनीं मध्यरात्रीं आमच्या बांधवांना आणि पितरांना धरून नेलें, आमच्या पुत्रांना भरताड खटाऱ्यांतून सैबेरियाला हद्दपार केलें, अंधाऱ्या तळघरांत आमचा छळ केला, आमच्याकडून विलक्षण हास्यास्पद अपराधांचे कबुलीजबाब जबरीनें वदवून घेतले, आम्हांला गुलामांच्या छावण्यांत कोंटेरी कुंपणांत कोंडून घातलें, आणि स्वदेशप्रेम आणि सत्यप्रियता यांच्या अपराधांवरून हंगेरियन लोकांना गोळ्या घातल्या आणि फांसावर टांगलें!

कांहीं अत्यंत बदनाम 'अे. व्ही. अेच्.' हस्तकांना पकडून तात्काळ गोळ्या घालण्यांत येतात. इतरांना कैद करून चौकशीची वाट पाहण्यासाठीं तुरुंगांत डांबण्यांत येत आहे,—आम्हांला त्यांच्या हातून मिळालेल्या वागणुकीपेक्षां ही वागणूक अधिक रास्त आहे.

देशभक्तांच्या एका जमावानें एका प्रख्यात 'अे. व्ही. अेच्.' अधिकाऱ्याला बंदिवान् केल्याचें पाहणारा माझा मित्र ती हकीगत, माझी भेट झाली तेव्हां, सांगत आहे. ते त्याला ठार मारायला सिद्ध झाले;—तसा तो ठार मारण्याच्या लायकीचाच होता—पण इतक्यांत कुणीतरी म्हणालें, "त्याला सोडून द्या. तो यहुदी आहे आणि आपण त्याला ठार केलें तर ते त्याला भलतेंच रूप देतील आणि आपण यहुदीविरोधी असल्यामुळें तसें केलें, असें म्हणतील." म्हणून मग जमावानें त्याला मुक्त केलें. मेंकडपणामुळें त्याचा थरकांप झालेला होता आणि त्याच्या पायांना पेलण्याइतक्या जलद वेगानें त्यानें पळ काढला. हंगेरीच्या गतेतिहासांत प्रसंगोपात्त यहुदीविरोधाचीं उदाहरणें घडलेलीं आहेत. केवळ तीन वर्षांआधींच मॉस्कोमधील तथाकथित 'डॉक्टरांच्या कटा'च्या काळीं, हंगेरींतील कम्युनिस्टांनीं स्थानिक डॉक्टरांचा जो एक कट शिजविला होता, तो

वरल्या सोंगाआडचा एक यहुदीविरोधी बनाव होता. परंतु आमच्या स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धांत यहुदीविरोधी कृत्यें घडल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. वस्तुतः लुटालूट, बलात्कार, दरोडेखोरी किंवा कोणताहि व्यक्तिगत स्वरूपाचा गंभीर गुन्हा घडल्याची बातमीहि क्वचितच आली असावी.

बुडापेस्ट कम्युनिस्ट पक्षाचें मुखपत्र 'स्झाबाद नेप' आपल्या इतिहासांत अगदीं पहिल्यांदाच मॉस्कोच्या 'प्रावदा'बरोबर प्रतिवाद घालीत आहे. आमच्या क्रांतियुद्धाच्या 'प्रावदा'मधील खोट्या इतिवृत्ताचें त्यानें खंडन केलें आहे. 'स्झाबाद नेप' लिहितो, "पेस्ट आणि बुडा-मधील उठाव करणाऱ्यांना, स्वातंत्र्य आणि दहशत अगर भयवर्जित जीवन यांची आकांक्षा आहे. त्यांना अधिक भाकरी आणि राष्ट्रीय स्वाधीनता यांची लालसा आहे. 'प्रावदा'नें म्हटल्याप्रमाणें केवळ ही साहसप्रियता आहे काय?"

हंगेरींतील बुद्धिजीवींच्या क्रांतिकारी समितीनें एक आवेदन काढून आमच्याच मुख्य मागण्यांचा पुनरुच्चार केलेला आहेः—"समानतेच्या भूमिकेवरून 'यु. अेस्. अेस्. आर्.' (रशिया) बरोबर संबंध निश्चित करा; लोकांना ज्यांच्यांत मुक्तपणानें आपले उमेदवार नियुक्त करतां येणें शक्य होईल, अशा सार्वत्रिक पण गुप्त पद्धतीनें निवडणुकी करा; कारखाने आणि खाणी यांच्या कारभारांची व्यवस्था कामगारांच्या कार्यमंडळांच्या हवालीं करा; खासगी कारागीर आणि किरकोळ कामकरी यांच्या आर्थिक व्यवहारांची हमी द्या; कारखान्यांतली कामाच्या हिस्सेरशीची पद्धति रद्द करा; कामगार संघ आणि शेतकरी संघटना यांना मोकळीक द्या; व्यक्तिगत शेती करणाऱ्यांना पाठिंबा द्या; सामुदायिक शेती करणें ऐच्छिक करा; आणि शेतीचें उत्पादन सरकारला सक्तीनें भरणा देण्याच्या पद्धतीचें निर्मूलन करा; भाषण, मुद्रण आणि संमेलन-स्वातंत्र्याची हमी द्या; स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धाची प्रथमतिथि म्हणून २३ ऑक्टोबर राष्ट्रीय सणाचा दिवस म्हणून घोषित करा."

तिसऱ्या प्रहरीं हंगेरींतील चित्रकारांच्या समितीनें आणखी एका मागणीची पुस्ती जोडली, कीं ललितकलांच्यामध्यें हस्तक्षेप करण्यास

अधिकाऱ्यांना प्रतिबंध करण्यांत यावा, आणि कलावंत, आश्रयदाते व कलासंस्था यांना संपूर्ण स्वातंत्र्याची हमी देण्यासाठीं कायदेशीर निर्बंधांची तरतूद करण्यांत यावी. त्यांच्या व्यतिरिक्त समितीनें मागितलेल्या अन्य हमींमध्यें परदेशांत प्रवासाचें, कलाकृति विकण्याचें आणि त्यांचीं प्रदर्शनें भरविण्याची व्यवस्था करण्याचें स्वातंत्र्य देखील समाविष्ट असावें, असाहि आग्रह धरण्यांत आला आहे.

स्वतंत्र मिस्कोल्क आकाशवाणीवरून सांगण्यांत आलेला, 'अे. व्ही. अेच्.' गुंडांच्या टोळ्यांनीं कत्तल केलेल्या विद्यार्थ्यांच्या आणि मिस्कोल्कमधील नागरिकांच्या और्ध्वदेहिकाचा वृत्तांत ऐकून आम्ही शोकसंतप्त झालों आहोंत. परंतु स्वतंत्र गिओर आकाशवाणी पुन्हां आमचीं अंतःकरणें पुढील घोषणेनें उचंबळून सोडत आहे : " सोवियट पलटणींनीं राजधानींतून माघार घेण्यास आरंभ केल्याचें आमच्या कानीं आलें आहे. बुडापेस्ट सोडून निघालेल्या पलटणी स्झेकेस्फेहरवर पार करून नुकत्याच पुढें गेल्या आहेत. सशस्त्र चकमकी टाळण्यासाठीं सोवियट पलटणीच्या या हालचालींत खोड्या काढून त्यांना चिडवूं नका."

मंगळवार, ३० ऑक्टोबर

कालच्या खिन्नसुन्न दिवसानंतर रात्रीं मात्र लाल फौजांनीं बराकी आणि घेरें यांच्यावर, विशेषतः नवव्या आणि दहाव्या विभागांत, हल्ले चढविल्यामुळें तीव्र रणधुमाळी माजली.

आज रशियनांच्या विरुद्ध चाललेली लढाई जवळ जवळ थांबली आहे; परंतु 'अे. व्ही. अेच्.' हस्तकांची धरपकड करतांना थोडासा गोळीबार होत आहे. स्वातंत्र्यसैनिकांनीं पेस्टमधील 'अे. व्ही. अेच्.'चें प्रमुख ठाणें आणि बुडामधील कम्युनिस्ट पक्षाची मुख्य कचेरी देखील यांच्यावर यशस्वी छापे घातले. कांहीं 'अे. व्ही. अेच्.' हस्तकांनीं नियमित पोलिसांचे गणवेष घालून वेषांतर केलें आहे. कारण नियमित पोलिसांनीं आरंभापासूनच क्रांतीच्या उठावाविरुद्ध हिंसा आचरण्यास नकार दिला होता.

असें आम्हांला आढळलें आहे, कीं रशियन रणगाडे आणि चिलखती गाड्या यांनीं नगराच्या बुडा या अर्ध्या भागांतून प्रत्यक्ष माघार घेतली आहे. प्रत्येकाला सरते शेवटीं असा विश्वास वाटूं लागला आहे कीं आतां रशियन खरोखरच जातील. उद्यां सकाळपर्यंत रशियन रणगाडे माघारीं नेण्याची सोवियट सेनानीकडून मिळालेली कवुली जरी अधिकृतपणें घोषित झालेली आहे, तत्रापि पेस्टमध्यें अजूनहि रणगाडे आहेतच. तरीपण आमच्या कानीं अशाहि अफवा येत आहेत, कीं अजून देखील देशांत लाल पलटणी येत असून बरोबर अवजड शस्त्रें देखील आणीत आहेत.

जीवन पुन्हां नित्याच्या पातळीवर परतूं लागल्याचीं चिन्हें दिसण्यास आरंभ झाला आहे. अजूनहि संप अंशतः चालू आहे, परंतु नागी घोषणा करतो कीं आज कामावर परतणाऱ्या प्रत्येकजणाला गेल्या सबंध आठवड्याचें वेतन मिळेल. पुष्कळजण आपला पैसा मिळविण्यासाठीं तोंड दाखवितात. बँका उघड्या आहेत आणि 'अेम्. टी. आय्.' क्रांतिकारी समितीचा नव्यानें निवडलेला अध्यक्ष म्हणून सेवकवर्गाचें वेतन द्यायला लागणारा पैसा घ्यायला मी जातों.

तिसऱ्या प्रहरीं बुडापेस्ट आकाशवाणीवरून इम्रे नागी एक भाषण करतो. आठवडाभर नागीची चलबिचल होत आहे, परंतु स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धाच्या धुमाळींत त्यानें सरते शेवटीं हंगेरीच्या राष्ट्राला साथ देण्याचा आपल्या मनाशीं निश्चय केल्याचें आतां त्याच्या बोलण्यावरून दिसून येत आहे. आमच्या बहुतेक महत्त्वाच्या मागण्या पूर्ण करण्याचे आपले निर्णय तो घोषित करीत आहे.

मंत्रिमंडळानें आतां कम्युनिस्ट पक्षालाच फक्त कार्य करतां येण्याची मुभा असलेली एकपक्षीय पद्धति रद्द केली आहे. आज एक नवें सरकार बनविण्यांत आलें असून त्यांत स्वतंत्र अल्पभूमिधारक पक्षाचे बेला कोवाक्स व झोल्टान टिल्डी, आणि राष्ट्रीय शेतकरी पक्षाचा फेरेने अेर्देइ हे प्रमुख सदस्य आहेत.

सरकारनें बुडापेस्टमधूनच केवळ लाल फौजा माघारीं नेण्यास सांगितलें नाहीं तर सर्वत्र हंगेरीमधूनच सगळ्या रशियन फौजा काढून घेण्याविषयीं सांगितलें.

स्थानिक क्रांतिकारी आणि राष्ट्रीय कार्यमंडळांच्या अधिकाराला मान्यता आणि कायदेशीर स्वरूप देण्यांत येणार आहे.

झोल्टन टिल्डी स्वातंत्र्यसैनिकांना 'राष्ट्रीय संरक्षक दल' म्हणून संघटित करण्याची आपली योजना जाहीर करतो. संयुक्त राष्ट्रसंघांत हंगेरीबद्दल गैरसमजूत करून देणाऱ्या देशद्रोही पीटर कोस ह्याला बडतर्फ करण्यांत आल्याचें निवेदन तो करतो. पिकांचा सक्तीनें भरणा करण्याची पद्धति आजपासून रद्द करण्यांत आली आहे.

टिल्डी आणि अेर्देइ हे अल्पभूमिधारक आणि शेतकरी पक्षांची, कबूल केलेल्या नव्या निवडणुकांच्या तयारीसाठीं, त्वरित पुनर्घटना करण्याची हांक देत आहेत.

राजकीय भाषणानंतर बुडापेस्ट आकाशवाणी, ज्याचें लोकांना जरा देखील आश्चर्य वाटत नाहीं असा एक कबुलीजबाब देत आहे : "अनेक वर्षांपासून आकाशवाणी असत्यांचें तुणतुणें बनली होती. ती रात्रंदिवस असत्य ओकीत होती, तिच्या सर्व ध्वनिलहरींवरून असत्याचें थैमान चाललें होतें. आमच्या देशाच्या पुनर्जन्माच्या घटकेला देखील तिनें आपली असत्याची मोहीम थांबवली नव्हती." निवेदकानें सोत्साह भाषणाची सांगता करतांना म्हटलें,– "राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादन करणाऱ्या लढ्यानें आमची आकाशवाणी देखील स्वतंत्र केली. ज्यांनीं तीं असत्यें कथन केलीं होतीं, ते हंगेरीच्या आकाशवाणीच्या सेवकवर्गांत इतउत्तर उरलेले नाहींत. आतां ध्वनिक्षेपक यंत्रापुढें असणारे आम्ही सर्वजण नवे आहोंत. आम्ही सत्यकथनच करूं."

त्या घडीपासून बुडापेस्ट आकाशवाणीनें आपलें नांव बदलून 'स्वतंत्र कोस्सुथ आकाशवाणी' हें नांव धारण केलें आहे.

स्वातंत्र्याच्या लढ्यांत आज आणखी एक प्रतीकात्मक महान् कृत्य घडून आलें. रोमन कॅथॉलिक पंथाचा हंगेरीचा पीठाचार्य जोझ्सेफ कार्डिनल मिंडस्झेन्टी याची फेल्सोपेटेनी येथें कैदेंतून मुक्तता करण्यांत आली. त्याचा छळ आणि खटला यांच्यामुळें हंगेरींतील लोकांची धर्मनिष्ठा नष्टभ्रष्ट करण्याचा कम्युनिस्टांचा कावा आतां उघडकीस आलेला आहे.

त्याला गेलीं आठ वर्षें तेथें अटकेंत डांबण्यांत आलेलें होतें. आम्हांला असें कळतें कीं त्याला मुक्त करणाऱ्या तिघा अधिकाऱ्यांपैकीं एक यहुदी आहे; आणि आम्हांला असें वाटत आहे कीं ही वस्तुस्थिति सबंध हंगेरी राष्ट्राच्या ऐक्याचें आणखी एक चिन्ह आहे. 'खिस्ती तरुणांचा संघ' नामक एक नवी संस्था देखील आज स्थापन झाली आहे आणि तिचे सदस्य जमविणें सुरू आहे.

"राष्ट्रीय हवाई प्रतिकार दलाचा सर्व काफिल्याच्या" सहीनें पाठविलेला एक निर्वाणीचा खलिता स्वतंत्र कोस्सुथ आकाशवाणीवरून ध्वनिक्षेपित झाला आहे. आमचें विमानदल उर्वरित रशियन रणगाड्यांनीं बारा तासांच्या अवधींत बुडापेस्ट सोडलें नाहीं, तर त्यांच्यावर बॉम्ब टाकील.

किलियन बराकींतल्या बऱ्याच, आतां बहुतेक, दगडांच्या राशी बनलेल्या आहेत, तरी माल्टेरच्या स्वातंत्र्यसैनिकांवर रशियन रणगाडे आणि तोफखाना अजूनहि भडिमार करीत आहे. नगर पडझडीच्या गुंतावळ्यांत गुरफटून गेलें असलें, तरी अन्न दुकानें उघडीं आहेत, आणि शेतकरी खेडेंविभागांतून अधिक अन्न आणण्याचें चालूंच ठेवीत आहेत.

आज रात्रीं काळोख पडला तरी गोळीबार अजून चालूंच होता.

बुधवार, ३१ ऑक्टोबर

आम्ही जागे होऊन पाहतों तों रशियन पलटणी आणि चिलखती दलें यांनीं बुडापेस्टमधून पूर्णपणें आपली माघार घेतली आहे. शेवटचीं पथकें पार्लमेंट भवन आणि संरक्षण मंत्रणालय यांच्यापुढें आहेत. अकरा वाजतां सकाळीं त्यांनीं बाहेर पडण्यास आरंभ केला. दोन वाजेपर्यंत तिसऱ्या प्रहरीं ते निघून गेले आहेत.

प्रत्येकजण उद्दीपित झालेला आहे. आम्ही रस्तोरस्तीं कडेला उभे राहतों आणि रशियन जाऊं लागले कीं त्यांना धीर देऊं लागतों. आज कुणाच्याच हातीं काम नाहीं—सर्वजण उत्सवमग्न आहेत. बालकें पुन्हां रस्त्यांवर खेळूं लागलीं आहेत.

आमचें स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध आम्ही जिंकत आहोंत!

नव्या राजकीय पक्षांनीं कार्यास प्रारंभ केला. 'अल्पभूमिधारक', 'सामाजिक लोकशाहीवादी' (सोशल डेमोक्रॅट) आणि 'शेतकरी पक्ष' या सर्वांनीं अनेक वर्षांनीं अगदीं पहिल्यांदा आज आपापलीं वर्तमानपत्रें प्रसिद्ध केलीं आहेत.

इम्रे नागी घोषणा करतो कीं हंगेरी वार्सा करारामधून बाहेर पडण्याची आणि आपली लष्करी तटस्थता जाहीर करण्याची योजना आंखत आहे.

स्वतंत्र मिस्कोल्क आकाशवाणीवरून झालेल्या पुढील भाषणानें आम्हांला प्रेरणा मिळत आहे : "आम्ही स्वयंसिद्ध आणि स्वतंत्र अशा हंगेरीची रचना करूं. आम्ही सदसद्विवेकबुद्धीचें स्वातंत्र्य, भयवर्जित जीवन, आणि दास्यमुक्त जीवन देखील निर्माण करूं. आम्ही अशा जीवनाची निर्मिति करूं कीं ज्याला फक्त एकच आदेश मान्य असेल; हंगेरीला शस्त्रग्रहण कां करावें लागलें याचा विसर तिला कदापिहि न पडो."

आणि आज मी व्हिएन्नाला जात आहें. 'अेम्. टी. आय्.'च्या क्रांतिकारी समितीचा अध्यक्ष या नात्यानें मी स्वतंत्र जगाकडे स्वातंत्र्याप्रीत्यर्थ झालेल्या हंगेरीच्या लढ्यामधील प्रसंगांचीं मीं घेतलेलीं तीनशें छायाचित्रें घेऊन जात आहें.

स्वतंत्र जगाच्या जनतेनें आम्ही हंगेरीचे लोक स्वातंत्र्यासाठीं कसे लढलों, हंगेरींतले सर्व लोक कसे एकजूट करूं शकले आणि एक महान् विजय आम्हीं कसा संपादन केला, यांचें प्रत्यक्ष दर्शन स्वतः घेतलें पाहिजे. इतक्या स्वार्थत्यागानें आणि शौर्यानें संपादन केलेल्या या अशा विजयाची हमी संयुक्त राष्ट्रसंघानें, ज्या निवडणुकींत हंगेरींतल्या सर्व राजकीय पक्षांना भाग घेतां येणें शक्य होईल, अशी मुक्त आणि गुप्त निवडणूक आपल्या संरक्षणाखालीं घडवून आणून दिलीच पाहिजे. सोवियट युनियनला आमचें नव संपादित स्वातंत्र्य चिरडून टाकण्यापासून प्रतिबंध करण्याचा एखादा मार्ग जगानें शोधून काढलाच पाहिजे. हंगेरीच्या लोकांच्या याच आशा, आकांक्षा आणि प्रार्थना असून, त्यादेखील मी माझ्या सोबत घेऊन जाणार आहें.

प्रकरण तिसरें

क्रांतीकडे जाणारा मार्ग

कम्युनिझमच्या वर्चस्वाखालील जीवन

हंगेरीच्या स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धानें सर्व जग आश्चर्यमुग्ध झालें, याचें कारण कम्युनिस्ट प्रचारानें सर्वत्र लोकांची अशी मिथ्या समजूत करून दिली होती कीं रशिया अजिंक्य आहे आणि कम्युनिस्ट साम्राज्यांत अंतर्गत क्रांति होणें अशक्य आहे. १९५६ च्या ऑक्टोबरमधील आठ दिवसांत, आपल्या गतेतिहासांत परकीय जुलूमकर्त्यांच्या विरुद्ध अनेकदां शौर्यानें स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या हंगेरी राष्ट्रानें या मुर्दाड मिथ्या समजुतीचा फुगा फोडून टाकला आहे.

जगाला गुलाम करून सोडण्याच्या कम्युनिस्ट कटावर हा एक प्राणघातक आघातच होता. क्रेमलिनला त्यामुळेंच या मिथ्या समजुतीवर पुन्हां विश्वास बसविण्याचा प्रयत्न करण्यासाठीं विश्वव्यापी प्रचाराची मोहीम करणें भाग पडलें. चिमुकल्या हंगेरीच्या विद्यार्थ्यांनीं आणि कामगारांनीं रशियन सत्तेचा संपूर्ण भार उलथून पाडला आणि कम्युनिस्ट जुलमी राज्यकर्त्यांच्या विरुद्ध सबंध हंगेरी राष्ट्रानें एकजुटीनें उठाव केला, याचा

विसर जगाला आणि खुद्द आपल्या अंकित असलेल्या प्रजाजनांना पडणार नाहीं, अशी असाध्य भीति कम्युनिस्टांना वाटत आहे. कम्युनिस्टांच्या दृष्टीनें हें एक प्राणघातक इतरांना अनुकरणीय असें उदाहरणच होय.

असत्यांच्या आधारावर आणि बनावट छायाचित्रांवर रचलेला कम्युनिस्ट प्रचार प्रत्येक देशांतून पूर्ण झपाट्यानें सुरू आहे. स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध म्हणजे 'पश्चिमेच्या हस्तकांचा', किंवा 'जमीनदार आणि भांडवलदारांचा', अथवा 'प्रतिक्रांतिकारक कटवाल्यांचा' अगर 'कटवाले आणि फासिस्ट' यांचा एक उठाव होता अशी लोकांची समजूत व्हावी, यासाठीं त्यांची धडपड चाललेली आहे. या असत्य प्रचाराचें कारण अंशतः रशियन आक्रमणाचें 'समर्थन' करणें हें देखील आहे. शिवाय आणखी एक गर्भित कारण म्हणजे त्यांना वाटणारी भीति होय,—भीति अशासाठीं कीं जर सत्य दडपून टाकलें नाहीं तर हंगेरीच्या स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध कम्युनिझमच्या अंताच्या मूलारंभाची निशाणी ठरेल.

हंगेरीच्या स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध जुंपण्याचें कारण काय? सबंध जनता—एक संपूर्ण राष्ट्र—परक्यांनीं पाठिंबा दिलेल्या राजवटींत अधिकार गाजविणाऱ्या अशा अत्यल्प मूठभर माथेफिरू कम्युनिस्टांच्याबरोबर एकजुटीनें कसें लढलें? इतउत्तर मान लवविण्यापेक्षां निर्भयपणानें मरणाला तोंड देण्याचें असलें धैर्य, असली आत्मार्पणाची वृत्ति, असली मृत्यूशीं झगडण्याची तयारी सर्व जनता कशी दाखवूं शकली? तरुण मुली आणि मुलगे, सामान्य कामगार, साध्या गृहिणी, हे सर्वजण स्वातंत्र्यासाठीं मरायला असे सिद्ध कां झाले? सबंध राष्ट्रानें अशा प्रकारें कृति केल्याचीं उदाहरणें इतिहासांत वारंवार घडत नसतात.

स्वतंत्र जगांत येऊन पोहोंचल्यापासून मला वारंवार अशा प्रकारचे प्रश्न विचारण्यांत येत आहेत. या प्रश्नांचीं उत्तरें समजूत घेण्यासाठीं जिज्ञासूला दहा वर्षांपूर्वीं रशियनांचा पाठिंबा असलेल्या कम्युनिस्टांनीं सत्ता हस्तगत केल्यापासून हंगेरीमधील जीवनासंबंधीं थोडीतरी माहिती करून घेणें आवश्यक आहे. या सामुदायिक उठावाच्या कारणांचीं पाळेंमुळें खोलवर गेलेलीं आहेत. गेल्या दहा वर्षांतील अत्याचार, अमानुषपणा,

पिळवणूक, भूक, दहशत आणि पशुता यांच्यांत तीं पसरलेलीं आहेत. हंगेरी राष्ट्राला कम्युनिस्ट वर्चस्वाखालीं जाचाचें जीवन निष्क्रियतेनें जगणें यापुढें असह्य झालें. स्फोटाचा क्षण येऊन ठेपला. युद्धाची सुरुवात ज्या क्षणीं झाली तो नक्की क्षण अंशतः ऑक्टोबर २३ ला 'अे. व्ही. अेच्.' हस्तकांनीं पाठमोऱ्या जमावावर गोळीबार केल्यामुळें उद्भवलेली आकस्मिक घटना होती. परंतु स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध मात्र अपरिहार्य होतें.

कामगार

स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धांतील दीर्घकाल चाललेल्या अत्यंत तीव्र लढाया औद्योगिक विभाग, कामगार वस्त्या आणि खाणींचीं क्षेत्रें यांच्यांतच घडून आल्या होत्या. तसें होणें स्वाभाविकच होतें. कम्युनिस्टांच्या 'कामगारांच्या नंदनवना'चा जिवंत रौरवांत कायापालट झालेला होता. कम्युनिस्ट सरकारनें कोणत्याहि इतर पद्धतीपेक्षां, गुलामगिरीप्रथेपेक्षां देखील, अधिक निर्घृणपणानें कामगारांची पिळवणूक केलेली आहे. त्यांच्यामधील शक्तीचा शेवटचा बिंदु शोषून घेईतोंपर्यंत त्यांना जखडून ठेवण्यांत आलेलें आहे. आपल्याला बद्ध करून ठेवणाऱ्या शृंखला तोडण्यासाठीं लढणाऱ्या कामगारांइतकें सबळ कारण अन्य कुणालाहि नव्हतें.

हिस्सेरशी पद्धति

उत्पादन वाढविण्यासाठीं प्रत्येक दुकानांत आणि कारखान्यांत एकेक कार्यप्रवीण तज्ज्ञ (कित्तालायक) असून त्याचें कार्य कामाचा 'कित्ता' किंवा हिस्सा ठरविण्याचें असतें. हिस्सा याचा अर्थ प्रत्येक व्यक्तिगत कामगारानें आपली (आधींच अल्पशी असलेली) संपूर्ण मजुरी मिळविण्यासाठीं ठराविक वेळांत आवश्यकपणानें करावयाचें काम होय. जर त्याचें काम अपुरें झालें तर त्याला आरोपी ठरविण्यांत येतें.

उदाहरणार्थ, एका भटारखान्यांत एका कामगाराचा कामाचा हिस्सा, समजा, दर तासाला वीस रोट्या करण्याचा आहे. एके दिवशीं कार्यप्रवीण तज्ज्ञ येतो. तो कामगारावर नजर ठेवतो, टिपणें घेतो, थांबत्या घड्याळाच्या साहाय्यानें त्याच्या कामाचा काळ मोजतो, आणि शेवटीं सांगतो कीं आतां

यापुढें त्याच्या कामाचा दरताशीं हिस्सा तीस रोट्या राहील. सामान्यतः या तज्ज्ञांना रोटी शेकण्या–भाजण्याची क्रिया किंवा अवांतर उत्पादनकृती यांच्याविषयीं बिलकुल ज्ञान असत नाहीं. अधिकाधिक हिस्सेरशी वाढविण्यावरच ज्यांची राजकीय कारकीर्द अवलंबून आहे, असे ते विश्वासपात्र कम्युनिस्ट असतात. अशा व्यक्तीनें ठरवून दिलेल्या हिस्सेरशीच्या अंकांवर आपल्या कुटुंबाचा आधार अवलंबून असल्याबद्दल एखाद्या कामगाराला काय वाटत असेल याची कल्पना करणें फारसें कठीण नाहीं.

कम्युनिस्ट राजवटींतल्या लांचखाऊपणाचें एक वैशिष्ट्य असें कीं या हिस्सेरशी-तज्ज्ञांची सामान्यतः मूठ दाबतां येते. जेव्हां या तज्ज्ञाला एखादा कामगार आपल्या वेतनांतून हप्ता देतो, तेव्हां हिश्शाची आकारणी अधिक रास्त पातळीवरून होत असते. दुसऱ्या आठवड्यांत पुन्हां हिस्सेरशी वाढविण्यासाठीं तज्ज्ञ त्या बाजूला फिरकणार नसल्याची मात्र ही हमी समजूं नये !

कम्युनिझमच्या वर्चस्वाखालीं कामगाराला आपलें काम सोडून दुसरें एखादें चांगलें काम शोधण्याची मोकळीक नाहीं. त्यानें तसें करतों म्हटलें तर तो भलत्याच कचाटींत सांपडतों. त्याच्या वेतनांत घट होईल, त्याची रजा रद्द होईल, किंवा त्याला कांहीं मुदतीची सक्तमजुरीची शिक्षा देखील होऊं शकेल.

या हिस्सेरशी पद्धतीमुळें होणारा एक परिणाम तर आधींपासूनच ठरलेला आहे. हिस्सेरशी वर चढली कीं इकडे उत्पादन केलेल्या मालाचा दर्जा सतत वाईट होत जाणार.

'स्टाखानोविट'

उत्पादन वरवर नेण्याच्या निष्ठुर धकलपट्टींत वापरण्यांत येणारी दुसरी फसवणूक म्हणजे "स्टाखानोविझम"ची, रशियन अनुकरणानें स्वीकारलेली, जबरीच्या चढाओढीची पद्धति होय. या पद्धतीचा नखरा चालूं ठेवणाऱ्या धंदेवाईक खट्याळांना "स्टाखानोविट" म्हणण्यांत येतें.

कम्युनिस्ट या स्टाखानोविट रंगरूटांना, कामगारांचा दर्जा असणारां-

मधून नाना प्रकारचीं अभिवचनें देऊन भरती करून घेतात आणि इतर कामगारांना आपलें पूर्ण वेतन मिळविण्यासाठीं नंतर तसेंच करणें भाग पडावें, अशी कामाची, व्यवहारतः अशक्यप्राय, हिस्सेरशी ठरविण्यासाठीं, त्यांना राबवून घेतात. या स्टाखानोविट बहादुरांना, किंवा मार्ग घालून देणारांना, कामाच्या सर्व अनुकूलता,—नव्यांतलें नवें यंत्र, सामान्य कामगारांना एक मदतनीस, तर त्यांना दोन, (या जादा मदतनिसाला 'शिकाऊ' म्हणण्यांत येईल) इत्यादि देण्यांत येतात. परंतु ही रेशमी वागणूक मिळून देखील स्टाखानोविट सामान्यतः कालांतरानें अतिश्रमामुळें दमतात आणि आजारी पडतात.

स्टाखानोविट हा 'कम्युनिस्ट मानवा'चा नवा नमुना असून, त्याला आपल्या कामाव्यतिरिक्त कशांत देखील गोडी वाटूं नये, अशी अपेक्षा त्याच्याबद्दल करण्यांत येते. एक सदभिरुचिपूर्ण हंगेरियन थट्टेखोर म्हणतो, कीं स्टाखानोविट हा एखाद्या रविवारीं तिसऱ्या प्रहराच्या सुंदर समयीं देखील आपल्या प्रियकरणीबरोबर कारखान्याव्यतिरिक्त अन्य कांहींसुद्धां बोलूं शकणार नाहीं. वस्तुतः तो दुःखीकष्टी, दमलाभागलेला आणि आपल्या जोडीदार कामगारांकडून ज्याची 'गुलामांना हांकीत नेणारा कम्युनिस्टांचा भडवा' म्हणून अवहेलना होते, असा एक त्यांच्याच तिरस्काराला पात्र झालेला माणूस असतो.

मानवी शक्तीचें असें शोषण करूनच कांहीं कम्युनिस्टांची अघोरतृष्णा थांबत नसते. ते उत्पादनाच्या यांत्रिक साधनांचा देखील दुरुपयोग करतात. उदाहरणार्थ, रशियनांनीं हंगेरींतील खाण कामगारांवर एक अशी नवी योजना लादली कीं तिच्यामुळें सबंध खाणीच्या उद्योगधंद्याचा बहुतेक चुराडा झालेला आहे. त्या पद्धतीला 'उष्ण कुऱ्हाडी घे हातीं' (हॉट पिक—ॲक्स) कार्ययोजना म्हणत असत. म्हणजे असें कीं एखादें यंत्र कधींहि थांबविल्याशिवाय महिनोगणती काम करीत राखावें. पुढच्या पाळीच्या कामगाराला आपल्या वेळेच्या आधीं यंत्राचा ताबा 'कुऱ्हाडी हातीं' अगदीं 'उष्ण' अवस्थेंत घेण्यासाठीं कामाच्या जागीं यावें लागतें. माणूस

किंवा यंत्र यांना उसंत नव्हती. वेळींच त्यांतला एक किंवा दोघेहि स्फोटक बिंदूपर्यंत पोंचत असत.

"कालच्यापेक्षां आज अधिक उत्पादन करा."

लालभाईंच्या शोषणतंत्राचें एक आणखी उदाहरण म्हणून आर्पाद लोय नांवाच्या एका स्टाखानोविट खाण कामगाराचें प्रकरण घेऊं. हा आपल्या खाण कामगाराच्या गणवेषांत खांद्यावरील फिती आणि छातीवरील बिल्ले घातले कीं एखाद्या लष्करी सेनानीप्रमाणें मुख्यतः वाटत असे. मीं एकदां लोयशीं संभाषण केलें. आपल्याला कम्युनिस्टांनीं एक नवी 'चळवळ' सुरू करण्याच्या जाळ्यांत लबाडीनें कसें गोवलें, याची हकीगत त्यानें मला सांगितली.

"एक बातमीदार आणि एक छायाचित्रकार माझ्या कामासंबंधीं माझी मुलाखत घेण्यासाठीं आले," तो सांगूं लागला, "मीं सहज उल्लेख केला कीं 'त्या दिवशीं मीं हिस्सेरशीपेक्षां जादा काम केलें,' आणि अशा रीतीनें आदल्या दिवसापेक्षां सरस ठरलों. जरा वेळ आम्हीं गप्पा मारल्या आणि ते निघून गेले.

"दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांतला लेख वाचून मी आश्चर्यचकितच झालों. त्यांत म्हटलें होतें कीं मीं एक 'कालच्यापेक्षां आज अधिक उत्पादन करा', नांवाची नवी चळवळ सुरू केली आहे. त्या संध्याकाळीं मला माझ्या मित्रांना, त्यांच्या संतापाच्या उद्रेकांमुळें, तोंड दाखविण्याची भीति वाटत होती.

"दुसऱ्या दिवशीं रात्रीं मला पक्षकचेरीकडून बोलावणें आलें. माझें अभिनंदन केल्यावर मला तात्काळ इषारा देण्यांत आला कीं मीं सुरू केलेली चळवळ म्हणजे माझ्याकडून पक्षावर झालेला एक अत्यंत मोठा उपकार देखील ठरूं शकेल. तेव्हांपासून मला माझ्या घोषणेला चिकटून रहावें लागतें आणि दररोज आदल्या दिवसापेक्षां अधिक काम करावें लागतें."

कम्युनिस्ट वर्तमानपत्र 'स्झाबाद नेप' (स्वतंत्रजनता) यानें हें तंत्र

उपयोगांत कसें आणलें याची संभावना एका लोकप्रिय चेष्टेंत केलेली आहे, 'काल तुम्हीं जेवढें असत्य सांगितलें, त्यापेक्षां अधिक असत्य आज सांगा.'

'समाजकार्य'

कामगारांचा फावला वेळ लबाडीनें लुबाडण्यासाठीं सुद्धां कम्युनिस्टांनीं अनेक युक्त्या शोधून काढलेल्या आहेत. कम्युनिस्टांनीं ठरविलें कीं लोकांना जर विचार करायला फुरसतच दिली नाहीं, तर त्यांच्यावर आपली पकड मजबूत ठेवणें अधिक सुलभ जातें.

'समाजकार्य' या संज्ञेचा एक नवा अर्थ लावण्यांत आला. 'कारखान्याचा भोंगा वाजला कीं दिवसाचें काम संपलें, असें नव्हे,'–हाच तो नवा अर्थ होय. कामगारांना मग विनावेतन रस्ते किंवा तथाकथित 'सांस्कृतिक केंद्रें' बांधावीं लागत. अशा 'समाजकार्य' योजनांनीं बुडापेस्ट-मध्यें 'जनतेचें क्रीडाभवन' (पीपल्स स्टेडियम) आणि 'स्टॅलिन स्केअर' (चौक) बांधण्यासाठीं मनुष्यशक्ति पुरवली आणि सर्वत्र देशांत अशा रीतीनें बांधण्यांत आलेल्या अनेक इतर बांधकामांपैकींच हीं फक्त दोन होत.

'समाजकार्या'साठीं 'आपखुषीनें' रंगरूट भरती करण्यांत येत होतें. भरतीचा मार्ग असा हाताळण्यांत येई :–एक पक्ष-प्रतिनिधि एखाद्या कारखान्यांत जाई आणि घोषणा करी, "कॉम्रेड, 'एक संस्कार केन्द्र' बांधायला मदत करण्यासाठीं मला तीन स्वयंसेवक हवेत." नित्याप्रमाणें जेव्हां एकजण देखील पुढें सरत नसे, तेव्हां तो कुठल्याहि तिघांकडे बोट दाखवी आणि ते बलि मग असे 'समाजकार्यकर्ते स्वयंसेवक' बनविले जात. त्यांच्यांतील कुणालाहि हरकत दर्शविण्याची हिंमत होत नसे; कारण तात्काळ त्यांना साम्राज्यशाहीचे हस्तक किंवा प्रतिगामी म्हणून बदनाम करण्यांत येई. याचा अर्थ बडतर्फी किंवा तुरुंगवासाची शिक्षा देखील मानण्यांत येई.

'शांततेसाठीं जागरूकता'

'समाजकार्या'चें आणखी एक स्वरूप होतें, त्याला 'शांततेसाठीं

जागरूकता' असें म्हणत. याचा अर्थ सार्वजनिक इमारतींवर रजांचे दिवशीं आणि आठवड्याच्या अंतिम दिनीं 'पहारेकरी' म्हणून काम करणें होय.

माझ्या एका मामाला एका कारखान्यांत कारकुनीची नोकरी होती. कम्युनिस्टांनीं त्याचें दुकान जप्त करण्याचे पूर्वी तो व्यापारी होता. माझ्याजवळ तो तक्रार करीत होता कीं त्याला एक रविवार सोडून येणाऱ्या प्रत्येक आड रविवारीं व्यर्थ राबावें लागतें. कारण त्याची नेमणूक 'शांततेच्या जागरूकते'साठीं 'स्वयंसेवक' म्हणून झालेली आहे.

अशा प्रकारच्या कामासाठीं बहुधा पक्ष सभासद नसणाऱ्या कामगारांना निवडण्यांत येतें. सक्तीच्या वेठबिगारीवर आवरण घालण्यासाठीं कम्युनिस्ट 'शांतता' या शब्दाचा उपयोग करीत असतात. 'शांततेसाठीं जागरूकता' पत्करण्याचें काम जर एखाद्या कामगारानें नाकारलें तर त्याला शांतताविरोधी आणि म्हणूनच राज्याचा वैरी ठरवीत असत.

कम्युनिस्ट वर्चस्वाखालीं असलेल्या देशांतील जनतेला सर्वसाधारण व नित्याची वाटणाऱ्या, खालच्या दर्जाच्या राहणीचें मान आणि विपत्ति यांची कल्पना स्वतंत्र जगांतल्या, विशेषतः पश्चिमेमधील कुणाहि व्यक्तीला करतां येणें अशक्य आहे. हंगेरींत आई, बाप आणि मुलें या सर्वांनाच, उपजीविकेची किमान पातळी कायम ठेवण्यासाठीं, राबणें भाग पडतें. राज्यांकडून मिळणाऱ्या अल्पवेतनाला आणखी पुन्हां-कर, पंचवार्षिक योजना कर्जे आणि 'शांतता कर्जे' यांची कात्री लागतेच.

कारखान्यांतलीं जेवणघरें

कम्युनिस्ट राजवटीनें जरी हंगेरींतल्या कामगाराला सतत पुढें हांकलीत नेलें आणि त्याला उत्पादन वाढविण्यास जबरीनें भाग पाडलें, तरी त्याच्या अत्यंत मूलभूत गरजा भागविण्यासाठीं देखील कांहींहि केलें नाहीं. दुपारच्या जेवणाचे वेळीं त्याला आपल्या घरून जें काय आणलें असेल तें खाऊन भागवावें लागतें, किंवा कारखान्यांतल्या जेवणघरांत जाऊन फक्त दोनच प्रकारच्या ताटांतून एकाची निवड करणें भाग पडतें. कामगार पहिल्या

9613167

प्रकारच्या ताटाला 'लांकडी बांका 'चें जेवण असें (आगगाडीच्या तिसऱ्या वर्गातील कठीण लांकडी बांकांना अनुलक्षून) थट्टेनें म्हणत, आणि दुसऱ्याला 'गादीचें' जेवण म्हणत. प्रत्यक्षतः कोणत्याहि जेवणांत पुरेशा आहारमूल्यांचा पुरवठा नसे. कारखान्यांतल्या जेवणघरांसंबंधीं तक्रार करणारीं अनेक पत्रें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालीं, परंतु त्या बाबतींत कधींहि कांहींहि करण्यांत आलें नाहीं.

'शांतता कर्जे'

कम्युनिस्ट सरकार १९४९ पासून दरवर्षीं एकदां पुढील घोषणा जाहीर करीत असतें,—

"देशकल्याणार्थ आणि स्वतःसाठीं शांतता कर्जास आपली वर्गणी द्या."

एकदां ही घोषणा प्रसिद्ध झाली कीं वर्गणी गोळा करणारे कम्युनिस्ट हस्तक आणि वर्गणी टाळूं इच्छिणारे नाखूष कामगार यांच्यामध्यें रस्सीखेंच सुरू होते. सामान्यतः या सक्तीच्या वर्गणीची रक्कम कामगाराच्या उत्पन्नाच्या शेंकडा ५ ते १० टक्के असते. जो वर्गणी भरत नाहीं किंवा खूप आढेवेढे घेतल्यावर भरतो, त्याचें नांव काळ्या यादींत दाखल होतें, म्हणजे कधींतरी त्याला कामावरून काढण्यांत येईल हा त्याचा अर्थ.

सरकार वर्गणीदारांसाठीं 'तोंड लावणें' म्हणून एक सोडत दरवर्षीं काढत असतें. परंतु त्या सोडतींत लबाडी असतेच. सरकारनें आधींच विजयी उमेदवार निर्णीत केलेले असतात. कम्युनिस्ट करकोचे कोल्ह्याचें खिरीचें भांडें आपसांतच वांटून खातात. जिकणारे नेहमींच 'पक्षांत' वरिष्ठपदीं विराजमान झालेले नेकजात कम्युनिस्ट असतात.

सेवकांची नोंदवही

कारखाने आणि कचेऱ्या यांच्यामधून अत्यंत धास्ती वाटण्याजोगा अधिकारी म्हणजे सेवकवर्गाच्या खात्याचा प्रमुख होय. या खात्याकडून 'अे. व्ही. अेच्.' या सुरक्षा पोलिस खात्याकडे शेरे पाठविण्यांत येत असतात. सेवकवर्गाच्या खात्याचें चुगलखोरांचें एक जाळें पसरलेलें असून त्यांच्यामार्फत आलेली माहिती कामगाराच्या 'सेवक नोंद' वहींत दर्ज

करण्यांत येते. कामगाराच्या या वहींत त्याचा जीवनेतिहास, विशेषतः त्याची राजवटीसंबंधीं अप्रीति दर्शविणारी प्रवृत्ति आढळल्यास त्याचा इतिवृत्तांत अत्यंत सविस्तरपणें दाखल करण्यांत येतो.

कामगारावर केवळ त्याच्या कामाच्या वेळींच नव्हे, तर त्याच्या खाजगी जीवनक्रमाच्या प्रसंगीं देखील नजर ठेवण्यांत येत असते. प्रत्येक चाळींत पक्षाचा स्वतःचा हस्तक असून तो तेथील सर्व भाडेकरूंवर गुप्त नजर ठेवीत असतो. त्याचे अहवाल 'सेवक नोंद वही' पर्यंत वाटचाल करीत असतात. या पद्धतीनें आपल्या खासगी वैऱ्यांच्या वहींत खोटे आणि द्वेषानें बरबटलेले खट्याळ अहवाल सहज दडपतां येतात.

स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धापर्यंत या 'सेवक नोंद' वह्यांना अत्यंत विश्वासार्ह कम्युनिस्टांवांचून अन्य कुणाचेहि हात पोंचूं शकत नसत. तथापि, क्रांतिकालांत बऱ्याच वह्या उजेडांत येऊं शकल्या.

उदाहरणार्थ, ही वही माझ्या एका मित्रासंबंधीं असून मीं स्वतः ती तपासून पाहिली आहे. ती मासलेवाईक द्वेषानें भरलेली आहेः—

ल.: जन्म १९—

बापाचें नांव झ.: कुळ: कामगार, रोटीवाला.

आईचें नांव य.: कुळ: पेटीवुइर्वा (पांढरपेशा), कारकून.

ल.चें स्वभाववैशिष्ट्य: ल. एका पांढरपेशा कुळांत जन्मला आहे. त्याचा बाप व्यापारी होता, परंतु त्याच्या दुकानाचें १९४८ मध्यें सरकारनें राष्ट्रीयीकरण केलें. ल. आपल्या कामावर नियमित हजर राहत असला तरी त्याच्या राजकीय दृष्टिकोणाच्या बाबतींत तो पूर्णपणें बेभरंवशाचा आहे. १९४४ मध्यें तो पश्चिम युरोपांत गेला होता. असें म्हणतात कीं नाझींनीं त्याला कैद्यांच्या छावणींत डांबलेलें होतें, आणि १९४७ पर्यंत तो स्वदेशीं परतला नव्हता.

कॉम्रेड क याच्या जबानीप्रमाणें ल नियमितपणें आपल्या जोडीदार कामगारांना पश्चिमेंतील जीवनाच्या लाभाविषयीं प्रवचनें देत असतो. आपल्या बापाचें दुकान जप्त करणें बेकायदेशीर आहे असें त्यानें

१९४८ मध्यें म्हटलें होतें आणि म्हणून त्याची नोकरी गेली होती. त्याच वर्षीं त्याला, अमेरिकन दूतनिवासामधल्या ग्रंथालयांत तो गेल्याची माहिती समजल्यावरून, हेरगिरीच्या आरोपाखालीं कैद करण्यांत आलें होतें. कांहीं थोडे महिने तो इस्पितळांत होता. सरते शेवटीं १९४९ मध्यें त्यानें आमच्या कारखान्यांत नोकरीसाठीं अर्ज केला. १९५० मध्यें दोनदां बेदिली माजविल्याबद्दल शिस्तीच्या नांवाखालीं त्याची चौकशी झाली होती.

इतरांच्या पुढ्यांत ल नें असें म्हटलें कीं, "पंचवार्षिक योजना मूर्खपणाची असून, "त्या टकल्या ठेंगोबानें" (कॉम्रेड राकोसीनें) हंगेरीच्या जनतेचा छळ करण्यासाठींच केवळ शोधून काढलेली आणखी एक क्लृप्ति होय." याची खबर योग्य त्या अधिकाऱ्यांच्या कानांवर घातलेली होती. तथापि कॉम्रेडांचें मत असें पडलें कीं ल आपल्या कामाच्या बाबतींत अजोड असल्यामुळें त्याच्या विरुद्ध तूर्त कांहींहि उपाययोजना करूं नये. कॉम्रेडांची शिफारस अशी आहे कीं आपण त्याला फिरून शिकवणूक द्यावी. त्यानें आपल्या परदेशांतील नातेवाईकांबरोबरचा पत्रव्यवहार थांबविला आहे.

ल नें १९५१ मध्यें विश्वासपात्र कॉम्रेड डी हिच्याशीं विवाह केला. कॉम्रेड डी हिनें ल ला फिरून शिकवणूक देण्यांत मदत करण्याचें अभिवचन दिलेलें होतें. तेव्हांपासून ल पक्षांच्या सभेला हजर राहत असतो; परंतु तो फार निष्क्रिय आहे. आम्ही वारंवार त्याच्याकडे क्रियाशीलांना भेटायला पाठवीत असतों, परंतु ते जेव्हां त्याला चळवळ्या म्हणून गोवूं पाहतात, तेव्हां तो आजारपणाची सबब सांगतो. तो सदा कारखान्यांत 'टाय' बांधून जातो आणि अशा रीतीनें आपल्या पेटीबुइर्वा जातीवर भर देतो.

डॉयरेक्टर स यांच्या सूचनेवरून आम्हीं तरुण कॉम्रेड म ह्याला ल बरोबर काम करायला आणि त्याच्याशीं गप्पागोष्टी करायला पाठविलें आहे. असें ठरलें आहे, कीं कॉम्रेड म नें ल ची निपुणता शिकून घेतली म्हणजे आम्हीं ल ची कारखान्यांतून हकालपट्टी करावी.

एका पक्षसभेंत कॉम्रेड फ नें ल वर अनीतिमान कौटुंबिक जीवन आणि मद्यपान यांसंबंधीं आरोप करून झोड उठविली. यावर ल नें असें तिरसट-

पणानें उत्तर दिलें कीं "जेव्हां आपण डी बरोबर लग्न केलें तेव्हां आपल्याला पत्नीऐवजीं पक्षचिटणिसाचें पाणिग्रहण करावें लागेल, हें माहीत नव्हतें." कॉम्रेड ल ची हकालपट्टी करण्यांत आली.

'कॉम्रेड ल 'शीं माझा चांगला परिचय आहे. तो अत्यंत निष्णात असा हंगेरियन इंजिनियर असून गेलीं कांहीं थोडीं वर्षें त्याला आपल्या मित्रांच्या मेहेरबानीवर कसेंबसें जिणें कंठावें लागत होतें. त्याच्या कम्युनिस्ट बायकोनें त्याला टाकून दिलें. क्रांतीच्या कांहीं महिने आधीं त्याची माझ्याशीं भेट झाली होती, तेव्हां तो निष्कांचन, लक्तरांत वेढलेला आणि भुकेनें गांजून गेलेला होता. हंगेरींतून निसटून जाण्याची त्याची इच्छा होती.

माझी पुन्हां त्याच्याशीं क्रांतीच्या पहिल्या दिवसांत भेट झाली. त्यानें आनंदाच्या भरांत हात हलवून मला म्हटलें, "आतां आपल्या प्रिय हंगेरीचा त्याग आपल्याला करावा लागणार नाहीं. आतां येथें स्वदेशांतच आम्ही आमच्यासाठीं नंदनवनाची उभारणी करूं."

आजारपण आणि औषधें

अधिक उत्पादनाची सतत वाढणारी मागणी, हार न खाणारी हिस्सेरशी पद्धति, गुलामांना हांकलत नेणारे स्टाखानोविट या सर्वांनीं इस्पितळांत अति दाटी निर्माण करणाऱ्या कामगारांच्या शारीरिक दुर्गतीला हातभार लावलेला आहे. चुगलखोरांच्या जाळ्यांचा घट्ट होणारा वेढा, बोलण्यांत चुकून एखादा कमीजास्त शब्द निघाल्यास काय परिणाम घडेल, याची सतत वाटणारी धास्ती, मानवी प्रतिष्ठेच्या सन्मानाचा संपूर्ण अभाव,—या गोष्टींच्यामुळें तर अनेक लोकांना जवळ जवळ वेड लागण्याची पाळी आली. राष्ट्राच्या सरहद्दी अगदीं नाकेबंदी करून घट्ट आवळलेल्या आहेत, याची जाणीव ही अविचाराच्या आणि नैराश्याच्या भावनेंत भर घालीत होती.

कम्युनिस्ट पद्धतीपायीं अंथरूण धरलेल्या कामगाराला मदत करण्यासाठीं सरकार काय करीत असतें? प्रत्येक वैद्यकीय सल्ला देणाऱ्या खोलीच्या भिंतीवर टांगण्यांत आलेले पुढील ब्रीदवाक्य—"आम्हांला मानवाचें

मूल्य महान् वाटतें " किंवा " परकीं औषधें देखील प्रत्येक रोगावर गुणकारी नसतात, " ही घोषणा कम्युनिस्ट कोणत्या प्रकारें आचरणांत आणतात ?

आजारी कामगारानें प्रथमतः आपल्या स्वतःच्या कारखान्यामधील डॉक्टरची भेट घेतली पाहिजे. हा डॉक्टर बहुधा कम्युनिस्ट तरी असतो किंवा कारखान्यांतल्या पक्षनेत्याचा स्नेही तरी असतो. आजाऱ्याला मिळूं शकणारे फायदे अत्यंत पराकाष्ठेच्या रोग्यांनाच मिळूं द्यावेत, अशी सूचना कारखान्याच्या डॉक्टरला केलेली असते.

उदाहरणार्थ, व घरीं ज्वरानें आजारी पडला आहे, आणि त्यानें आपल्या कारखान्यांतल्या डॉक्टरला कळविलें आहे. दुसऱ्या दिवशीं डॉक्टर त्याला निरोप पाठवितो कीं, ज्या अर्थीं त्याला ज्वर आला आहे त्या अर्थीं त्यानें आपल्या जिल्ह्याच्या वैद्याकडे जावें. व ची प्रकृति खालावते. तो विभागवैद्याला बोलावणें धाडतो, पण तो कळवतो कीं अत्यंत कामामुळें त्याला त्याच्या घरीं जातां येत नाहीं, तथापि केवळ १०२ अंशांइतका ज्वर असणाऱ्या—" रोग्यानें जर गरम पोषाख केला तर "—त्याला अजून बाहेर पडणें शक्य असतें. व मग तसा पोषाख करून डॉक्टरच्या कार्यालयांत जातो. दोनतीन तास ताटकळत बसल्यावर त्याची तपासणी होऊन तो आजारी पडल्याचें दिसून येतें, आणि त्याला औषध देऊन त्याची घरीं रवानगी होते.

पण येथेंच कांहीं सगळें संपत नसतें. आतां कारखान्यामधले तपासनीस व कडे येऊन तो खरोखरच आजारी असल्याची शहानिशा करून घेतात. ही भेट दिल्यानंतर ते आजारी व आणि त्याचें घर यांच्यासंबंधीं पुढील रूपरेषा असलेला गुप्त अहवाल सादर करतील;—

" तारीख·····. व आजारी असल्यामुळें त्याच्या घराला भेट. कॉम्रेड व अंथरुणांत होता आणि त्याला १०२ अंश ज्वर असल्याचें त्याची पत्नी सांगत होती. त्याच्या घराचा थाटमाट पांढरपेशा पद्धतीचा आहे; त्याच्याकडे रेडिओ आणि विश्रांतीची खुर्ची देखील आहे. त्याच्या पुस्तकसंग्रहांत स्टालिनचे ग्रंथ आढळले, तथापि त्याच्या पुस्तकांचे खण पाश्चिमात्य अधोगत वाङ्मयानें खचून भरलेले आहेत. भिंतीवर फक्त

कुटुंबांतील व्यक्तींचीं छायाचित्रें आहेत, आणि आमच्या थोर कम्युनिस्ट नेत्यांचा कुठें मागमूस देखील नाहीं. कॉम्रेड ब म्हणतो कीं तो परत कामावर जायला अत्युत्सुक आहे, कारण त्याला मिळणारा आजारपणाचा भत्ता अपुरा आहे.

सही....."

या भेटीचें खरें उद्दिष्ट उघडच आहे.

" परकीं औषधें देखील प्रत्येक रोगावर गुणकारी नसतात, " ही दुसरी घोषणा मनोरंजक आहे. परकीं औषधें म्हणजे पश्चिमेंतील बनावटीचीं औषधें. तीं हंगेरींत फक्त अल्प परिमाणांत पोंचूं शकतात. त्यांची वांटणी मासलेवाईक कम्युनिस्ट पद्धतीनें करण्यांत येत असते.

उदाहरणार्थ, 'कुटवोल्गी रोड हॉस्पिटल 'मध्यें कम्युनिस्ट श्रेष्ठींची निगा राखण्यांत येत असल्यामुळें तेथें प्रथम हीं औषधें देण्यांत येतात. त्यांतून कांहीं उरलींच तर जेथें कनिष्ठ दर्जाच्या कम्युनिस्टांवर उपचार करण्यांत येतात, त्या उपचार केंद्रांकडे पाठविलीं जातात. सामान्य कामगाराला परकी औषधांपैकीं जरादेखील कांहीं न मिळतां, फक्त भिंतीवरली घोषणा मात्र बघायला मिळत असते.

कामगार संघ

कम्युनिस्ट पद्धतींत (ट्रेड युनियन्स) कामगार संघांना एक विशिष्ट अर्थ आणि भूमिका असते. त्यांचा उपयोग सरकारचे अंमलबजावणी करणारे हस्तक म्हणून करून घेण्यांत येत असतो. असे पोलाद, गिरणी, अन्न, मुद्रण वगैरे कामगारांचे तथाकथित संघ आहेत, परंतु त्यांतला एकहि कामगारांच्या हितसंबंधांचें प्रतिनिधित्व करीत नाहीं. कामगार संघांचें सदस्यत्व सक्तीचें असतें आणि कामगाराला सरासरीनें आपल्या मासिक वेतनाचा शंभरावा हिस्सा सदस्यत्वाची वर्गणी म्हणून भरावा लागतो.

कामगार संघांचें मुख्य कार्य म्हणजे उत्पादनाचा वेग वाढविणाऱ्या कामाच्या चढाओढी घडवून आणणें होय. हे कामगार संघ दर महिन्याला कामाच्या वेळेनंतर तीनचार तास चालणाऱ्या सभा घेतात. अशा सभांतून

कोणतेंहि गाऱ्हाणें मांडणें निरुपयोगी असतें, याची जाणीव कामगारांच्या प्रत्ययास येते. कामगारांना सभांना हजर राहणें आवडत नाहीं, हें ओळखून, कामगार संघांच्या अध्यक्षांना, त्यांच्यावर दडपण आणण्यासाठीं, कम्युनिस्ट पक्षाच्या वाकनीसांना सज्ज ठेवणें भाग पडतें.

कामगार संघांना आणखी सुद्धां एक नेमून दिलेलें काम करावें लागतें, तें म्हणजे तथाकथित ('व्हेकेशन सेक्रेटरी') विश्राम चिटणिसांच्या द्वारा विश्रांतीच्या रजांवर देखरेख ठेवणें होय. अधिकृत आंकडेवार माहिती-प्रमाणें दहा ते बारा टक्के कामगारांना सरकारी विश्रामधामांत त्यांचा विश्रांतिकाल घालविण्यासाठीं निवडण्यांत येत असतें. इतर कामगारांना मुळांत विश्रांतीची रजा देणेंच परवडूं शकत नाहीं. या सरकारी विश्राम-कालामध्यें ईर्ष्या वाटण्याजोगें कांहींहि असत नाहीं, हें मी माझ्या स्वतःच्या अनुभवांवरून सांगूं शकतों. ज्या कालीं मी गेलों होतों, त्या कालीं तेथील विश्राम चिटणीसानें आमच्या प्रत्येक हालचालीबद्दल हुकूम सोडले, आणि आमच्या जागेपणींच्या सर्व तासांबद्दल आम्हांला जाब द्यावा लागला. बरोबर आठ वाजतां न्याहारी, एक वाजतां दुपारचें जेवण, आठ वाजतां रात्रींचें जेवण. कुणी उशिरां गेल्यास, त्याला खायला कांहींच मिळत नसे. अधिकृत कार्यक्रमांव्यतिरिक्त व्यक्तिगत हालचालीबद्दल नापसंती दर्शवून, तिला नकार देण्यांत येई. कधीं कधीं मला वाचन करावेसें वाटे, पण ते मला नर्तन करायला किंवा बालकांचे बैठे खेळ खेळायला भाग पाडीत.

हंगेरींत १९४५ पासून ऑक्टोबर १९५६ पर्यंत संप झाले नव्हते. अर्थात् कामगार संतुष्ट होते म्हणून नव्हे, कम्युनिस्ट सिद्धांताबरहुकूम कामगारांची सर्वोवर मालकी असल्यामुळें, जर कामगार संपावर गेले, तर ते स्वतःविरुद्ध संप करीत असतात. हा युक्तिवाद प्रतारणापूर्ण असला तरी 'अे. व्ही. अेच्. 'वाले प्रबल आहेत.

याच्या उलट बाहेरच्या जगांत होणाऱ्या कोणत्याहि संपाची हकीगत विस्तारानें कम्युनिस्टांच्या वर्तमानपत्रांतून उत्साहपूर्वक देण्यांत येत असते.

बेकारी

कम्युनिस्ट 'योजनां'च्यामुळें आर्थिक परिस्थिति जसजशी अधिकाधिक खालावूं लागली, तसतशी संपूर्ण दिवाळखोरी टाळण्यासाठीं सरकारनें कठोर धडपडी सुरू केल्या. 'काटकसर करा!' ही घोषणा सुरू झाली. कमी कामगारांच्या बळावर आधींच्या इतकेंच उत्पादन आतां काढण्यासाठीं आपलीं यंत्रसाधनें पुनःसंघटित करण्याचा आग्रह कारखान्यांच्या व्यवस्थापकांना सरकारी आज्ञापत्रें आणि प्रचारकी लेख करूं लागले. परंतु या काटकसरीच्या मोहिमेमुळें कामांवरून ज्यांची हकालपट्टी झाली, त्या कामगारांना नवें काम मिळवून देण्यासाठीं कोणत्याच योजना नव्हत्या. परिणामीं व्यापक प्रमाणांत बेकारी व तिच्याबरोबर येणाऱ्या विपदा वाढूं लागल्या.

सहस्रावधि कामगारांना १९५४ च्या प्रारंभीं दोन आठवड्यांचा बडतर्फीचा मुशाहिरा देऊन, आणि पुन्हां कामावर घेण्याची कसलीहि शाश्वति न देतां, कामावरून काढून टाकण्यांत आलें. ज्यांच्या 'सेवक नोंद वहीं'त संशयास्पद नोंदी सांपडल्या त्यांच्यावरच बहुधा या काटकसर मोहिमेचा आघात झाला,—आणि त्यांतले पुष्कळजण अत्यंत निष्णात आणि लायक कामगार होते हाच त्याचा अर्थ.

लोक अक्षरशः उपासमारीच्या धास्तीचें जिणें जगत होते. आपलें काम गमावून बसलेल्या माझ्या बऱ्याच स्वदेशबांधवांनीं आपल्या विपदांपासून स्वतःची सुटका करून घेण्यासाठीं आत्महत्या केली. परिस्थितीच्या भयंकरपणानें जागे झालेले कम्युनिस्ट बेकारांना नवें काम मिळवून देण्याचे सांत्वनपर लेख वर्तमानपत्रांत लिहूं लागले. परंतु वर्तमानपत्रें खाऊन आपलें पोट भरत नसतें!

या अशा परिस्थितींत कामगारांचा द्वेष इतक्या थराला जाऊन पोंचला होता कीं त्याचा भडका उडायला फक्त एका ठिणगीचीच गरज होती.

शेतमजूर

कम्युनिस्टांच्या मताप्रमाणें कामगार आणि शेतमजूर यांची बाजू समान

असते हें खरें आहे. शेतमजूर आणि कामगार यांच्या मानेवर एकच जूं आहे आणि त्यांना एकाच भयानें घेरलेलें आहे. तरीहि शेतकऱ्यांवर लालभाईंनीं केलेले अत्याचार शहरांतील कामगारांवर करण्यांत येणाऱ्या अत्याचारांपेक्षां देखील अत्यंत भीषण आहेत.

राकोसी राजवटीनें जेव्हां १९४८ च्या ऑक्टोबरमध्यें आपले खरे दांत दाखवायला प्रारंभ केला, तेव्हां सर्वसाधारणतः लोक असें मानून घेत होते कीं आपल्या प्रियतर जमिनी गमावण्यापेक्षां मरण पत्करायला सिद्ध असलेल्या शेतकऱ्यांच्या तीव्र प्रतिकारानें सरते शेवटीं कधींतरी कम्युनिझमचें कंबरडें मोडल्यावांचून राहणार नाहीं. पुष्कळ शेतकऱ्यांनीं आपल्या जमिनीवर पाणी सोडण्यापेक्षां किंवा लालभाईंशीं जमवून घेण्यापेक्षां तुरुंगांत आणि कैद्यांच्या छावण्यांत मरण पत्करलें. कम्युनिस्टांना सर्वच शेतकऱ्यांच्या ठायीं दुराग्रही विरोधी भावना आणि प्रतिकार आढळून आला.

जमीनविषयक सुधारणा

हंगेरींतल्या शेतकऱ्याला आंजारून गोंजारून घेण्यासाठीं आणि त्याला कम्युनिझमच्या सान्निध्यांत आणण्यासाठीं आपली लांड्यालबाड्यांनीं भरलेली सगळीच पोतडी लालभाईंनीं उपयोगांत आणून पाहिली. मोठाल्या इस्टेटी विभागून त्यांच्यांतील जमिनीचे तुकडे शेतकऱ्यांना वांटण्याचें सर्व श्रेय स्वतःकडे लाटून घेण्याचा उपक्रम कम्युनिस्ट करूं लागले. वस्तुतः दुसरें जागतिक युद्ध संपल्याबरोबरच सर्वपक्षीय सरकारनें एक जमीनविषयक कायदा जारी केला. मोठाल्या जमीनदाऱ्या जप्त केल्या आणि त्या शेतकऱ्यांना वांटून दिल्या. शेतकऱ्यांच्या ध्यानींमनीं देखील नव्हतें कीं थोड्याच वर्षांनंतर त्यांना त्यांतल्या बहुतेक जमिनी कम्युनिस्टांच्या हवालीं करणें भाग पडेल!

'सप्ताहान्त प्रचारक'

शेतकऱ्यांचें मन वळवून घेण्याची दुसरी आणखी अवलंबिलेली एक क्लृप्ति म्हणजे खेड्यांना 'आठवड्याच्या शेवटच्या दिवशीं भेटी देणारे स्वयंसेवक प्रचारक' होत. हे एक तर कम्युनिस्ट चळवळे असत किंवा

खास रविवारचें 'समाजकार्य' लादण्यांत आलेले कामगार तरी असत. शेतकऱ्यांना कम्युनिझम समजावून देणें आणि तो त्यांच्या 'माथीं मारणें,' ही कल्पना याच्या मुळाशीं होती.

हे चळवळे निशाणांनीं सजविलेल्या ट्रकगाड्यांमधून रविवारीं बाहेर निघत आणि सामुदायिक जीवनाच्या अद्‌भुत चमत्कारांचें वांगीपुराण सांगण्यासाठीं खेड्यांना धूळभेटी देत. त्यांच्या आगमनाचें खरें कारण शेतकऱ्यांना कळावयाचाच अवकाश, कीं लागलीच ते धडाधड आपलीं दारें बंद करून घेत. मला व्यक्तिशः माहीत आहे कीं, न खेड्यांमधील शेतकऱ्यांनीं एकत्र गोळा होऊन या चळवळ्यांचा पाठलाग केला आणि त्यांना चिमट्यांनीं टोचून पिटाळून लावलें! दुसऱ्या एका खेड्यांत एका शेतकऱ्यानें अशा 'लोकशिक्षका'चें स्वागत अगत्यानें केलें, आणि जेव्हां का त्याच्या प्रचाराच्या नळकांड्यांतून फवारे सुटायला सुरुवात झाली तेव्हां त्याला बोलूं न देतां म्हटलें, "कॉम्रेड, ऐकून घे. तूं जर यापुढें माझ्याशीं समाजवादाबद्दल बोललास, तर माझ्या हातून घडणाऱ्या गोष्टीची जबाबदारी मी घेणार नाहीं." त्यानें लागलीच एक सोटा उचलला आणि प्रचारकांवर चाल केली!

सामुदायिक शेतीवाडी

राजवटीच्या हुकुमशहांनीं चळवळ्यांच्या प्रयासांना आपल्या प्रयत्नांची जोड दिली. त्यांच्यांतला एक म्हणजे शेतकऱ्यांवर सामुदायिक शेतीवाडी (कोल्खोज) मध्यें सामील होण्यासाठीं दडपण आणणारे संघटक होत. प्रारंभीं सामुदायिक पद्धतीचे लाभ सांगून त्यांचें मन शांततेनें वळविण्याचा प्रयत्न ते करून बघत. जर हा उपाय फसला, तर कम्युनिस्ट नोकरशहांचा दुसरा लोंढा धाकदपटशा दाखवायला येई. जर हे सर्वच प्रयत्न अपेशी ठरले तर मग सूड उगविणें सुरू होई.

असा हिरमोड करणाऱ्या दुर्दैवी शेतकऱ्यावर इतक्या जबर करांची आकारणी करण्यांत येई कीं त्याला पैशांच्या किंवा पिकांच्या स्वरूपांत त्यांचा भरणा करणें शक्य होत नसे. पीक वसुलनवीस आणि कम्युनिस्ट

पोलिस वारंवार त्याच्या घराची अगदीं कोनाकोपरा धुंडाळून झडती घेत आणि सतत सतावून सोडीत. त्याच्या मुलाची हकालपट्टी शाळेंतून करण्यांत येई, कारण त्याचा बाप 'जनतेचा वैरी' होता. कधीं कधीं अशा दुराग्रही शेतकऱ्यांना वठणीवर आणण्याच्या कामांत चळवळे 'अे. व्ही. अेच्.'वाल्यांची देखील मदत मिळवायला कमी करत नसत. स्वतः राकोसीनें देखील, आपल्या आत्मनिरीक्षणपर भाषणांत, अशी जाहीर कबुली दिली होती कीं, "सामुदायिक शेतवाड्या संघटित करतांना बरेचसे 'अतिरेक' घडून आलेले होते."

अशा विविध दडपणांचा उपयोग केल्यानें हळूंहळूं या सामुदायिक शेतवाड्या आकार धरूं लागल्या. नव्या सामुदायिक शेतवाडीची स्थापना हें कम्युनिस्ट सोहाळ्याला निमित्त म्हणून वापरण्यांत येई. प्रचारयंत्राची हालचाल सुरू होई. त्या महान् घटनेचा तपशील जाहीर करण्यासाठीं वर्तमानपत्रें आणि आकाशवाणी हीं अगदीं हाताशींच असत. उत्सव-प्रसंगीं सामुदायिक शेतवाड्यांच्या अध्यक्षाला फुलांचा मोठा गुच्छ समर्पण करण्यांत येई आणि नंतर तो अगदीं थोड्या सोप्या शब्दांत, आपली जमीन, आपला घोडा, आपली गाय, आणि आपली इतर मालमत्ता यांच्यापासून आपली सुटका झाल्यामुळें आपण कसे सुखी बनलों, हें सांगत असे.

हे सोहाळे आणि आकाशवाणीवरील कार्यक्रम यांचा प्रत्येकाला मनःपूर्वक तिटकारा वाटत होता. विपत्तीच्या कालींसुद्धां नेहमीं जागृत असलेल्या हंगेरियनांच्या विनोदबुद्धीमधून निर्माण झालेली एक हास्यकथा त्या काळीं अत्यंत लोकप्रिय झाली होती आणि तिचा पूर्व युरोपांत सर्वत्र प्रचार झाला होता. ती कथा अशी होती :

"हंगेरीच्या आकाशवाणीवरील एक निवेदक एका सामुदायिक शेतीवाडीवर जातो आणि जो शेतकरी नुकताच तींत सामील झाला आहे त्याला उद्देशून म्हणतो,—

"ज्यो काका, या ध्वनिक्षेपकापुढें कांहीं शब्द बोल कीं!"

शेतकरी ध्वनिक्षेपकाकडे संशयग्रस्त दृष्टीनें बघतो आणि म्हणतो :

" मला सांग, माझं म्हणणं लोकांना कुठं कुठं ऐकतां येईल ? "

" सगळ्या जगांत सर्वत्र कुठंहि, " असें उत्तर मिळतें.

" युरोपांत देखील ? " ज्यो काका विचारतो.

" अर्थात् येईल. " निवेदक म्हणतो.

" अमेरिकेंत देखील लोकांना ऐकूं येईल ? " ज्यो काका विचारतो.

" अलबत् ! तिथं देखील लोकांना तुझं बोलणं ऐकायला येईल. "

यावर ज्यो काका त्वरेनें ध्वनिक्षेपक मुठींत धरतो आणि मोठ्या आवाजांत ओरडतो, " धांवा ! धांवा ! "

ही एक चेष्टा आहे, परंतु शेतकऱ्यांचा कटु असंतोष आणि त्या गरीबाची अल्पस्वल्प मालमत्ता हिरावून घेतल्यामुळें घडलेली शोकांतिका यांची तंतोतंत अभिव्यक्ति तिच्या द्वारां होत आहे.

शेतकरीवर्गाला सामुदायिक शेतीवाडींत सामील झाल्यावर लवकरच दिसून आलें कीं आपण कितीहि अधिक कष्ट केले तरी देखील आपल्य मानानें अति कमी राबणारांपेक्षां आपली स्वतःची मिळकत जास्त असूं शकणार नाहीं. व्यक्तिगत कर्तृत्वाप्रमाणें वेतन मिळत नसे, तर ते सामुदायिकपणें देण्यांत येई. यामुळें सामुदायिक शेतवाड्या कर्जाच्या गाळांत रुतल्या आणि त्यांचें बहुधा दिवाळें निघालें. यास्तव त्यांना निब्बळ जिवंत ठेवण्यासाठीं सरकारी मदतीच्या सततकाल मलिद्याची गरज भासली, याचें कुणाला नवल वाटण्याचें कारण नाहीं.

सगळे प्रयास केले तरी कापणीच्या हंगामापूर्वी, हंगेरीच्या खेडेविभागाचें दृश्य दिसायचें तें विषमच ! जेथें धान्याचें पीक उंच दिसत असे, ती जमीन कुणातरी शिल्लक उरलेल्या व्यक्तिगत शेतकऱ्याचीच असे. जेथें धान्याचें पीक निकृष्ट आणि खुरटलेलें असे, तें सामुदायिक शेत असे, आणि हें सर्व, व्यक्तिगत शेतकरी यंत्रांची मदत न घेतां अंगमेहनत करी व सामुदायिक शेतकऱ्यांना ट्रॅक्टरचा नांगर, कापणीचीं यंत्रें वगैरे अवजारें मिळत, तरीसुद्धां होत असे हें विशेष. कार्सेग आणि मेझोटर यांच्यासारखीं कांहीं दिखाऊ ठिकाणें सोडलीं तर सर्व प्रकारची सरकारी मदत मिळून

देखील सामुदायिक शेतवाड्यांचा बोऱ्या वाजलाच होता. हंगेरींतल्या शेतकऱ्यानें कम्युनिस्ट राजवटीला केव्हांहि क्षमा केलेली नाहीं. त्यानें जेंजबरीनें हिसकावून घेतां येण्याजोगें नव्हतें तें,—त्याची काम करण्याची इच्छा, त्याची पद्धति आणि त्याचें कौशल्य, हें सगळें सांभाळून ठेवून आपलें उद्दें काढून घेतलें.

राजवटीला ज्या समस्यांना तोंड द्यावें लागलें, त्यांतली एक 'कुलाक'-संबंधीं होती. प्रथमतः जे शेतकरी भाडोत्री शेतमजूर कामावर ठेवीत आणि ज्यांच्या मालकीची शंभर एकर किंवा त्याहून अधिक जमीन असे त्यांना 'कुलाक' मानण्यांत येई. नंतर ही संज्ञा कम्युनिस्टांना नेत्रशूल वाटणाऱ्या कोणत्याहि शेतकऱ्याला चिकटविण्यांत येऊं लागली.

जर एखाद्या शेतकऱ्याचें दुमदार घर तेथील कम्युनिस्ट अधिकाऱ्याच्या डोळ्यांत भरलें, तर त्या शेतकऱ्याचें नांव कुलाकच्या नामावलींत दाखल होई. जनतेच्या लोकशाहीमध्यें, ज्याचें नांव त्या यादींत असे, त्याचा सर्वनाश हा ठरलेला. त्याचें घर जप्त होत असे, आणि त्याच्या कुटुंबाला हद्दपारी मिळे. त्याचे शेजारी त्याच्याशीं बोलायला घाबरत, कारण कुलाकबरोबर संबंध ठेवणें, हा गुन्हा मानण्यांत येई.

जर एखाद्या सामुदायिक शेतीवाडींत असमाधानकारक काम दिसून आलें, तर त्याचा बहुतेक संभाव्य दोष कांहीं थोड्या 'कुलाकां'वर लादून त्यांना अटक करण्यांत येई. जर एखाद्या खेड्यानें आपला वांटा देण्या-इतकें पुरेसें उत्पादन केलें नाहीं, तर अधिकारी रात्रींच्या वेळीं कांहीं कुलाकांच्या शेतीवाडीवर धाड घालून उरलेली तूट भरून काढतील. 'कुलाक' या संज्ञेच्या बाधेनें पछाडलेले आणि धास्तीनें गलितगात्र झालेले शेतकरी आपल्या मालकी हक्काचें उदक राज्याच्या हातावर सोडून, छळा-पासून आपली सुटका करण्याच्या प्रयत्नांत कारखान्यांत अगर खाणींत मजुरी करूं लागले.

जोसेफ दारवास या लोकसंमत शिक्षण खात्याच्या कम्युनिस्ट मंत्र्यानें 'स्झाबाद नेप' या कम्युनिस्ट वर्तमानपत्रासाठीं लिहिलेल्या एका लेखांत शेतकरीवर्गाची मनोवृत्ति दिसून येते:—

"निवडणुकीच्या काळांत, १९५३ च्या मे महिन्यामध्यें, मीं पुन्हां खेडुत विभागांना भेट दिली. मला अत्यंत बिकट मुलुख देण्यांत येईल, असें मला सांगण्यांत आलें होतें आणि त्यामुळेंच मला लिगेटाल्जा जिल्ह्यांत जाण्याचा प्रसंग आला. आदल्या दिवशींच निअिरेगिहाझा येथें दहा ते पंधरा हजार लोकांच्यापुढें मीं भाषण केलें होतें. तो प्रचंड जमाव तसाच मख्खासारखा शांत उभा होता—पसंतीच्या टाळ्या किंवा निषेधाच्या आरोळ्या—कांहींहि ऐकायला आल्या नव्हत्या. तें शून्य मौन भयानक आणि विषण्ण होतें.

"नंतर मी बिरी येथें गेलों आणि तेथें घरोघरीं जाऊन भेटूं लागलों. एका घरांत मला एकटीच एक म्हातारी आढळली. ती एका लांकडी रांजणावर ओणवी झाली होती आणि माझ्या प्रणामाला प्रतिसाद न देतां तशीच ती धुण्याचें काम करूं लागली. मीं विचारलेल्या प्रश्नांची दखल न घेतां, तिनें उत्तरेंच दिलीं नाहींत. ती मुकाट्यानें रांजण घांसण्याचें काम असें करीत होती कीं जणुं काय सगळें जगच तिला घांसून स्वच्छ करायचें होतें. तिचें डोकें झांकून टाकणारा आणि तिच्या चेहेऱ्यावर सावली पाडणारा काळा रुमाल तिला माझ्या आईसारखी बहुतेक दिसण्या-इतकें साम्य आणून देत होता. माझ्यावर रागावली म्हणजे ती मुद्धां अशीच स्वतःच्या चेहेऱ्यावर आपला रुमाल ओढून घेत असे. बऱ्याच दीर्घ स्तब्धतेनंतर म्हातारीनें वर मान करून संतापानें जळणाऱ्या डोळ्यांनीं माझ्याकडे पाहिलें आणि फडताळाकडे जाऊन एक पावाचा काळा तुकडा काढला. माझ्या पुढ्यांत तो टेबलावर फेंकून ती म्हणाली, "आमचें सर्वस्व हिरावून घेण्यांत आलेलें आहे. त्यांनीं सगळें घर धुऊन नेलें आहे, आतां ही सबंध आठवड्याची बेगमी. येवढीच काय ती रोटी माझ्याजवळ उरली, माझ्या घरच्या माणसांना मी काय खायला देऊं?"

कम्युनिस्टांच्या सामुदायिक शेतीवाडीपायीं आपलीं शेतें आणि मालमत्ता यांना मुकलेल्या सहस्रावधि शेतकऱ्यांनीं अगदीं हाच प्रश्न विचारलेला होता.

जेव्हां स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धाचा भडका उडाला तेव्हां शेतकरीहि आपल्यावर अत्याचार करणाऱ्या रशियनांना आणि त्यांच्या हंगेरियन

कम्युनिस्ट बाहुल्यांना उलथून पाडण्यासाठीं विद्यार्थी व कामगार यांच्या जोडीला एकदम लष्करांत दाखल झाले, यांत नवल करण्यासारखें कांहींहि नाहीं. क्रांतियुद्धाचा अग्नि धगधगत जिवंत ठेवण्याचें कार्य शेतकऱ्यांनींच केलें. शेतांतून झपाट्यानें अन्न आणून, तें आपल्या देशभक्त हंगेरियन बांधवांना रणमैदानांवर फुकट वांटण्याचें कार्य केलें तें त्यांनींच !

घरांचा प्रश्न

घरांची टंचाई ही हंगेरियन कामगार आणि त्यांचीं कुटुंबें यांना सतावणारी एक चिंता होती. बुडापेस्ट आणि इतर मोठीं शहरें यांच्यांत नव्या घरांचीं आणि चाळींचीं बांधकामें वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणांत पुरेशीं होऊं शकलीं नाहींत. दुसऱ्या जागतिक युद्धाच्या पूर्वीच कांहीं वर्षांत बुडापेस्टमध्यें अनेक जुनाट रोगट चाळी पाडून त्यांच्या जागीं आधुनिक पद्धतीच्या राहण्याच्या इमारती बांधण्यांत आल्या. परंतु युद्ध-कालांत हवाई हल्ल्यामुळें आणि रस्तोरस्तीं झालेल्या जर्मन-सोवियट लढायांच्यामुळें, बऱ्याचशा इमारतींची नासधूस झाली होती. १९४५ च्या जानेवारीमध्यें बुडापेस्ट हें एखाद्या पिशाच्च नगरीप्रमाणें दिसत होतें. त्याची पुनर्रचना करायला बरींच वर्षें लागतील, असें कांहीं तज्ज्ञांना वाटलें होतें.

हंगेरियन जनतेची हिंमत आणि कडक परिश्रम यांनीं चमत्कार घडवून आणला. १९४५ ते १९४८ पर्यंत—म्हणजे कम्युनिस्टांनीं देशावर आपला संपूर्ण ताबा बसविण्याच्या आधीं,—लोकांनीं ध्वंसावशेष साफ करून टाकले आणि पुनर्रचनेला प्रारंभ केला. त्यांनीं सर्व उपयोगांत आणतां येण्याजोग्या जागा, रिकामीं दुकानें आणि कचेऱ्या देखील, मोठ्या कौशल्यानें राहण्यास सोयीस्कर अशा रीतीच्या फिरून बांधून काढल्या.

कम्युनिस्टांनीं जेव्हां १९४८ मध्यें संपूर्ण सत्ता बळकावली, तेव्हां या मार्गांनीं चाललेलें कार्य ताबडतोब थांबविण्यांत आलें. कारण त्यांना लोकांच्या मूलभूत गरजांबद्दल जरा देखील कदर वाटत नव्हती. उलट त्यांच्या बांधकामाच्या कार्यक्रमांत कधींहि पूर्ण न झालेला एक दर्शनीय उपमार्ग, भपकेदार लष्करी बराकी, आणि एक अपुरें 'क्रीडाप्रेक्षाभवन' (स्टेडियम) यांचा समावेश करण्यांत आला.

सह-भाडोत्री

अशा परिस्थितींत सहभाडोत्र्याची कल्पना सर्वत्र पसरली. शहराच्या प्रत्येक विभागासाठीं एक कम्युनिस्ट निवास कचेरी होती; परंतु तिनें रहाण्यासाठीं नवीं घरें बांधण्याच्याबाबत कांहींच केलें नाहीं. तिचें काम सहभाडोत्री पद्धति नियमित करण्याचें होतें.

आतां सहभाडोत्री पद्धति म्हणजे काय? समजा, एक चार जणांचें कुटुंब, ज्याला दोन झोंपण्याच्या खोल्या, एक लहानसें स्वयंपाकघर, आणि एक पडवीवजा खोली आहे, अशा एका गाळ्यांत राहत आहे. पडवींतून झोंपण्याच्या पहिल्या खोलींत जायला वाट आहे, आणि त्या खोलीला दुसऱ्या खोलींत जाण्यासाठीं दार आहे. दुसऱ्या खोलींत न्हाणीघरांतून देखील जातां येतें.

एके दिवशीं ही दुसरी खोली चार कच्चेबच्चे असलेल्या वेगळ्याच कुटुंबाला निवास कचेरीकडून बहाल करण्यांत येते. त्या दिवसापासून त्या गाळ्यांतलें जीवन असह्य होतें. सकाळच्या प्रहरीं न्हाणीघराला एखाद्या स्टेशनच्या फलाटाची कळा चढते. मुलांचीं भांडणें सुरू होतात आणि त्या लहानशा स्वयंपाकघरांत, अर्थातच, त्या दोघी माऊलींना शांतपणानें नांदणें अशक्यप्राय होतें. आतां तेथें कौटुंबिक खाजगीपणा असूं शकत नाहीं, हें सांगण्याची गरजच नाहीं.

लाखों हंगेरियन लोकांना अशा प्रकारचें जिणें कंठावें लागत आहे. सक्तीच्या औद्योगीकरणानें परिस्थिति अधिकच बिकट करण्यांत आली. कारण त्यामुळें हजारों शेतमजुरांना शहरांत कारखान्यांमध्यें कामासाठीं यावें लागलें. बहुतेकांनीं सोबत आपापलीं कुटुंबें आणलीं. त्यांच्यासाठीं राहायला जागा मिळविणें निवास कचेऱ्यांना शक्य न झाल्यामुळें, त्या सर्वांना सहभाडोत्री म्हणून कसेंबसें कोंबण्यांत आलें.

हंगेरियन लेखक मेनिहर्ट लेंग्येल याच्या एका कथानकाच्या आधारावर तयार करण्यांत आलेला, 'निनोचका' नांवाचा बोलपट, आम्हीं १९४० मध्यें केव्हां तरी हंगेरींत पाहिला होता. मॉस्कोमधल्या एका खोलींत पडद्यानें दोन भाग पाडून तेथें दोन सबंध कुटुंबांना राहायला सक्ती

केल्याची घटना मला आठवते. त्या बोलपटांत दर्शविण्यांत आलेलें रशिया-मधील जीवन मला त्या वेळीं एक गंमतीचा उपहास वाटला होता, परंतु आतां हंगेरींत कम्युनिस्ट सत्तेखालीं तें कठोर सत्य बनलें होतें.

खूप भरमसाट भाड्याच्या सामानसुमानांनीं सजविलेल्या दुर्मिळ खोल्यांमधील जिणें तर सहभाडोत्री पद्धतीपेक्षां सुद्धां अधिक निकृष्ट होतें.

जागेसाठीं धडपड

युद्धापूर्वी बुडापेस्टमध्यें पुष्कळ लोक विपुल आकाराच्या गाळ्यांतून राहात असत आणि उपनगरांत कित्येकांचीं खासगी घरें देखील होतीं. एके काळीं तीं अत्यंत सुरेख गृहें होतीं; त्यांतलीं कांहीं अजूनहि उभ्या स्थितींत आहेत, फक्त त्यांतले रहिवासी बदललेले आहेत. जुन्या रहिवाशांना १९५१ मध्यें तडीपार करण्यांत आलें किंवा हुकमी गुन्ह्यांच्या आरोपांवरून कैद करण्यांत आलें. या घरांचे ताबे कम्युनिस्ट श्रेष्ठींनीं घेतलेले होते. आतां कांटेरी तारा आणि राखणदार कुत्र्यांच्या सोबत 'अे. व्ही. अेच्. 'वाले पहारेकरी त्या घरांचें संरक्षण चौकस डोळ्यांच्या-पासून करीत आहेत.

इकडे प्रमुख कम्युनिस्ट ऐषआरामांत राहत होते, तर सामान्य कामगारांच्या राहाण्याच्या जागा मानवप्राण्यांना राहण्याच्या लायकीच्या नव्हत्या.

१९४९ आणि १९५१ च्या दरम्यान राष्ट्रीयीकरणामुळें अथवा प्रत्यक्ष विसर्जन केल्यानें, किंवा सरकारनें मालाचा पुरवठा तोडल्याकारणानें लहान दुकानें हळूंहळूं नाहींशीं होऊं लागलीं. ज्या कुटुंबाला अशा रीतीनें रिकामी करण्यांत आलेली दुकानाची जागा, तेथें मोरी पाण्याची किंवा स्वयंपाकाची व शेकोटीची सोय नसली तरी, भाड्यानें मिळे तें भाग्यवान ठरे. नवा भाडोत्री शेगडीची सोय आणि नळीवाटे रस्त्यावर धूर सोडण्याची व्यवस्था करून घेई. अशीं राहण्याचीं ठिकाणें वस्तीसाठीं उपयोगांत आणलेलीं, क्षयरोगाचें माहेरघर असणारीं तळघरें आणि ओल चढलेलीं खोपटें यांच्या तुलनेंत विलक्षण चांगलीं वाटत असत.

वस्तींच्या घरांचा प्रश्न गेल्या दोन वर्षांत इतक्या निकरावर आला कीं कम्युनिस्ट सरकारला सुद्धां त्या बाबतींत कांहींतरी करणें भाग आहे, असें वाटूं लागलें. १९५०–५१ च्या दरम्यान ज्या शेतकऱ्यांना कम्युनिस्टांनीं शहरांत खेंचून आणलें होतें, त्यांची फिरून खेड्यांत रवानगी करणें त्यांना बरें वाटलें असतें; परंतु त्या लोकांना–त्यांतल्या बऱ्याचशा तरुण स्त्री-पुरुषांना शहरी राहणीची संवय झाल्यामुळें ते पुन्हां खेड्यांत जाण्यास नाराज होते!

म्हणून मग सरकारनें घरबांधणीच्या प्रचंड योजना सुरू केल्या–पण त्यांची मर्यादा फक्त वर्तमानपत्रांच्या स्तंभांपुरतीच होती. प्रत्यक्ष वस्तु-स्थितीमध्यें क्वचितच एखादें घर अगर गाळा बांधलेला असेल, आणि त्या बांधलेल्या थोड्या गाळ्यांत वांछनीय असें कांहीं देखील नव्हतें. थोड्याच दिवसांपूर्वी ज्यानें वशिल्यानें एक नवा दोन खोल्यांचा गाळा पटकावला अशा एका 'पक्ष' अधिकाऱ्याशीं मी गप्पा मारीत होतों. तो म्हणाला कीं त्याची जागा डुकरांनाहि राहण्याच्या लायकीची नाहीं. तो आणि त्याची मंडळी घरांत राहल्यानंतर, भिंती ओल चढून चिंब झाल्या, आंगच्या फडताळांतील कपड्यांवर बुरशी चढली, आणि त्यांचें अन्न नासूं लागलें.

गाळे बांधतांना वापरलेली सामुग्री निकृष्ट प्रतीची होती. जर वाऱ्याच्या झोतानें पुढ्यांचें बनवलेलें कवाड घट्ट बसलें, तर उघडतांना प्लॅस्टिकची दारावरली मूठ निखळून हातीं येई. परंतु असे हलक्या प्रतीचे गाळे देखील फक्त पक्षसभासदांनाच देण्यांत येत.

घराची टंचाई इतकी पराकोटीला पोहोंचलेली होती, कीं बऱ्याच तरुण मंडळींना केवळ त्यांना रहायला जागा मिळत नसल्यामुळेंच लग्न करतां येईना. मला एका तरुण इंजिनियरची–वि. के. ची हकीगत माहीत आहे. त्याच्या कारखान्याच्या मॅनेजरनें १९५४ मध्यें त्याला एक गाळा मिळवून देण्याचें कबूल केलें होतें. त्या वचनाच्या आधारावर त्यानें आपल्या प्रियकरणीशीं लग्न केलें. आपला गाळा मिळेतोंपर्यंत त्यांनीं सहभाडोत्री म्हणून दाटीवाटीनें राहत असणाऱ्या आपल्या कुटुंबांतील मंडळींकडे राहण्याचा बेत आंखला. कितीतरी महिने त्या जोडप्यानें धीरानें वाट

पाहिली; परंतु वचन कधींच मोडण्यांत आलें होतें! अधिक वशिला असलेल्या दुसऱ्या कुणाला तरी तो गाळा देण्यांत आला. वि. के. खिन्न झाला, आपल्या वरिष्ठांबरोबर तंडला आणि बडतर्फ झाला.

तो निष्णात इंजिनियर होता, त्याला दुसरी नोकरी मिळूं शकली. परंतु रहायला जागा मिळविणें अलाहिदा होतें. कालांतरानें त्याच्या व त्याच्या पत्नीच्या कानीं आलें कीं सहभाडोत्री म्हणून राहणारी एक शहाऐंशी वर्षांची म्हातारी अत्यंत आजारी आहे. त्या तरुण पत्नीनें जर त्या म्हातारीची निगा राखली तर तिच्या मरणोत्तर या जोडप्याला त्या सहभाडोत्री खोलीवर अग्रहक्क मिळेल. अन्य सर्व उपाय हरले, असें बघून वि. के. च्या पत्नीनें या व्यवस्थेला कबुली दिली, आणि तेव्हांपासून ती त्या म्हातारीची सेवाशुश्रूषा करीत असते. आपल्या ताब्यांत असलेली ती म्हातारी मेली तर बरें होईल, असें आपल्याला वाटत असल्याचें ती स्वतःशीं तरी कबूल करील काय?

शिक्षण

कम्युनिस्ट अभ्यासमंडळें

गिरण्या, कारखाने, शाळा आणि विश्वविद्यालयें यांच्यामध्यें भरविण्यांत येणाऱ्या अभ्यासमंडळांच्या द्वारां कम्युनिस्ट सिद्धांतांचे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत येत असे. सर्व कामगार आणि विद्यार्थी यांना तेथें आपल्या नियमित वेळांच्यानंतर हजेरी लावणें भाग पडे. अेम्. अेस्. टी. (कम्युनिस्ट महिला संघा)च्या वतीनें एक खास कम्युनिस्ट पाठशाळा गृहिणींच्यासाठीं चालविण्यांत येत होती.

जेथें मालकीहक्कापासून वंचित झालेले पुष्कळसे व्यापारी आणि लहान-सहान धंदेवाले कामावर होते, अशा किरकोळ सहकारी संघांत इतर अभ्यासमंडळें चालविलीं जात. सरकारनें त्यांना त्यांच्या दुकानांच्या आणि मालमत्तेच्या काळजीपासून मुक्त करून आणि त्या 'समाजवादी सुरक्षितपणासाठीं' जतन करून, कसें सत्कृत्य केलें याचे धडे त्यांना अभ्यासमंडळांत मिळत असत.

मार्क्सवादी सिद्धांत शिकविण्याशिवाय अभ्यासमंडळांतून लेनिन, स्टॅलिन आणि हंगेरियन कम्युनिस्ट श्रेष्ठी मात्यास राकोसी यांचा देखील उदोउदो करण्यांत येई. साप्ताहिक व्याख्यानांच्या वेळीं आमच्या स्वतःच्या कल्याणासाठींच कम्युनिस्टांना सर्व दहशतीचे व दरोडेखोरीचे प्रकार करावे लागतात, असें ध्येयवादी स्पष्टीकरण आमच्या माथीं मारून आमच्या अंतःकरणाला डागण्या देण्यांत येत.

अभ्यासमंडळांतले शिक्षक सतत तक्रारी करीत कीं त्यांचे विद्यार्थी अत्यंत घुमे असून कधींहि प्रश्न विचारीत नसतात. वास्तविक प्रकार असा होता कीं, आमच्यांतले बरेचजण अगदीं थकून भागून मेल्यासारखे होत आणि झोंपा घेत. उरलेल्यांना तें सगळें बेचव वाटे आणि त्यांना कंटाळा येई.

हीं अभ्यासमंडळें, प्रमुख कम्युनिस्ट प्रचार विद्यालयांतून ज्यांना धडे देण्यांत येत, अशा पक्षीय अधिकाऱ्यांकडून, (बहुधा स्त्रियांकडून) चालविण्यांत येत असत. त्यांचें शिक्षण,–जर हा शब्द उपयोगांत आणायचा असेल तर–सर्वस्वीं एकांगी आणि फक्त अधिकृत कम्युनिस्ट ध्येयवादाचा पुरस्कार करणारें होतें. स्टॅलिनचे ग्रंथ जणुं दैवी साक्षात्कार मानण्यांत येत होते. तथापि जेव्हां स्टॅलिनच्या उच्चाटनाची मोहीम सुरू झाली, तेव्हां त्याच्या ग्रंथांची रवानगी कागदांच्या गिरण्यांकडे होऊं लागली. अभ्यासमंडळांतून ज्या शिक्षकांनीं त्याचे गुणगौरव गायिले होते, तेच आतां त्याला गुन्हेगार म्हणूं लागले.

अगदीं स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धाआधींच्या महिन्यांत पुष्कळ जणांनीं अभ्यासमंडळांत नांव दाखल करण्यास सही देण्याचें किंवा आधींच दाखल झालें असल्यास हजर राहण्याचें नाकारलें.

बालकें आणि कम्युनिझम्

कम्युनिस्ट शिक्षणाचें मुख्य उद्दिष्ट हंगेरीमधील युवकांच्या मनांवर ताबा बसविण्याचें होतें. सरकारनें लहान बालकांना आकर्षित करून घेण्यासाठीं तथाकथित 'आघाडीचा' चिमुकला रूळमार्ग–रेल्वे रस्ता–

बांधायला प्रारंभ केला, तेव्हां बुडापेस्ट युद्धोत्तर भग्नावशेषांनीं बुजबुजलें होतें. केव्हांहि एखादा परदेशस्थ शहरांत आला कीं हा रूळमार्ग 'पहिलें' कम्युनिस्ट महत्कृत्य म्हणून त्याला दाखविण्यांत येई. अर्थातच युद्धाला दहा वर्षें लोटलीं तरी हंगेरींतल्या लोकांना अजून देखील माल खटाऱ्यांतून प्रवास करावा लागतो या वस्तुस्थितीकडे ते त्यांचें लक्ष वेधीत नसत, हें सांगणें नलगे.

राकोसी आणि अर्नो गेरो अनेक वेळां आपल्या 'दरबारी छाया-चित्रकारां'कडून–टिबोर बास याचेकडून आपलीं छायाचित्रें काढून घेण्यासाठीं या आघाडीच्या रूळमार्गाला भेट देऊन गेले होते.

'युवक आघाडी' आंदोलनांत तरुण बालकांना संघटित करून तेथें त्यांचें कम्युनिझम्‌चें शिक्षण सुरू करण्यांत येतें. हिंवाळ्यांत शाळांमधून त्यांना लालभाईंचा प्रचार ऐकायला मिळतो, उन्हाळ्यांत 'आघाडी' शिबिरांतून तेंच गुऱ्हाळ त्यांच्या कानीं पडतें.

तरुण मुलांमुलींना घालाव्या लागणाऱ्या गणवेषांवरून युवकांना नाझी-वाद आणि फॅसिझम यांच्या हातून मिळालेल्या वागणुकीची आठवण होते.

कम्युनिस्टांच्या बऱ्याचशा शिकवणुकींचा रोख धर्माच्या विरुद्ध होता. धर्मगुरूंची कुचेष्टा करण्यांत येई आणि सर्वसाधारणपणें धर्मभावनेविषयीं शक्य तितका अत्यंत अप्रिय दृष्टिकोन शिकविण्यांत येई. माझ्या एका मित्राची निराशा मला येथें आठवते. एका 'आघाडी' शिबिरांतून नुकत्याच परत आलेल्या त्याच्या लहान मुलानें त्याला विचारलें, "बाबा, कॉम्रेड स्टॅलिन हा चांगला देव आहे का हो?"

बालकांना अगदीं लहान वयांतच कम्युनिस्ट चुगलखोरीची पद्धति शिकविण्यांत येत होती. कम्युनिस्ट आघाडी आंदोलनाचे नेते आपल्या अल्पवयी बलींना खोटें बोलायला, इतरांवर गुप्त पाळत ठेवायला आणि सदासर्वकाल उद्दाम व आक्रमक बनायला शिकवत. त्यांनीं आपल्या स्वतःच्या कुटुंबांतील मंडळींवर या मार्गांचा प्रयोग करावयाचा होता! हंगेरींत नेहमींच दृढतर असलेल्या मातापितरांच्या अधिकाराला सुरुंग लावण्याचे जबर प्रयत्न कम्युनिस्टांनीं करून बघितले. दुर्दैवानें कांहीं

बालकें या शिकवणुकीला बळी पडलीं आणि त्यांनीं आपल्या माता-पितरांच्या विरुद्ध, केवळ हेरगिरीच केली नाहीं, तर बंडाळी देखील केली.

शिक्षकाचें काम देखील सोपें नव्हतें. शाळांमधील खोल्यांची बरीच जागा इतर कार्यासाठीं व्यापलेली असे. शहरांतील वर्गांच्या पुष्कळ खोल्या कम्युनिस्टांच्या सभा आणि खेड्यांत पाठविण्यांत येणाऱ्या प्रचारकांचें शिक्षण, यांच्यासाठीं वापरण्यांत येत असत. खेड्यांत शाळेच्या इमारतीचा बराचसा भाग, कधीं कधीं तर सगळी इमारतच, नेहमीं सामुदायिक शेती-वाडीच्या मालकीचीं गुरें बांधण्याचा गोठा किंवा धान्याचें कोठार म्हणून उपयोगांत आणण्यांत येई. या सर्व कारणांनीं शाळांतील खोल्यांच्या जागेची अत्यंत कमतरता भासत असे.

वर्गांत मादक औषधी द्रव्यें

कम्युनिस्टांनीं मादक औषधी द्रव्यांचा उपयोग शाळांतून करण्याची,—मनुष्यजातीला माहीत असलेल्या अत्यंत हानिकारक प्रथांपैकीं एक प्रथा प्रचलित करण्याचा घोर अपराध केलेला आहे.

माझ्या एका शेजारणीनें मला सांगितलें कीं तिची लहान मुलगी एके दिवशीं एक प्रकारच्या गुंगींत शाळेंतून घरीं परतली. तिच्या त्या विलक्षण वागण्यानें घाबरून गेलेल्या आईनें तिला तात्काळ डॉक्टरकडे नेलें; परंतु त्याला तें कशामुळें घडून आलें याचें निदान करतां येईना. माझ्या शेजारणीनें त्या बालिकेला पुन्हां शाळेंत नेलें. तेथें शिक्षकिणीनें स्पष्टच कबूल केलें, "तुझी मुलगी इतकी दांडगाई करूं लागली कीं मला तिला गप्प बसविण्यासाठीं दुपारच्या तिच्या जेवणांत थोडीशी 'माजूम' (अफू) द्यावी लागली. जीं दंगेखोर मुलें शिस्तीप्रमाणें शांत बसून राहत नसतात, त्यांना आपले हात आपल्या पाठीमागें घ्यावयास लावून हें मादक द्रव्य मी नेहमीं देत असतें."

ही प्रथा इतकी बदनामकारक ठरली कीं प्रमुख अधिकृत मासिकांतलें एक 'लिटररी गॅझेट' यानें (साहित्यपत्रिका) देखील तिचा निषेध केला.

इतिहासाचें पुनर्लेखन

प्राथमिक तद्वतच उच्च शालेय पुस्तकें कम्युनिस्ट सिद्धांताला अनुरूप होण्याच्या दृष्टीनें बदलण्यांत आलीं. कम्युनिस्टांनीं 'विरोधविकासवादा'चा मेळ बसविण्यासाठीं केवळ इतिहासांच्याच नव्हे तर पदार्थविज्ञानशास्त्राच्या क्रमिक पुस्तकांचें देखील पुनर्लेखन केलें. पोपाव या रशियनानें आकाशवाणीचा शोध लावला आणि कुणातरी अशाच अप्रसिद्ध रशियन शास्त्रज्ञानें पांढरी तेजस्वी प्रकाशज्योत असणाऱ्या (इनकॅन्डीसेंट) दिव्याचा शोध लावला, असें श्रेय लाटण्याचे रशियनांचें हास्यास्पद दावे हंगेरियन लोकांच्या चेष्टेचा विषय बनले होते.

रशियन पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांचें श्रेष्ठत्व ऐझॅक न्यूटनला मान्य होतें असें सिद्ध करणारीं बनावट पत्रें देखील रशियनांनीं तयार केलीं. (प्रवाहदाबाचे) 'जेट प्रापेलेशन'चें शास्त्र कुणातरी अशाच अप्रसिद्ध रशियन बुद्धिमंताच्या मेंदूंतून निपजल्याचा दावा करण्यांत आला होता.

शाळांमधून बालकांना या असल्यांचा खुराक देण्यांत येई आणि मग केवळ महाप्रयासानें त्यांना ताळ्यावर आणण्याचें काम घरीं आईबापांना करावें लागे.

हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना मार्क्सची विचारसरणी आणि रशियन भाषा शिकण्यासाठीं अनेक जादा तास अभ्यास करावा लागे.

हंगेरींतील युवकांवर संपूर्ण वर्चस्व गाजविण्यासाठीं शक्य असलेला प्रत्येक मार्ग कम्युनिस्टांनीं अवलंबिलेला होता. परंतु त्यांचें बीज वैराण जमिनींत पडलें आणि त्यांनीं फक्त उपहास आणि तिरस्कार यांचेंच पीक पदरांत पाडून घेतलें. या संपूर्ण गडबडगुंड्याच्या पल्याड कशी नजर टाकावी आणि लटक्या उत्साहाचें व सहकार्याचें सोंगढोंग कसें आणावें, हें त्वरित शिकून घेण्याइतकी हंगेरींतील तरुण मंडळी पुरेशी चतुर होती.

विश्वविद्यालयें

केवळ निवडक हायस्कूलांमधील स्नातकांनाच विश्वविद्यालयांत प्रवेश मिळत असे. ही लबाडीची सवलत फक्त दोन प्रकारांसाठीं राखून ठेवण्यांत

येई. पहिला म्हणजे शंभर टक्के निष्ठावंत अशा कम्युनिस्टपक्षीय सभासदांचीं बालकें. या अत्यंत लाडावलेल्या लहान बोल्शेविक 'अमीरउमरावां'ची शाळेची ये–जा, सामान्य लोकांच्या अवलादींबरोबर येणाऱ्या संपर्कापासून सुरक्षित ठेवण्यासाठीं, बंदुकांच्या गोळ्यांना अभेद्य अशा बंद मोटारगाड्यांमधून करण्यांत येई. विश्वविद्यालयांत प्रवेश मिळणारा दुसरा गट 'शुद्ध' कामगार किंवा शेतकरी वर्गामधील बालकांपुरता मर्यादित होता. जर एखाद्या विद्यार्थ्याचा बाप पूर्वाश्रमींचा लहान उदीमधंदा करणारा असला तर विद्यार्थ्याची नोंद 'भांडवलदार कुळांतला' म्हणून होई आणि त्याला सर्वसाधारण नियमान्वयें उच्च शिक्षणाचीं दारें बंद होत.

या विश्वविद्यालयाचा निर्विवाद प्रमुख–'रेक्टर', 'चॅन्सेलर' किंवा 'डीन' या शिक्षणाधिकाऱ्यांपैकीं कुणीहि नसत; तर ज्याला प्राथमिक व पक्षाच्या शाळेंतलें शिक्षण यांच्या व्यतिरिक्त कोणतेंहि शिक्षण मिळालेलें नसे, असा 'अभ्यासमंडळ गटा'चा नेता असे. सरकारनें विश्वविद्यालयांवर जबरीनें लादलेले हे अल्पशिक्षित भाडोत्री तट्टू अभ्यासक्रमांविषयीं निर्णय घेत असत. त्याचप्रमाणें कम्युनिस्टांच्या दृष्टिकोनान्वयें ज्या प्राध्यापकांना बेभरंवशाचे ठरविण्यांत येई, त्यांना हुसकून लावण्याची कामगिरी देखील त्यांच्यावरच टाकण्यांत येत असे.

खास शिक्षक म्हणून नेमण्यांत आलेल्या पक्षामधील इतर अधिकाऱ्यांच्या झुंडीला, जसजसा कालावधि लोटला तसतसा अधिक अधिकार मिळत गेला. त्यांचें काम मार्क्सवाद, लष्कर-विज्ञान, आणि रशियन भाषा शिकविणें हें होतें. या प्राध्यापक लालभाईंना आपल्या कामाची तालीम कम्युनिस्ट अभ्यासमंडळांत मिळालेली असून, तेथें त्यांना मार्क्सवादाचीं मूळारंभींचीं तत्त्वें, स्टालिन आणि राकोसीसारख्या कम्युनिस्ट दैवतांचा उदोउदो करणें आणि जाहीर व्याख्यानें देणें, यांचें शिक्षण देण्यांत येई. अधिक होतकरूंना जास्ती पुढारलेल्या अभ्यासमंडळांतून पाठविण्यांत येई. तेथें त्यांना कम्युनिस्ट विचारसरणीचें जास्त सविस्तर पायारूप पिष्टपेषण शिकविण्यांत येई. या त्यांच्या मर्यादित बौद्धिक पोतडीच्या योगानें ते भरंवशाचे बनत होते, कारण ते घोकंपट्टी रेटून जेवढें शिकले होते

तेवढ्याचीच फक्त पोपटपंची करूं शकत होते. त्यांच्याकडून फक्त इतकेंच, आणखी जास्ती नव्हे, असेंच पक्षाला अपेक्षित होतें.

एकदां विश्वविद्यालयीन अध्ययन संपूर्ण झालें कीं पदवीधराला एखादी चांगल्या प्रतीची नोकरी मिळेलच याची शाश्वती नव्हती. चांगल्या नोकऱ्या कम्युनिस्टांना देण्यांत येत असत, आणि फक्त ज्या जागांच्या साठीं कम्युनिस्ट उमेदवारच नसत, त्या ज्ञानाच्या उच्च क्षेत्रांमधील तज्ज्ञांच्या जागा विगर कम्युनिस्ट पदवीधरांना मिळत असत.

'बंद बोळ'

नंतरचें आणखी अधिक उच्च शिक्षण घेण्याची परवानगी, कम्युनिस्टांना विश्वासपात्र वाटणाऱ्याच हंगेरियन विद्यार्थ्यांना फक्त, त्यांच्याकडून देण्यांत येत असे. इत्यर्थ असा कीं विश्वासपात्र पक्ष–सभासद, कारखान्यांतले कामगार आणि अत्यंत गरीब शेतकरी, यांच्या मुलांना, किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचें झाल्यास–कम्युनिस्ट राजवटीखालीं लालभाईंच्या पंथाच्या द्वारां ज्यांचा बहुतेक लाभ होण्यासारखा होता, अशांनाच ही सुभा मिळावी. कदाचित् कम्युनिझमच्या पतनाच्या अत्युत्कृष्ट पुराव्याची आगाऊ तरतूद या 'विश्वासपात्र' तरुण मुलांमुलींकडून करून ठेवली असावी!

सरकारनें त्यांना पंक्तिप्रपंच करून चांगली वागणूक दिली तरी देखील, ते आपल्या धन्यांवर उलटले, आणि स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धांत सामील झाले, बहुधा अग्रभागीं देखील चमकले. हें असें कां घडून आलें? कारण त्यांना देखील, सर्व राष्ट्राच्या बरोबरच, अशी जाणीव झाली होती कीं कम्युनिझम त्यांना एका बंद वाट असलेल्या बोळांत दामटीत नेत होता.

हंगेरींतील युवक एका अशा टप्प्याला जाऊन पोहोंचले, कीं तेथें मग त्यांना लालभाईंनीं दाखविलेल्या भावी सुवर्णयुगाच्या आमिषांत कसलाहि अर्थ वाटेनासा झाला. कम्युनिस्टांनीं हंगेरीचा खोटा इतिहास बनवून पुन्हां त्याचें लेखन केलें होतें तरी पण विद्यार्थ्यांनीं, भूतकाळांत त्यांच्या पूर्वजांनीं परकी जुल्मकर्त्यांना लढून हांकून लावलें होतें, हें शिकून घेण्याची

करामत करूनच दाखविली होती. नंतर ते कित्ते त्यांनीं अगदीं अद्ययावत् गिरवले.

कुटुंब-परिवार

हंगेरींतलें परंपरागत पारिवारिक जीवन नष्ट करण्याचा प्रयत्न कम्युनिस्ट राजवट नेहमींच करीत आलेली आहे. कोणताहि बिगर कम्युनिस्ट सामाजिक गट, मग तो कितीहि लहान असला तरी लालभाईंच्या वर्चस्वाला प्रतिकार करणारा एक संभाव्य कप्पा ठरतो.

कम्युनिस्टांनीं स्त्रिया आणि मुलें यांना सक्तीनें मजुरीला जुंपून, माणसांच्या दाटोळ्यांनीं राहत्या जागा गजबजून टाकून आणि त्यांनीं शोधून काढलेले अन्य खास उपाय योजून परिवारांचा पायाच उखडून टाकलेला आहे.

त्यांनीं अर्थव्यवस्थेची रचनाच अशी केली आहे कीं, एखाद्या हंगेरियन पतीला आणि त्याच्या पत्नीला बहुतेक नेहमीं कामाचे निरनिराळे तास मिळावेत आणि त्यांना एकाच वेळीं आठवडाभर परस्परांना भेटतां येऊं नये. या जबरीच्या ताटातुटींत आणखी सहभाडोत्री प्रथेच्या कटकटीची भर पडून घरांत गैरसमजुती निर्माण होतात व प्रसंगीं त्यांचें पर्यवसान घटस्फोटांत होत असतें.

सरकारनें १९४९ आणि १९५४ चे दरम्यान मजुरीपद्धतीला लागणाऱ्या अधिक रंगरूटांच्यासाठीं लोकसंख्येंत भर पडावी म्हणून मोठे प्रयत्न सुरू केले होते. कम्युनिस्टांनीं, विवाह न करतां सुद्धां, संतति निर्माण करण्यास लोकांना प्रोत्साहन दिलें. अशीं अनौरस मुलें सरकारी शिशु संगोपन गृहांत ठेवण्यांत येत आणि माता पुन्हां कामावर परत जात असत.

लालभाईंना लोकसंख्येंत वाढ अभिप्रेत होती म्हणून त्यांनीं गर्भपातांना बंदी केली. गर्भपात करणाऱ्या डॉक्टरांना तुरुंगवासाच्या कडक शिक्षा देण्यांत येत. अल्पकालामध्यें सरकारी शिशु संगोपन गृहें तान्हुल्यांनीं गजबजून गेलीं.

१९५४ चे सुमारास जन्माचें प्रमाण जवळ जवळ दुप्पट झालें होतें, तरी एकहि नवें शिशु संगोपन गृह बांधण्यांत आलें नव्हतें किंवा बालकांच्या विस्तार पावलेल्या संख्येला शिक्षण देण्यासाठीं पुरेशा शाळांच्या खोल्या व शिक्षक यांची तरतूद नव्हती.

जेव्हां हंगेरियन राजवटीला परिस्थितीशीं मुकाबला करणें शक्य झालें नाहीं, तेव्हां त्यांनीं मॉस्कोला दाद मागितली आणि बालांच्या जन्मांना 'आळा' घालण्याची परवानगी मिळवून घेतली. त्यानंतर गर्भपातांना अनुज्ञा मिळाली आणि खरें सांगायचें झाल्यास, सरकारी इस्पितळांत ते फुकट करण्यांत येऊं लागले.

रशियनांचा कित्ता गिरवून हंगेरियन कम्युनिस्टांनीं बालकांना त्यांच्या मातापितरांच्या विरुद्ध वळण लावण्यासाठीं हर उपाय योजून पाहिला. आम्हांला असें सांगण्यांत आलें होतें कीं सोवियत युनियनमध्यें आपल्या बापावर पोलिसाच्या पुढ्यांत दोषारोपण करणाऱ्या एका चिरंजिवाचा सार्वजनिक पुतळा उभारण्यांत आलेला आहे. हंगेरींतील युवकांनीं आचरणांत आणावयाचा हा एक आदर्श होता !

हंगेरींतील लोकांच्याठायीं धर्माची गूढ जाणीव आणि प्रबल पारिवारिक परंपरा आहे. राजवटीच्या सर्व प्रयासांनंतरहि आणि दैनंदिन हीन, हताश अस्तित्वानंतर देखील परिवाराला प्राणदान मिळालें. परंतु पारिवारिक जीवन पाषाणहृदयी प्रहारांपासून सुरक्षित राखण्याच्या सतत झुंजींत आमचीं व्यक्तिगत जीवितें मात्र पराकाष्ठेचीं यातनामय बनलेलीं होतीं.

धर्म

अखेरची तटबंदी

बाहेरच्या जगाशीं हंगेरियन राष्ट्राचे संबंध कम्युनिस्ट राजवटीनें एकदांचे तोडून टाकल्यावर, मग लोकांना आपली ईश्वरनिष्ठा येवढेंच काय तें एक सांत्वन उरलें. कधीं क्वचित् एखाद्या प्रार्थनेच्या मेळाव्याला जाणारे, पुराण प्रवचन श्रवण करणारे किंवा सिनेगॉगमध्यें दिसणारे, आतां नियमित-

पणें धार्मिक पूजन-प्रवचनांना हजर राहूं लागले. परंतु लालभाईनीं प्रतिकारासाठीं कांहीं वेळ दवडला नाहीं.

कम्युनिस्टांनीं हंगेरीमधील कॅथॉलिक पंथाचे धर्माचार्य कार्डिनल मिन्डस्झेन्टी यांना कैद केलें. कम्युनिझम् आणि त्याचा नास्तिकवादी सिद्धांत यांना विरोध दर्शविणारे प्रमुख दैवी प्रतीक हे धर्माचार्य होते. सर्वांचा विश्वास संपादन करणारे हे धर्माचार्य म्हणजे अगदीं अखेरचें संरक्षक कूस होतें. आपल्या धैर्याचीं कटु फळें त्यांना चांगलींच चाखायला मिळालीं. तुरुंगवास आणि छळ यांच्यानंतर त्यांच्या चौकशीचें नाटक करण्यांत आलें आणि त्यांना अशा गुन्ह्यांबद्दल शिक्षा ठोठावण्यांत आली कीं जे खोटे असल्याचे प्रत्येकाला माहीत होतें. मग सर्व कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट आणि यहुदी पंथीय नेते, आणि सर्व धर्म, यांच्याविरुद्ध कम्युनिस्टांची 'जिहाद' जिव्हाळ्यानें सुरू झाली.

धार्मिक छळ

सर्व पंथांच्या भटां-पुरोहितांना विनाकारण अटक तरी करण्यांत आली, किंवा त्यांना देशांतल्या दूरदूरच्या भागांत बदलून फेंकण्यांत तरी आलें. राजवटीला चर्च किंवा सिनेगॉग यांना कुलुपें ठोकण्याची हिंमत झाली नव्हती, परंतु तेथें पूजाप्रार्थनेला जाणाऱ्यांवर मात्र ताबडतोब संशयाची नजर ठेवण्यांत येई. कम्युनिस्ट हस्तक आणि प्रचारक यांनीं धर्म आणि आचार्य यांना आपल्या गालिप्रदानाचें व कुचेष्टेचें लक्ष्य बनविलें होतें. त्याचें एक उत्तम उदाहरण घालून देण्यासाठीं, त्यांनीं स्टॅलिनच्या प्रचंड हिडीस धातूच्या पुतळ्याला जागा करून द्यायला एक कॅथॉलिक चर्च पाडून टाकलें!

कम्युनिस्टांचे पाय लागण्यापूर्वी, शाळांतून सर्व बालकांना त्यांच्या धर्मांचें रीतसर शिक्षण देण्यांत येत असे. कम्युनिस्टांनीं लवकरच तें बंद करून टाकलें. त्यांनीं शाळांतून धार्मिक शिक्षण देण्याची बंदी घातली. त्यांनीं खासगी धार्मिक शिक्षणास 'परवानगी' दिली, परंतु त्याच्या विरोधाची जोराची 'शिफारस' केली. धर्मनिष्ठ म्हणून ख्याति असलेल्या घरांना पक्षाचे हस्तक भेटी देत असत आणि तेथें धाकदपटशा दाखवीत असत.

अशीं दडपशाहीचीं कृत्यें चालू होतीं तरीहि लोकांनीं चर्च आणि सिनेगॉगमध्यें जाण्याचा क्रम तसाच चालू ठेवला. जेव्हां त्यांना जाण्याची हिंमत होईना, तेव्हां ते घरीं अधिकच पूजा–प्रार्थना करूं लागले. ज्याच्या कचेरींत स्टॅलिनचा पूर्णाकार अर्धपुतळा होता, असा एका सहकारी मंडळाचा अध्यक्ष माझ्या परिचयाचा होता. त्याची पत्नी आणि सासू यांनीं आपल्या घरांतच एक धर्मतीर्थ तयार केलें व तीं सर्वजणें त्याच्यापुढें प्रार्थना करीत असत. कम्युनिस्टांना राष्ट्राचें धार्मिक जीवन नष्टभ्रष्ट करतां येणें शक्य झालें नाहीं. आपली अंतिम आशा आणि आपलें अंतिम सांत्वन म्हणून लोक धर्माला चिकटून राहिले, त्याच्यामुळें त्यांना कम्युनिस्ट दहशतीविरुद्ध मानसिक सुरक्षितपणा लाभत असे.

खेळ-क्रीडा

हंगेरियनांच्या क्रीडाप्रेमाचा स्वार्थप्रेरित अयोग्य उपयोग कम्युनिस्टांनीं ज्या पद्धतीनें केला ती त्यांच्या उपहासबुद्धीचा नजरेंत भरण्यासारखा एक नमुना होता. सरकारनें पक्षश्रेष्ठी मात्यास राकोसी याचा एक जुना स्नेही गिउला हेगिई याच्या मार्गदर्शनाखालीं एक राष्ट्रीय शारीरिक शिक्षण आणि क्रीडा समिति (ओ. टी. अेस्. बी.) स्थापन केली. बड्या मळ्यांची जबाबदारी समितीवर होती, आणि तिनें चांगल्या पगाराच्या नोकऱ्या त्यांना दिल्या. या नोकऱ्या अर्थातच औपचारिक असून आंतरराष्ट्रीय चढा-ओढींत त्यांना हौशी खेळाडूंचा दर्जा ठेवतां यावा म्हणून दिलेल्या होत्या.

राज्याचीं प्यादीं

कम्युनिस्ट पद्धतीखालीं सर्वच खेळाडू हे वस्तुतः धंदेवाईक असतात, त्यांच्या क्रीडा-खेळांचें उत्पन्न सरकारकडे जमा होऊन सुद्धां. उत्कृष्ट खेळाडू बहुतेक सबंध वर्ष आपल्या परिवारापासून इतरत्र लांब शिक्षण शिबिरांत राहून घालवीत असतात. त्यांच्यांतल्या एकाजणाशीं बोलण्याचा प्रसंग मला आल्यास कांहीं फारसा कालावधि लोटला नाहीं. तो कुरकुर करीत होता कीं त्याला त्याची पत्नी आणि बाळ यांना भेटण्याची संधि कधीं

क्वचितच मिळाली असेल. टाटा शिक्षण शिबिरांत त्याचें जीवन आरामशीर असल्याचें त्यानें मान्य केलें, परंतु त्याला माहीत होतें कीं त्यानें सरकारला जय मिळवून देणें थांबविलें म्हणजे त्याला काढून टाकण्यांत येईल. त्याला कोणतेंहि औद्योगिक अगर धंदेविषयक शिक्षण नसल्यामुळें तो दारिद्र्यानें गांजलेल्या म्हातारपणाच्या आशंकेचें भयविव्हल जिणें जगत होता.

हें सर्वश्रुतच आहे कीं बाहेरदेशीं चढाओढीच्या खेळांसाठीं जाणारे प्रमुख क्रीडापटु परत घरीं येतांना हंगेरींत न आढळणाऱ्या कितीतरी वस्तु आणीत असतात. प्रारंभीं ते फक्त आपल्या परिवारासाठीं देणग्या आणण्याची दक्षता घेत असत, परंतु नंतर त्यांनीं मोठ्या प्रमाणावर चोरटी आयात सुरू केली. एकदां तर हंगेरीच्या जगज्जेत्या फुटबॉल संघानें नायलान मोजांचे कित्येक हजार जोड चोरून आयात केले होते. ओ. टी. असे. बी. नें कित्येक खेळाडूंना एक वर्षाकरतां कामावरून कमी केल्याची शिक्षा दिली, त्यांच्यांत गिउल गुसिक्स हा नामांकित (हद्दरक्षक) 'गोलकीपर' देखील होता. तथापि अप्रिय गाजावाजा टाळण्यासाठीं हें प्रकरण न्यायालयाकडे नेण्यांत आलें नव्हतें. सरकारला या चालत असलेल्या प्रकारांची पूर्वी-पासूनच माहिती असली पाहिजे, परंतु दीर्घकालपर्यंत त्यानें हस्तक्षेप केला नव्हता, आणि चोरटी आयात जेव्हां आटोक्याबाहेर गेली तेव्हांच तो केला.

संघाच्या परदेशी फेऱ्यांच्या वेळीं त्याच्यासोबत एक किंवा अधिक 'कॉम्रेड' जात; हे शिकून निपुण झालेले राजकीय हस्तक असत. येवढी दक्षता बाळगून देखील खेळाडूंपैकीं कांहींजणांनीं स्वतंत्र जगांत राजकीय आश्रय मागितला आणि त्यांना तो मिळाला. जरी असल्या प्रसंगांच्या बातम्या कम्युनिस्ट वर्तमानपत्रांतून आणि त्यांच्या आकाशवाणीवरून प्रगट होत नसत तरी देखील त्या समजून घेण्याची व्यवस्था आम्ही करून घेत असूं. या सर्वच विषयासंबंधीं लोकांच्यामध्यें बरेच तर्कवितर्क आणि वादविवाद झाले.

शर्करावगुंठन

कम्युनिस्ट राजवटीनें या क्रीडाप्रसंगांचा धूर्त उपयोग, हंगेरियन लोकांचें लक्ष आपल्या प्रत्यहींच्या भकास भयाण अस्तित्वावरून उडावें,

म्हणून केला होता. बुडापेस्टमध्यें एक भव्य आणि सुंदर क्रीडाभवन बांधण्यांत आलें आणि तें सरकारला एक लाभदायक ठेव म्हणून–धन-प्राप्तीच्या दृष्टीनें देखील–फायद्याचें ठरलें. एखाद्या चांगल्या फुटबॉलच्या सामन्यासाठीं तेथें पैसे देऊन आलेले एक लक्ष प्रेक्षक जमत होते.

कम्युनिस्टांना असें वाटत असे कीं हंगेरीच्या क्रीडापटूंच्या संघांनीं बाहेरदेशीं जय संपादन केले म्हणजे त्यांनीं कम्युनिझमचा श्रेष्ठपणा सिद्ध होईल. म्हणून त्यांच्या मतें असे विजय प्रचाराचें साधन या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त होते आणि परराष्ट्रांतील 'बुर्ज्वा' प्रवृत्तीच्या लोकांवर त्यांचा खूप प्रभाव पडत होता, अशी त्यांना खात्री वाटत होती. त्याशिवाय परदेशांत सफरीवर असणारे संघ–विशेषतः जगद्विख्यात फुटबॉल खेळाडूंचा संघ,–पुष्कळसें परदेशीं चलन देखील मिळवून आणीत असत. परंतु हंगेरीला जरी अशी चलनाची गरज निकडीनें लागत असे, तरी रशिया आपल्या स्वतःच्या कामासाठीं त्या बहुतेकाचा उपयोग करीत असे.

फुटबॉल हा हंगेरींतला अत्यंत लोकप्रिय खेळ होय. १९५४ मध्यें स्वित्झर्लंडमध्यें झालेल्या जागतिक अजिंक्यपदासाठीं झालेल्या फुटबॉलच्या खेळाच्या सामन्याचें आकाशवाणीवरील क्रीडा–समालोचन प्रत्येक जणानें श्रवण केलें होतें. हंगेरीच्या संघाचें नशीब फुटलें आणि तो पराभूत झाला. खात्रीलायक विजय गमावल्यामुळें कडवटपणाच्या भरांत फुटबॉल खेळाच्या चाहत्यांनीं ओ. टी. अेस्. बी. चा उपाध्यक्ष गुस्ताव सेबेस याला दोष दिला. फुटबॉल खेळाच्या शोकीनांनीं त्या रात्रीं एक निदर्शन केलें आणि सेबेसच्या घराच्या खिडक्यांतून दगडफेक केली. पक्षाचें वर्तमानपत्र 'स्झाबाद नेप'च्या इमारतीपुढें देखील एक मोठा जमाव निषेध व्यक्त करण्यासाठीं जमलेला होता. 'अे. व्ही. अेच्.'चे रशियन श्रेष्ठी ताबडतोब घटनास्थळीं येऊन दाखल झाले आणि त्यांनीं जमावाची पांगापांग केली. या ब्रिकट आणि भावनाप्रधान प्रसंगाकडे मागें वळून पाहतांना माझ्या मनांत अनेकदां असें आलें कीं हंगेरींत त्या काळीं देखील आधींच इतकी वाईट परिस्थिति असल्यामुळें एखाद्या फुटबॉल–शोकीनांच्या कांहींशा मूर्ख

निषेधाचा देखील पालट क्रांतीच्या उठावांत होण्यासाठीं फक्त एका ठिणगीचीच गरज भासत होती.

खेळांच्यावर पैजा लावणें, हें दुसरें एक उत्पन्नाचें साधन सरकारला सांपडलें होतें. सर्वसाधारणतः या जुगारापायीं जनतेचें भरमसाट नुकसान झालें. पणाला लावलेल्या रकमांचा तीस टक्के हिस्सा जिंकणारांना वांटून मिळें आणि उरलेली सत्तर टक्के रक्कम सरकार गिळंकृत करी.

१९५६ च्या वसंतकाळांत कम्युनिस्ट वर्तमानपत्रांतून अशा वृत्तांताचे लेख आले, कीं ऑस्ट्रेलियांत होणाऱ्या ऑलिंपिक सामन्यांसाठीं सरकारजवळ पैसा नसल्यामुळें हंगेरींतून फक्त एक लहान संघच पाठवितां येणें शक्य झालें. त्यामुळें सर्वांनाच संताप आला, कारण सरकारनें मोठाले खेळ घडवून आणून आणि स्वयंसंचालन केलेल्या पैजांच्या प्रथांमधून सत्तर टक्के उत्पन्न लुबाडून, तुंबडी भरल्याची माहिती सर्वसामान्य लोकांना होती.

कम्युनिस्टांनीं मग एक ऑलिंपिक क्रीडानिधि लोकांच्यापासून गोळा करण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु लोकांच्या संतापामुळें त्यांना तो सोडून देणें भाग पडलें. शेवटीं सरकारनें एक उपाय शोधून काढला. पैजांवरील सरकारी टक्केवारींत आणखी एक उंच उडी घेऊन त्याला खास ऑलिंपिक वर्गणी असें नांव दिलें.

कम्युनिझमच्या वर्चस्वाखालीं लोकांना खेळांचें महत्त्व नुसतें मनोरंजनापुरतेंच नसतें. राजवटीचें तें पैसा उभारण्याचें आणि प्रचाराचें साधन असतें. खेळाडूंना राज्यासाठीं राबणें आणि कम्युनिझमसाठीं जय मिळवीत राहणें, यावांचून अन्य तरणोपायच उरत नसतो.

पोलिस

कम्युनिस्ट राज्यांत हंगेरीमधील जीवनाची प्रत्येक बाजू खास पोलिस-पद्धतीच्या द्वारा पाशवीपणें नियंत्रणाखालीं ठेवण्यांत येत असते. या बाबतींत कम्युनिझम नाझीवादासारखाच आहे,—नव्हे कांकणभर अधिक परिपूर्ण आहे. या दोन्ही पद्धतींखालीं माझे देशबांधव भरडून निघाले आहेत. आम्हांला गुलामगिरींत जखडण्यासाठीं नाझींनीं दहशत आणि पशुता यांचा

कसा उपयोग केला होता, हें आम्हीं शिकून घेतलें होतें आणि कम्युनिस्टांच्या वर्चस्वाखालीं तीच गोष्ट आम्हांला शिकायला मिळाली. नाझींनीं आम्हांला राष्ट्रीय, वंशीय आणि धार्मिक अस्सलपणाच्या पायावर 'हीनयाति' ठरविलें होतेंच. कम्युनिस्टांनीं एक पाऊल पुढें टाकलें आणि मध्यम श्रेणीशीं निगडित पूर्वेतिहास असलेल्या कुणाहि व्यक्तीवर—म्हणजे ज्याच्या कुळांत कधींकाळीं मालमत्तेचे धनी, उदमी व्यापारी, लायकीचे आणि सचोटीचे बुद्धिमंत, किंवा ठाम देशप्रीतीची भावना असणारे कुणी असत, त्याच्यावर 'अस्पृश्य' असा टिळा आणखी लावून टाकला.

माझ्या देशबांधवांना नाझींच्या गेस्टापोचा पूर्ण अनुभव आल्यामुळें त्यांना माहीत आहे कीं हंगेरियन लोकांना नामोहरम करण्यासाठीं रशियनांनीं उपयोगांत आणलेली 'अे. व्ही. अेच्.'चीं बाहुलीं कटवाले गुप्त पोलिस म्हणून देखील कार्य करीत असतात. 'अे. व्ही. अेच्.'नें गेस्टापो, आणि त्याचा रशियन कित्ता 'अेम्. व्ही. डी.', यांच्या बरहुकूम आपले हस्तक समाजांतल्या अत्यंत दुर्वर्तनी घटकांमधूनच भरती केलेले आहेत. 'अे. व्ही. अेच्.' खुल्या आणि छुप्या धाकाच्या जोरावर सत्ता गाजवितो. मानवी प्रतिष्ठा, धर्म किंवा स्वतंत्र देशांतील नागरिकांना असणारा कोणताहि मूलभूत हक्क यांची पत्रास तो ठेवीत नसतो. आम्हांला फटकाऱ्यासरशीं मान वांकविण्यास भाग पाडण्यासाठीं कम्युनिस्ट चाबूक वापरीत असतात.

ही पोलिसी पद्धति आमच्या जीवितांवर—कुटेंहि—कारखाना, शेतवाडी, घर किंवा चर्च यांच्यांत कशी संपूर्ण सत्ता गाजविते, हें मीं दाखविलें आहे. कम्युनिस्ट श्रेष्ठी नियम बनवितात आणि 'अे. व्ही. अेच्.'वाले त्यांचें आज्ञापालन करवून घेतात. जे प्रतिकार करतात त्यांचें उच्चाटन होत असतें.

कम्युनिस्टांच्या युक्तिवादाप्रमाणें एक 'लोकांचा वैरी' निसटून जाऊं देण्यापेक्षां शंभर निरपराधी जिवांचे बळी देणें अधिक चांगलें असतें. कम्युनिस्ट पोलिसराज्यानें हंगेरींत या सिद्धांताची अंमलबजावणी निष्ठुरपणानें केली. गेल्या आठ वर्षांच्या अवधींत 'अे. व्ही. अेच्.'नें सहस्रावधि निरपराध हंगेरियन लोकांचे खून पाडले, अगणित लोकांवर सक्तीनें वेठबिगार लादली, आणि हजारांमागून हजारों लोकांना बंदिस्तांच्या

ठावण्यांत हद्दपार करून ठेवलें. केवळ १९५१ च्या मे आणि जूनमध्येंच कम्युनिस्टांनीं माझ्या ६० हजारांवर देशभक्त बांधवांवर 'मध्यमश्रेणीचे घटक' असल्याची तोहमत आणली आणि त्यांना घरादारांपासून वंचित करून सीमाप्रदेशांत वनवासाला पाठविलें. तेथें त्यांना उपासमारीनें तरी मरावें लागलें किंवा अत्यंत निराशेच्या आवेगांत आत्महत्या तरी करावी लागली.

नाझीवादाची उभारणी द्वेष, पशुता आणि जबरदस्ती यांच्या पायावर उभारल्याकारणानें त्याचा शेवट बळजबरीनें होण्याचें दुर्भाग्य अटळ होतें; कम्युनिझमचें पोलिसराज्य तत्सम पायावर उभारलेलें असल्यामुळें त्याच्या वांट्याला सुद्धां तेंच दुर्भाग्य निश्चित येणार!

प्रचार

हंगेरींत देशभर असत्यांचा आणि घोषणांचा महापूर लोटण्यासाठीं कम्युनिस्टांनीं आकाशवाणी, वृत्तपत्रें, सिनेमा आणि रंगभूमि यांचा वापर केला. परंतु लालभाईंचें प्रचारयंत्र मुळांतच असत्यांच्या पायावर उभारलेलें असल्याकारणानें तें सरतेशेवटीं कोलमडून पडणें अपरिहार्य होतें.

हंगेरियन सोवियट समाज

पहिल्याप्रथम देशामधील उत्कृष्ट कलाकार आणि साहित्यिक यांच्यावर संस्कृतीचें लेबल लावून रशियन कम्युनिझम लोकांत खपविण्याची सक्ती करण्यांत आली. या कार्यासाठीं निरनिराळ्या संघटना बनविण्यांत आल्या. त्यांतली अत्यंत महत्त्वाची म्हणजे 'अेम्. अेस्. टी.' (माग्यार स्झोवजेत तार्सासाग) म्हणजे 'हंगेरियन सोवियत समाज' ही संघटना होय.

'अेम्. अेस्. टी.'नें रात्रीच्या खुल्या जेवणावळीच्या पाहुणचारांची उधळमाप केल्यामुळें, स्वाभाविकपणें अर्धपोटीं असणाऱ्या अनेक लोकांची ओढ तिकडे होऊं लागली. समाजानें संगीताचे जलसे देखील भरविले. त्यांमधून त्यांनीं तच्चेकोवस्कीला 'कम्युनिस्ट चळवळया' बनविलें, आणि मौसोर्गस्की, ज्यानें 'बोरीस गोडुनाव' गीताची स्वररचना केली व जो दलित जातींच्या वतीनें लढत होता, त्याला 'गायक' बनविले.

अशा रीतीनें सुप्रसिद्ध रशियन गीतकार आणि कलाकार यांनाच कांहीं केवळ बाटवून कम्युनिस्ट करण्यांत आलें नव्हतें. कांहींशा दैवी चमत्कारानें बिथोवन याचें एखादें हरवलेलें पत्र हातीं येईल आणि त्यामुळें तो कम्युनिस्ट ध्येयवादांबरोबर सहानुभूति दर्शविणारा होता, असें सिद्ध होईल.

पहिल्यापहिल्यांदा हे जलसे सर्व जनतेला खुले होते; पण कालांतरानें 'अेम्. अेस्. टी.'ची वर्गणी भरून सभासद झालेल्यांनाच प्रवेश मिळूं लागला. संघटनेची सभासद संख्या मोठ्या त्वरेनें घटली. जलसे आणि जेवणावळी फार थोड्या होऊं लागल्या आणि कालांतरानें त्यांची जागा 'विजयी समाजवादाची भूमि—सोवियत संघ' या विषयावरील सचित्र व्याख्यानांनीं घेतली. 'अेम्. अेस्. टी.'चें स्वतःचें एक वर्तमानपत्र,—'उज विलाग' (नवें जग) हें देखील प्रचाराचें दुसरें एक बाहुलें होतें.

देशांत सर्वत्र 'अेम्. अेस्. टी.'च्या शाखा स्थापन करण्यांत आलेल्या होत्या. कारखान्यांत सुद्धां शाखा असून, त्यांचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांचें काम समाजाच्या व्याख्यानांसाठीं कामगारांना 'निमंत्रण' देण्याचें होतें. व्याख्यानांना जे हजर नसतील त्यांचा नाश होवो! वर्षांतून एकदां अेम्. अेस्. टी. 'सोवियत हंगेरियन मास' साजरा करीत असत, त्याला लोकांनीं 'घोडचुकीचा मास' असें नांव दिलेलें होतें.

रशियन 'श्रेष्ठत्व'

हंगेरींत रशियनांनीं केलेल्या अनेक अत्यंत ढोबळ चुकांपैकीं एक, म्हणजे हंगेरींतील लोकांना तुच्छ लेखून, त्यांची संस्कृति आपल्या संस्कृतीपेक्षां हीन, तिरस्कृत मानली ही होय. या प्रवृत्तीनें केवळ आमच्या राष्ट्राभिमानाला घायाळ करण्यांतच कायतें यश मिळविलें. आपल्या श्रेष्ठपणाच्या तिरस्करणीय घमेंडींत रशियनांनीं हंगेरींत आपले जुनेपुराणे चित्रपट, आपले उतार वय झालेले नर्तक-नर्तकी, आणि अगदींच सामान्य गायक पाठविले. उगीच आपली 'तोंड लावण्यां'त भर झाली इतकेंच.

उदाहरणार्थ, जुनाट चित्रपटांना हंगेरियन भाषेंतील ध्वनीची नवी जोड देऊन, ते मोठ्या समारंभानें आणि गाजावाजानें अत्यंत मोठमोठ्या

(प्रेक्षागृहांतून) थिएटरांतून दाखविण्यांत आले. तथापि, अत्यंत चांगली रंगरंगोटी आणि वेशभूषा केल्यानंतर सुद्धां वृद्ध नर्तकांना तरुण बनवितां आलें नव्हतें. अशा परिस्थितींत या गलितगात्र पाहुण्यांचे करमणुकीचे प्रयोग संपूर्णपणें फुसके ठरले. त्यांची कितीहि जाहिरात केली होती तरी कला आणि संगीत यांचें रसज्ञान असणाऱ्या हंगेरियन लोकांनीं त्यांची हुर्यो करून, दयामाया न दाखवितां त्यांना रंगमंचावरून पिटाळून लावलें.

रशियनांना लवकरच कळून चुकलें, कीं 'घोडचुकीचा मास' कल्याणप्रद ठरण्यापेक्षां अकल्याणकारकच ठरला, म्हणून मग त्यांनीं आपले कांहीं चांगल्या प्रतीचे कलाकार पाठवायला सुरुवात केली. हंगेरींतील लोकांच्या उमद्या मनोवृत्तीचा नमुना, त्यांनीं उलानोवा नांवाची पहिल्या प्रतीची नृत्यगायिका, ती अत्यंत तिरस्कृत रशियनांपैकीं एक असली तरी, तिचें कलाकार या नात्यानें केलेल्या सहर्ष स्वागतावरून दिसून येतो.

आम्हां हंगेरियनांकडून खर्चाची बरीच रक्कम उकळल्याकारणानें अशा सोवियत–हंगेरियन मैत्रीच्या महिन्याप्रीत्यर्थ फारच थोडें मोल पैशाच्या रूपानें त्यांना द्यावें लागे.

पडदा पडण्यास प्रारंभ

स्वतंत्र जगाशीं येणारे सर्व संबंध क्रमशः बंद करण्यांत येऊं लागले. परदेशांतील वृत्तपत्रें आणि मासिकें हळूहळू स्वस्थानांहून अंतर्धान पावूं लागलीं. १९४८ सालीं 'इलस्ट्रेटेड लंडन न्यूज,' 'पिक्चर पोस्ट,' आणि 'लाईफ'चे देखील कांहीं अंक विकत घेणें शक्य होतें. परंतु कालांतरानें 'डेली वर्कर,' 'ला ह्युमानाइट' आणि 'व्हाये न्यु ओवे' यांच्यासारखीं फक्त परदेशी कम्युनिस्ट प्रकाशनेंच उपलब्ध होतीं.

स्वतंत्र जगाच्या राजदूत कचेरीकडून नियोजित केलेल्या सिनेमा व चित्रयुक्त व्याख्यानें यांना फारच थोडे प्रेक्षक येत असत. बहुतेक हंगेरियन आपला सूड उगविण्यांत येईल या भीतीनें येण्याचें टाळीत असत. बाहेर जाण्याचे वांटेवरच 'अे. व्ही. अेच्.' हस्तक अटक करण्यासाठीं ठेवलेले नसतीलच याची शाश्वती कुणाला वाटेना. अमेरिकन राजदूत निवासाचें लोकप्रिय झालेलें ग्रंथालय बंद करण्यांत आलें.

बाहेरच्या जगासंबंधींची माहिती मिळवायला आम्ही हंगेरियन लोक इतके बुभुक्षित झालों होतों कीं पश्चिमेंतील देशांच्या माहिती देणाऱ्या कार्यालयांच्या तावदानी फलकांत लावलेलीं चित्रें पहात आम्ही तासन् तास उभे राहत असूं. परंतु हें देखील धोक्याचें होतें, कारण 'अ. व्ही. अेच्.'वाले अशा बघ्या लोकांना नेहमीं अटक करीत. आमच्यापैकीं कित्येकजण परदेशांतील आपल्या नातेवाईकांशीं आणि मित्रांशीं पत्रव्यवहार करीत; परंतु याच्यांत सुद्धां गुप्त पोलिसांकडून चौकशी होण्याची जोखीम होतीच. कित्येक वर्षें रशियन चित्रपट दाखविणाऱ्या थिएटरांत अगदीं शुकशुकाट असे, आणि पश्चिमेंतील राष्ट्रांत तयार झालेले चित्रपट दाखविणाऱ्या थिएटरांपुढें ताटकळत असलेल्या प्रेक्षकांच्या लांब रांगा लागत असत. हें सरकारला इतकें सलूं लागलें कीं शेवटीं पाश्चिमात्य चित्रपटांवर त्यानें बंदी घातली.

पडदा पडतो

सुरुंग पेरून, मशिनगन्ससाठीं बुरूज बांधून, वर्तुलाकार प्रकाशझोत आणि स्वयंचलित ज्वालांचे खोडे यांची सरहद्दींवर योजना करून कायिक आणि मानसिक या उभयार्थीं पोलादी पडदा खालीं सोडण्यांत आला. स्वतंत्र जगांतील आकाशवाणींवरील बातम्या आणि इतर कार्यक्रम आमच्यापर्यंत पोंचूं न देण्यासाठीं अत्यंत खर्चाचीं आकाशवाणीचे आवाज डांबणारीं केंद्रें उभारण्यांत आलीं. त्यांतलीं कांहीं डांबणीचीं केंद्रें, आतां कम्युनिस्ट वापरीत असले तरी, नाझींनीं बांधलेलीं होतीं. कुणालाहि स्वतंत्र जगांतील आकाशवाणींवरलीं भाषणें ऐकणें धोक्याचें ठरूं लागलें.

वैरी संगीत

कोणत्याहि बिगर रशियन संगीताला बंदी घालण्याची कम्युनिस्टांची प्रवृत्ति होती. नाचगाणें असलेल्या निग्रो लोकांच्या 'जाझ'ला अमेरिकन प्रचाराचा आणि हीन अभिरुचि निर्माण करणाऱ्या बोंबाबोंबीचा टिळा लावून त्याच्यावरहि बंदी घालण्यांत आली. 'माग्यार रेडिओ' (हंगेरियन आकाशवाणी) या मासिकांतील एका लेखांत 'सॅक्सोफोन' (बाजा) हें

(प्रेक्षागृहांतून) थिएटरांतून दाखविण्यांत आले. तथापि, अत्यंत चांगली रंगरंगोटी आणि वेशभूषा केल्यानंतर सुद्धां वृद्ध नर्तकांना तरुण बनवितां आलें नव्हतें. अशा परिस्थितींत या गलितगात्र पाहुण्यांचे करमणुकीचे प्रयोग संपूर्णपणें फुसके ठरले. त्यांची कितीहि जाहिरात केली होती तरी कला आणि संगीत यांचें रसज्ञान असणाऱ्या हंगेरियन लोकांनीं त्यांची हुर्यो करून, दयामाया न दाखवितां त्यांना रंगमंचावरून पिटाळून लावलें.

रशियनांना लवकरच कळून चुकलें, कीं 'घोडचुकीचा मास' कल्याणप्रद ठरण्यापेक्षां अकल्याणकारकच ठरला, म्हणून मग त्यांनीं आपले कांहीं चांगल्या प्रतीचे कलाकार पाठवायला सुरुवात केली. हंगेरींतील लोकांच्या उमद्या मनोवृत्तीचा नमुना, त्यांनीं उलानोवा नांवाची पहिल्या प्रतीची नृत्यगायिका, ती अत्यंत तिरस्कृत रशियनांपैकीं एक असली तरी, तिचें कलाकार या नात्यानें केलेल्या सहर्ष स्वागतावरून दिसून येतो.

आम्हां हंगेरियनांकडून खर्चाची बरीच रक्कम उकळल्याकारणानें अशा सोवियत–हंगेरियन मैत्रीच्या महिन्याप्रीत्यर्थ फारच थोडें मोल पैशाच्या रूपानें त्यांना द्यावें लागे.

पडदा पडण्यास प्रारंभ

स्वतंत्र जगाशीं येणारे सर्व संबंध क्रमशः बंद करण्यांत येऊं लागले. परदेशांतील वृत्तपत्रें आणि मासिकें हळूंहळूं स्वस्थानांहून अंतर्धान पावूं लागलीं. १९४८ सालीं 'इलस्ट्रेटेड लंडन न्यूज,' 'पिक्चर पोस्ट,' आणि 'लाईफ'चे देखील कांहीं अंक विकत घेणें शक्य होतें. परंतु कालांतरानें 'डेली वर्कर,' 'ला ह्युमानाइट' आणि 'व्हाये न्यु ओवे' यांच्यासारखीं फक्त परदेशी कम्युनिस्ट प्रकाशनेंच उपलब्ध होतीं.

स्वतंत्र जगाच्या राजदूत कचेरीकडून नियोजित केलेल्या सिनेमा व चित्रयुक्त व्याख्यानें यांना फारच थोडे प्रेक्षक येत असत. बहुतेक हंगेरियन आपला सूड उगविण्यांत येईल या भीतीनें येण्याचें टाळीत असत. बाहेर जाण्याचे वांटेवरचं 'अे. व्ही. अेच्.' हस्तक अटक करण्यासाठीं ठेवलेले नसतीलच याची शाश्वती कुणाला वाटेना. अमेरिकन राजदूत निवासाचें लोकप्रिय झालेलें ग्रंथालय बंद करण्यांत आलें.

बाहेरच्या जगासंबंधींची माहिती मिळवायला आम्ही हंगेरियन लोक इतके बुभुक्षित झालों होतों कीं पश्चिमेंतील देशांच्या माहिती देणाऱ्या कार्यालयांच्या तावदानी फलकांत लावलेलीं चित्रें पहात आम्ही तासन् तास उभे राहत असूं. परंतु हें देखील धोक्याचें होतें, कारण 'अ. व्ही. अेच्.'वाले अशा बघ्या लोकांना नेहमीं अटक करीत. आमच्यापैकीं कित्येकजण परदेशांतील आपल्या नातेवाईकांशीं आणि मित्रांशीं पत्रव्यवहार करीत; परंतु याच्यांत सुद्धां गुप्त पोलिसांकडून चौकशी होण्याची जोखीम होतीच. कित्येक वर्षें रशियन चित्रपट दाखविणाऱ्या थिएटरांत अगदीं शुकशुकाट असे, आणि पश्चिमेंतील राष्ट्रांत तयार झालेले चित्रपट दाखविणाऱ्या थिएटरांपुढें ताटकळत असलेल्या प्रेक्षकांच्या लांब रांगा लागत असत. हें सरकारला इतकें सलूं लागलें कीं शेवटीं पाश्चिमात्य चित्रपटांवर त्यानें बंदी घातली.

पडदा पडतो

सुरुंग पेरून, मशिनगन्ससाठीं बुरूज बांधून, वर्तुलाकार प्रकाशझोत आणि स्वयंचलित ज्वालांचे खोडे यांची सरहद्दींवर योजना करून कायिक आणि मानसिक या उभयार्थीं पोलादी पडदा खालीं सोडण्यांत आला. स्वतंत्र जगांतील आकाशवाणींवरील बातम्या आणि इतर कार्यक्रम आमच्यापर्यंत पोंचूं न देण्यासाठीं अत्यंत खर्चाचीं आकाशवाणीचे आवाज डांबणारीं केंद्रें उभारण्यांत आलीं. त्यांतलीं कांहीं डांबणीचीं केंद्रें, आतां कम्युनिस्ट वापरीत असले तरी, नाझींनीं बांधलेलीं होतीं. कुणालाहि स्वतंत्र जगांतील आकाशवाणींवरलीं भाषणें ऐकणें धोक्याचें ठरूं लागलें.

वैरी संगीत

कोणत्याहि विगर रशियन संगीताला बंदी घालण्याची कम्युनिस्टांची प्रवृत्ति होती. नाचगाणें असलेल्या निग्रो लोकांच्या 'जाझ'ला अमेरिकन प्रचाराचा आणि हीन अभिरुचि निर्माण करणाऱ्या बोंबाबोंबीचा टिळा लावून त्याच्यावरहि बंदी घालण्यांत आली. 'माग्यार रेडिओ' (हंगेरियन आकाशवाणी) या मासिकांतील एका लेखांत 'सॅक्सोफोन' (बाजा) हें

साम्राज्यवाद्यांच्या हातीं असलेलें प्रभावी हत्यार असून 'जाझ'चे 'ढोलके' हें लोकद्रोही होत, असें म्हटलें होतें. संगीताचे कार्यक्रम आकाशवाणीवर लावून नेहमींच 'काट्युशा' आणि 'दुन्युशा' अशीं रशियन गाणीं ऐकत बसणें मोठें दुःखदायक होत असे. परंतु लोकांनीं घरांत आधुनिक नृत्यांच्या तबकड्या लावून आणि त्यांच्या तालावर नृत्य करून त्याच्यावर तोडगा शोधून काढला होता. पण शेजारीं एखादा बडा कम्युनिस्ट अधिकारी राहत नसेल तरच!

जेव्हां शेजारीं एखादा बडा कम्युनिस्ट राहत असे, तेव्हां त्याच्यावरसुद्धां आणखी पुढचा तोडगा होताच. मला एकदां एका वाढदिवसाच्या पार्टीला बोलावणें होतें. तेथें आम्हीं तबकडी वाजविणाऱ्या यंत्राला लांब तारांनीं संबंधित असलेलीं ध्वनिवाहक यंत्रें आमच्या कानांना लावून नृत्य केलें. आमच्या यजमानानें खुलासा करून म्हटलें, "अगदीं दुसऱ्या घरांतच पक्षाचा एक अधिकारी राहतो. म्हणून मला माझ्या या नृत्याच्या तबकड्या मोठ्या आवाजांत लावण्याची हिंमत झाली नाहीं." रशियन लोकगीतें किंवा हंगेरियन 'क्सार्डास' (लावण्या) यांच्या तालासुरांवर अल्पवयस्कांचें एखादें 'शृगाल दुडकी नृत्य' (फॉक्स ट्रॉट) किंवा 'बुगी-उगी' छक्कड नाचून होई.

वर्तमानपत्रांच्या बाबतींत देखील, 'किस उज्साग' आणि 'स्झाबाद स्झो' सारख्या बिगर कम्युनिस्ट वर्तमानपत्रांना 'न्यूजप्रिंट' कागद मिळूं शकत नसे, आणि त्यांच्या संपादकांना तर अटक करण्यांत आली. क्रमाक्रमानें फक्त 'स्झाबाद नेप' आणि 'माग्यार नेम्झेत' सारखीं कम्युनिस्टांच्या कह्यांत असलेलीं कांहीं थोडीं वर्तमानपत्रेंच काय तीं मागें उरलीं.

रशियन नवलपट

अखेरीस प्रतिकाराचे सर्व शक्यप्राय प्रकार पार धुऊन टाकण्यासाठीं प्रचाराचा महापूर कम्युनिस्टांनीं वाहवला. या दृष्टीनें सोवियट रशियांत किंवा त्याच्या एखाद्या अंकित देशांत तयार केलेले चित्रपटच पाहतां येत होते. परंतु हे 'नवलपट' पुचाट निघाले. ते केवळ कम्युनिझमचे चमत्कार

आणि 'सोवियट' मनुष्याचा श्रेष्ठपणा यांच्याबद्दलचें काकवीमिश्रित एरंडाचें गुऱ्हाळ होतें. आम्हीं हे चित्रपट अत्यंत उदासीनपणें, विशेषतः जेव्हां अनेकदां आम्हीं हंगेरियन लोकांनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेल्या ऐतिहासिक प्रसंगावर असल्याचें सारवण घातलेलें असे तेव्हां अत्यंत घृणेनें बघत असूं.

उदाहरणार्थ, रशियन युद्धपट नेहमींच घटनांना अशा कांहीं विशिष्ट पद्धतीनें कलाटणी देत कीं एखाद्याचा ग्रह रशियनांनींच पाश्चिमात्य दोस्त राष्ट्रांना वांचविलें असा व्हावा. परंतु सगळ्याच हंगेरियन लोकांना ठाऊक होतें कीं केवळ पाश्चिमात्य मित्रांच्या मदतीच्या आणि पुरवठ्याच्या प्रचंड ओघाच्या जोरावरच वस्तुतः रशियनांची मुक्तता झालेली होती.

रशियनांनीं हंगेरीची नाझींपासून 'मुक्तता' केली, तेव्हां त्यांनीं हंगेरियन स्त्रियांवर सामुदायिकपणें अत्यंत पाशवी बलात्काराचे अविवेकी प्रकार केले आणि निर्दयपणें देशांत लूट आरंभिली. तरी देखील रशियन चित्रपट आणि सचित्र लेख यांच्यामधून हंगेरियनांनीं रशियन सैन्याचें स्वागत अंतःकरणपूर्वक अगत्यानें केल्याचें निर्लज्ज चित्रीकरण कोडग्या-सारखें दर्शविलेलें होतें.

याच 'मुक्तते'च्या दरम्यान, रशियन सैनिकांनीं सक्तीच्या वेठ-बिगारीच्या टोळ्यांत पाठविण्यासाठीं, रस्तोरस्तीं स्त्रीपुरुषांची उचलबांगडी केलेली होती. 'एका लहानशा कामासाठीं' (किक्सी रोबात) दूर कुठें तरी नेण्यांत आलेले अनेक स्त्रीपुरुष कित्येक वर्षांनीं सोवियत युनियन-मधून कायामनेंकरून खंगलेल्या अवस्थेंत परतल्याचा विसर हंगेरियनांना कदापि देखील पडणार नाहीं.

बातम्यांची बनवाबनव

सत्य घटनांशीं सुतराम् संबंध नसणाऱ्या आणि प्रचारकांच्या मेंदूंतून केवळ बाहेर पडणाऱ्या मजकुरांचे लेख वर्तमानपत्रांतून दररोज छापून येत. एकदां मी ओमासाच्या एका लहानशा खेड्यांत एका शेतकरी कुटुंबांत राहात होतों. पहिल्याच दिवशीं संध्याकाळीं मी माझ्या यजमानाच्याकडे

वाचनासाठीं लागणाऱ्या दिव्याविषयीं विनंति केली. एक शब्दहि न बोलतां शेतकऱ्याची म्हातारी आई उठून गेली आणि लागलीच 'स्झाबाद नेप'चा एक अंक घेऊन परत आली.

ती म्हणाली, "हा घ्या. हा तुमचा दिवा. आमच्या खेड्यांत काल-पासून विजेची सोय करण्यांत आली असें यांत म्हटलेलें आहे. तुम्हांला त्याच्या उजेडांत वाचतां येतें कां, बघा."

परिस्थितींना खोट्यांचा मुलामा देण्यासाठीं ठळक भडक मथळ्यांच्या बातम्या कशा बनवीत असत, हें दर्शविणारा दुसरा एक अनुभव मला आठवतो. शेतकऱ्यांच्या नमुनेदार विवाहप्रसंगाची चित्रकथा तयार करण्याबद्दल मला फर्मावण्यांत आलें होतें. संतुष्ट आशावादी शेतकरी 'सुखी मनःस्थितींत' कसे असतात हें दर्शविणारा तो 'बोधपट' करावयाचा होता. माझ्या मदतनिसासह मी डेरेक्सके या खेडेगांवची सफर केली. आमच्या कामासाठीं जागा शोधणें, आम्हांला नमुने पुरविणें आणि 'आशादायक वातावरणा'ची सिद्धता करणें, इत्यादि सर्व व्यवस्था खेडे-गांवच्या शाळामास्तरानें करून द्यावयाची ठरलें होतें.

परंतु वातावरणांत कांहीं तरी बिघाड झाल्याचें स्पष्ट प्रतीत होत होतें. कारण शेतकऱ्यांनीं कांहींशा विषादानेंच आमची संभावना केली. पहिलेंच छायाचित्र घेण्यासाठीं आम्हीं सामुदायिक शेतीवाडीच्या सभास्थानीं गेलों. तेथें आमची वाट पहात, केंस व हजामत वाढलेले, आणि अंगावर लक्तरें लोंबत असलेले, भेसूर दिसणारे सहा शेतकरी बसले होते. आम्हांला 'आशावादी' चित्रकथा तयार करावयाची होती हें मनाशीं बाळगून आम्हीं खेड्यांतल्या न्हाव्याला बोलावलें आणि वर्तमानपत्राच्या खर्चानें त्यांची हजामत करण्यास सांगितलें. नंतर आम्हीं खुल्या जागेंतलीं छायाचित्रें घ्यायला गेलों.

एक तासानंतर आम्ही त्या जागीं पुन्हां परतलों, तेव्हां आम्हांला तेथें न्हावीच काय तो आढळला. तेथें तो कापलेल्या केंसाच्या ढिगाऱ्यांत आपल्या कपड्यांवर साबू माखलेला उभा होता. त्याला आपले कामाचे

दाम गोळा करण्याची अत्यंत आतुरता दिसत होती. दामाची रक्कम जवळ जवळ शंभर फ्लोरिन्टा इतकी झालेली होती.

माझ्या मदतनिसानें विचारलें, "केवळ दाढी घोटण्यासाठीं येथें इतके दाम पडत असतात?" न्हाव्यानें उत्तर दिलें, "नाहीं, परंतु त्यांनीं सांगितलें कीं वर्तमानपत्राकडून खर्च मिळणार आहे, तर मग केंस देखील काप."

"पण ते सगळे आहेत तरी कुठें?" मीं विचारलें.

"ते होय? रानांतून आतांच परतलेल्या गाईंची धार काढायला घरांकडे गेलेले आहेत."

मग धार काढणें संपेतों थांबण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. त्याच संध्याकाळीं स्थानिक संस्कृति भवनांत 'विवाह 'विधि व्हावयाचा होता. राष्ट्रीय रंगभवनामधील सामुग्रींतील कांहीं कृत्रिम वस्तु–तळलेल्या कोंबड्या, मिठाई आणि रंगमिश्रित पाणी–(मद्याच्या ऐवजीं द्यायला) आम्हीं आणून ठेवलेल्या होत्या. परंतु आमच्या शेतकऱ्यांच्या मनांत केवळ बनावट खाद्य आणि रंगवलेलें पाणी यांच्या पंगतीनें उल्हासाचें भरतें येणें, कठीण असल्याचें आम्हांला आढळून आलें.

१९५३ सालीं 'हंगेरी' या प्रचारकी वर्तमानपत्राच्या एका अंकांत प्रसिद्ध झालेल्या आमच्या 'अनुबोध चित्रां 'तील शेतकऱ्यांच्या प्रफुल्ल चेहेऱ्यांचे आड दडलेली सत्यकथा ही अशी आहे. आणि कम्युनिस्ट राजवटीनें अशाच प्रकारें बरेचसे वृत्तांत आणि अनुबोध चित्रें बनवाबनवी करून निर्माण केलीं होतीं.

असत्यांचा कारखाना

असत्यांचा एक प्रमुख कारखाना म्हणजे कम्युनिस्टांचें अधिकृत वर्तमानपत्र 'स्झाबाद नेप.' त्याचा आद्य संपादक ओस्कार बेटलेन याचा खूप दरारा होता. लेख सादर करणाऱ्या लेखकाला त्याचा आवडता प्रश्न असे,–"याच्यापासून सरकारला कांहीं लाभ होणार आहे का?"

जर कुणी सरकारच्या कारभारांतील एखाद्या कृत्यावर टीका करण्याची हिंमत दाखवली, तर त्याची हकालपट्टी होत असे. त्याचें ब्रीदवाक्य होतें, "कोणत्याहि मनुष्याची अत्यावश्यकता असत नाहीं." आणि जे अखंडितपणानें असत्याचें पुरश्चरण करीत, त्यांनाच फक्त टिकतां येई. वर्तमानपत्री भाषा आश्चर्यकारकपणें निरर्थक आणि किळसवाणी बनली होती. "प्रामाणिक मनुष्यांना परमप्रिय स्टॅलिनच्या शब्दांनीं आतां नवी आशा आणि सामर्थ्य येणार," किंवा "आमच्या लाडक्या स्टॅलिनचे शब्द आहेत हे" या 'स्झाबाद नेप'च्या मथळ्यांनीं आम्हांला ओकाऱ्या येत. आमच्यांतल्या बहुतेकांना स्वतःचीच शरम वाटत असे आणि आमच्या भेकडपणाचा आमचा आम्हांलाच राग येई. तरी परंतु आम्ही गर्जना करीत असूं, "राकोसी चिरायु होवो! पक्ष चिरायु होवो!" नाहींतर आमचा शेजारी आमच्याबद्दल 'अे. व्ही. अेच्.'कडे चुगलखोरी करण्याचा संभव होता!

ग्रंथालयें आणि पुस्तकांचीं दुकानें यांच्यावर सक्त नियंत्रण असे. तेथें फक्त 'निरुपद्रवी' सर्वमान्य ग्रंथांशिवाय फक्त कम्युनिस्ट आणि 'पुरोगामी' लेखकांच्या कृती ठेवण्यांत येत. ज्यांना राजवटीच्या दृष्टीनें आपली इभ्रत-इतमाम सांभाळायचा होता, त्यांना चांगला खप असणारीं रशियन कम्युनिस्ट पुस्तकें वाचणें भागच पडे. कम्युनिस्ट युवकांसंबंधीं लिहिणारा अत्यंत श्रेष्ठ ग्रंथकार म्हणून ज्याचा गौरव करण्यांत आला होता, त्या अलेक्झांडर फेद्येवनें लिहिलेल्या कादंबऱ्यांचा समावेश त्यांत झालेला होता. रशियनांनीं ज्याला अत्यंत मद्यपी बनविलें आणि एका रुग्णालयांत—बहुतकरून आत्महत्या करून—१९५६ सालीं ज्याचा अंत झाला, तो फेद्येव हाच.

तरी पण वास्तविक जीवनावर असत्यांचीं पुटें चढविण्यापेक्षां अन्य कांहींहि नसलेल्या पक्षनियंत्रित साहित्याचा लोकांना इतका वीट आला होता, कीं त्यांनीं गुपचूप प्रामाणिक हंगेरियन आणि परकीय लेखक यांच्या कृती एकमेकांना उसनवार देणें सुरू केलें. सरकारी कारखान्यांतील किंवा

कचेऱ्यांमधील ग्रंथालयांच्या जोडीनेंच बेकायदा–खासगी ग्रंथालयांच्या पद्धतीनें पुस्तकांचा खूप प्रसार होऊं लागला.

पक्षासाठीं लेखनकर्म

हंगेरियन साहित्याचा दर्जा कम्युनिझमचे वर्चस्वाखालीं झपाट्यानें खालीं उतरला. काव्यें, पुस्तकें, नाटकें, लेख यांच्यामधून जीवन, वास्तविक जसें असतें तसें, रेखाटणें अशक्य होऊं लागलें; पक्षाच्या पसंतीला उतरणारें चित्रण त्यांच्यांतून करावें लागे. 'समाजवादी वास्तववादा'चे आवश्यकते-बद्दल कम्युनिस्ट बोलत असत. त्याचा थोडाफार इत्यर्थ असा कीं लेखकानें कामगार अगर शेतकरीवर्गाचें जीवन आणि त्याची विचारसरणी यांचा प्रातिनिधिक नमुना म्हणून केवळ एका व्यक्तीचें ठोकळेबाज चित्रण करावें, अशी अपेक्षा असे. परंतु कामगार आणि शेतकरी वस्तुतः कसे राहतात आणि विचार करतात, याचें वस्तुनिष्ठ कथन करण्याची लेखकांना बंदी होती. फलतः त्यांनीं जें जें लिहिलें तें तें निरर्थक, निर्जीव झालें आणि कुणालाच तें वाचण्याचा हुरूप येईना.

कांहीं तरुण लेखक बऱ्यापैकीं कम्युनिस्ट होते, आणि त्यांनीं पक्षाच्या नियमबद्ध चाकोरींत बसणारें लिखाण करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना देखील कांहीं केल्या आपल्या कृती परिणामकारक करण्याची 'खरी नाडी' सांपडूं शकली नाहीं. बहुतेक मेधावी साहित्यिकांवर आपल्या स्वतःच्या श्रद्धेविरुद्ध लिहिण्याची जबरदस्ती करण्यांत आली आणि त्यांच्या कृती वाचीत असतांना हें जाणवत होतें.

कांहीं लेखकांनीं राजवटीला स्वतःला विकून घेतलें होतें. त्यांच्या या विश्वासघातकीपणामुळें ते सुखांत राहत होते. पक्षाच्या बड्या पुढाऱ्यां-प्रमाणेंच त्यांची जनतेपासून फारकत करण्यांत आली होती. सुखसोयींनीं सुसज्ज अशा घरांत थाटामाटानें नटवलेल्या खोलींत बसून, ते पक्षाच्या धोरणाबरहुकूम कामगार आणि शेतकरी यांच्याबद्दल लेखन करीत. प्रत्यक्ष जनतेंत काय घडत आहे याची त्यांना तमा वाटत नसे; आणि त्यांच्यापैकीं कित्येकांना तर प्रत्यक्ष परिस्थितीचें ज्ञानसुद्धां नसावें. या अशा सरकार-

मान्य लेखकांपैकीं 'इरोदाल्मी उज्साग'–साहित्यपत्रिकेचा संपादक देखील एक होता. त्याच्याजवळ तसा गडगंज पैसा होता, परंतु आपली लीनता दाखविण्यासाठींच तो मोटार विकत घेत नव्हता. मात्र तो नेहमींच टॅक्सी-मधून हिंडायचा. (रुळावरून चालणारी धकलगाडी) 'ट्रॉलीबस'मधून प्रवास करण्याचा त्याच्यावर आधीं कधीं न आलेला प्रसंग, एकदां मॉस्कोच्या सफरीवरून परत आल्याच्या रात्रीं त्याच्यावर गुदरला. त्या वेळीं कुठेंहि टॅक्सी न मिळाल्यामुळें त्याला 'ट्रॉलीबस'मधून यावें लागलें. त्यानंतर त्यानें आमच्या कम्युनिस्टांच्या 'ट्रॉलीबस' पद्धतीच्या नवलाई-विषयीं लेखच लेख लिहिले. आणि प्रत्येक मेळाव्यांत आभाळाला हात टेकण्याजोगी त्या गाड्यांची स्तुति गायिली. मात्र तदनंतर अगदीं अपवादाला वाव न देतां, त्यानें टॅक्सीच वापरणें चालू ठेवलें.

कित्येक परकी भाषा ज्यांना बोलतां येत अशा कर्तबगारीच्या लेखकांना एकाएकीं त्यांच्या घरीं, कामाच्या जागीं किंवा रस्त्यावर सुद्धां, अटक करण्यांत आली आणि कसल्याहि सुनावणीवांचून तुरुंगांत डांबण्यांत आलें. त्यांच्या कुटुंबांना याविषयीं जराहि सूचना देण्यांत येत नसे, आणि पोलिस जेव्हां त्यांच्या खोल्यांच्या झडत्या घेण्यासाठीं किंवा त्यांचे भाडेपट्टे रद्द करण्यासाठीं येत तेव्हां कुठें त्यांना काय घडलें असावें याचा थोडासा कयास करतां येई. बहुतेक प्रकरणीं तर खुद्द पोलिसांनाच आज्ञापत्रांमागील कारणांचें गुपित ठाऊक नसे; तीं थेट वरून येत असत.

बऱ्याच लेखकांनीं कधीं कसलीहि सुनावणी किंवा न्यायालयांतून शिक्षा झाल्याशिवाय निरनिराळ्या तुरुंगांत अनेक वर्षें काढलीं. त्यांना तुरुंगांत कां डांबून ठेवलें, याबद्दल कधींच कुणीं त्यांना सांगितलेलें नव्हतें. कांहीं वर्षांनीं कसल्याहि खुलाशावांचून त्यांची सुटका होई. कधीं कधीं सुटके-नंतर त्यांची 'पुनर्वसाहत' होई व त्यांना पैशाची मदत आणि नवी जागा देण्यांत येई. परंतु बरेच लेखक इतकीं वर्षें तुरुंगांत घालवून देखील पक्षाची पिपाणी वाजविण्याचें नाकारीत.

सरकारकडे बुद्धिमत्ता आणि संस्कारी शिक्षण असलेल्या माणसांचा इतका तुटवडा होता कीं त्यांना कधीं कधीं तुरुंगामधील लेखकांची मदती-

साठीं आर्जवें करणें आणि त्यांच्याकडून पक्षाचीं भाषणें व इतर कागदपत्रें यांचीं भाषांतरें करवून घेणें भाग पडत असे.

इतर लेखकांवर डोईजड शारीरिक श्रमांची सक्ती करून, त्यांना सर्वस्वीं दडपून टाकण्याचा प्रयत्न सरकारनें करून पाहिला. परंतु खरी प्रतिभा नळकांड्यांत बंद करून ठेवणें इतकें सोपें नसतें. परदेशांत देखील सुप्रसिद्धी लाभलेल्या आमच्या एका कवीला आपलीं तुरुंगवासाचीं वर्षें रेक्सक कोळशाच्या खाणींत काढावीं लागलीं. तरी सुद्धां आपल्या खाणकामाच्या वेळीं त्यानें आपलें चिंतन आणि सृजन चालू ठेवलें होतें. त्याला कागद बाळगण्याची परवानगी नव्हती, म्हणून तो आपली नवी काव्यरचना स्मृतिगत करून ठेवीत असे. त्यानें एका ग्रंथाइतकी रचना करून संपविली, आणि मग आपल्या जोडीच्या कैद्यांकडून एकेका कवितेचें पाठांतर करवून घेतलें. अशा मार्गानें त्याच्या कवितांना प्रसिद्धि मिळाली.

संगीतिका

प्रचाराचें दडपण एखाद्याला कांहींसें कमी वाटूं लागावें, असें एकच ठिकाण होतें, तें म्हणजे 'राज्य संगीत नाट्यमंदिर' होय. रोझिनीच्या स्वरमाधुर्यांत रशियन जानपद गीतांची सुरावट गुपचूप घुसडण्याची हिंमत कम्युनिस्टांना झाली नाहीं. परंतु पद्यावलींच्या बाबतींत मात्र धुडगूस घालतां येणें शक्य झालें. हें सांगायला नकोच कीं त्यांनीं 'मादाम बटरफ्लाय' संगीतिकेंतल्या लेफ्टनंट 'पिंकर्टन'ला अमेरिकन साम्राज्यवादाचा दुर्गुणी हस्तक बनविला आणि जनतेची एक साधीभोळी लेक चो-चो-सान हिच्या अब्रूचा त्याच्या हातून नाश केला. परंतु स्वररचना आणि माधुर्य तसेंच कायम राखल्यामुळें प्रेक्षकांनीं बदललेल्या पद्यरचनेकडे लक्ष दिलें नाहीं आणि दर रात्रीं संगीत नाट्यमंदिर गर्दीनें खच्चून भरत असे.

कम्युनिस्ट चळवळ्यांचा उत्साह हळूहळू उतास जाऊं लागला. कम्युनिस्टांच्या खऱ्या आक्रमक वृत्तीनें त्यांनीं आम्हीं हंगेरियनांनीं कोणत्या कामाचा ठेका पत्करावा, याचे ठोके मारण्यासाठीं आपला हातोडा चालूंच ठेवला.

सतत प्रचाराची रहाळ उडविणें चालू होतें, तेव्हां बुडापेस्टमध्यें अशी एक लोकप्रिय हास्यकथा प्रचलित झाली होती, कीं एक चळवळ्या कॉम्रेड कोवाक्सच्या भेटीला जातो. तो चळवळ्या कम्युनिझमच्या पंखाखालील जीवन कसें नव्या नवलाईचें असतें, यासंबंधींचें ठेवणीचें भाषण एका दमांत म्हणून दाखवतो आणि स्टॅलिन वारोससारख्या नव्यानें स्थापन झालेल्या औद्योगिक केंद्रांची स्तुति करूं लागतो. कॉम्रेड कोवाक्स फक्त इतकेंच विचारतो, "आणि हें सगळें मला मिळणार म्हणतोस?—मला हिंवाळ्यांत गरम कोट देखील?"

मोठेंच आश्वासन

आपल्याला पूर्ण करतां येणें शक्य होणार नसलें, तरी सर्वच प्रकारच्या गोष्टींसंबंधीं आश्वासनें देण्यांत लालभाईंचा हात मोठाच सढळ. ते म्हणत, 'आम्हीं अमुक अमुक बांधून काढलें कीं मग सर्वत्र आबादीआबाद होईल.' पांच वर्षें होऊन जात, तरी सगळें कांहीं जसेंच्या तसेंच. पहिल्या पंचवार्षिक योजनेचें अपयश लपवितां किंवा नाकारतां न येण्याइतकें सुस्पष्ट होतें; परंतु कम्युनिस्टांनीं एकदम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला प्रारंभ केला, आणि प्रारंभींच पहिलीसारखें तिचें अपेशी दुर्भाग्य ठरल्यासारखेंच अटळ झालें होतें.

राजधानी बुडापेस्टला उतरती कळा लागली होती. देश आर्थिक ब्रह्मघोटाळ्यांत गुरफटलेला होता. अतिश्रम आणि गांजणूक यांनीं त्रस्त झालेली प्रजा मरगळलेल्या दृष्टीनें निराश भवितव्याकडे पाहूं लागली होती. आपल्या प्रचंड पराभवामुळें आणि स्वतःच्या अनिश्चितीमुळें कम्युनिस्ट जिवावर उदार झाले होते. आपल्या पराभवाची कबुली देण्याच्या अंतिम अवस्थेला कम्युनिस्टांचा प्रचार जाऊन पोंचला होता.

दार उघडलें

वाढती लांचलुचपत आणि बेकायदा दहशत यांच्या योगानें आणीबाणीचा प्रसंग त्वरित आकार घेऊं लागला. एक प्रमुख लेखक टिबोर डेरी यानें नामकरण केलेल्या 'स्वयंचलित बाष्पदाबमुक्तक' (सेफ्टी व्हॉल्व)

क्रियेला सुरुवात करून अनेक 'गत-कम्युनिस्टांचे' अत्याचार आणि असत्यालाप चव्हाट्यावर आणण्यांत आले. त्याचें पर्यवसान, प्रथम भाषणांतून आणि नंतर कम्युनिस्ट वर्तमानपत्रांतून सुद्धां, उघड टीका होण्यांत झालें. बुडापेस्टमध्यें पेटोफी वर्तुल अशा भाषणांचें आणि टीकांचें केंद्र बनलें.

प्रारंभीं बऱ्याच जणांना असें वाटत होतें कीं ही देखील एखादी लबाडीच ठरली तर काय घेतां? कारण 'वैऱ्यांची' नवी टोळी उघडकीस आणण्यासाठीं असलें जाळें फेकणें कम्युनिस्टांच्या वैशिष्ट्याला साजेसें होतें.

तथापि 'स्वयंचलित बाष्पदाबमुक्तक' क्रिया हातांतून लवकरच निसटून जाऊं लागली. माल्यास राकोसीचें सत्ताभ्रष्ट होण्यापूर्वीचें अविचाराचें शेवटचें कृत्य म्हणजे पेटोफी वर्तुळांतील सर्व सभांना बंदी घालण्याचें होतें. परंतु दाबमुक्तक खूपच उघडा पडला होता.

राकोसीनें रशियाला पलायन करण्यापूर्वी, ज्यांचा खुर्दा करावयाचा योजिलें होतें, अशा ४०० लोकांची एक नामावळी तयार केली होती हें सर्वांनाच कांहीं माहीत नाहीं. पेटोफी वर्तुळांतील गटांमधील बऱ्याचशा नियमित लोकांचा तींत समावेश झालेला होता.

पाठींत गोळीबार

परंतु आतां परत जुन्या मार्गांचा अवलंब करणें दुष्कर आहे, याची जाणीव लवकरच राजवटीला झाली. त्यांना नवीं वर्तमानपत्रें प्रसिद्ध करणें, आणि अधिकाधिक मागण्या मान्य करणें, मारूनमुटकून भाग पडलें. 'हेट्फाय हिर्लाप' (सोमवारच्या वार्ता) पत्र रस्त्यावर विकायला आलें तेव्हां तें विकत घेण्यासाठीं उत्सुक जनतेची येवढी झुंबड होती कीं नेहमींच्या पत्रविक्रेत्यांची तारांबळ उडाली आणि मग पोलिसांना त्याची विक्री करावी लागली. कम्युनिस्टांच्या अंकित झालेल्या हंगेरीमधील कमीअधिक संपादन-स्वातंत्र्य असलेलें हेंच पहिलेंवहिलें वर्तमानपत्र होतें.

'इरोदाल्मी उज्साग' (साहित्यपत्रिका) देखील बदलूं लागायला प्रारंभ झाला, आणि 'मुव्हेल्ट नेप'–(सुसंस्कृत जनता)–मधून कांहीं

थोडे जहाल लेखहि प्रसिद्ध झाले. 'स्झाबाद नेप' देखील पुढें सरसावलें. प्रवाहाला बांध घालतां येत नव्हता. कम्युनिस्टांचें खरें अंतरंग आतां उघडकीस आलें होतें. लालभाईंच्या पाठीवर गोळीबार झालेला होता.

पारलौकिक धर्मसंस्कार

हुकमी सरकारनें ६ ऑक्टोबर १९५६ रोजीं, केरेपेसी स्मशानभूमींत, प्रचाराच्या हेतूनें, एक असंबद्ध और्ध्वदेहिक समारंभ घडवून आणला. पांच वर्षांपूर्वी लास्झलो राज्क आणि त्याचे जोडीदार यांना अटक करण्यांत आली होती आणि त्यांच्यावर टिटोवादी असल्याचा, पाश्चिमात्य सत्तांच्या वतीनें हेरगिरी केल्याचा आणि असेच आरोप लादून त्यांच्याच कॉम्रेडांनीं अनन्वित छळ करून ठार केलें होतें. नंतर १९५६ मध्यें स्टॅलिनीकरणावर बोळा फिरविण्याच्या धोरणान्वयें त्याचें 'पुनर्वासन' करण्यांत आलें आणि सरकारी रीत्या असें जाहीर करण्यांत आलें कीं आधींचे त्यांचे खटले खोटे बनावट होते.

आतां सहा ऑक्टोबरला राज्क आणि बऱ्याच इतरांचे देह उकरून काढण्यांत येऊन भव्य तिरड्यांच्यावर ठेवण्यांत आले आणि त्याचें सार्वजनिक रीत्या दफन करण्यांत आलें. त्यांच्या मारेकऱ्यांनींच त्यांच्या दफनप्रसंगीं त्यांचे गुणगौरव गायिले.

या विश्वास न बसूं शकणाऱ्या समारंभाला हजारोंच्या संख्येंत जनसंमर्द लोटला होता, याचें कारण त्यांच्यावर तशी कुणी सक्ती केली होती म्हणून नव्हे,—तसे ते संघटित गटानें येत नव्हतेच, स्वेच्छेनें येत होते. जगानें कधींहि आधीं न पाहिलेलें अशा प्रकारचें तें दृश्य बघण्याची जिज्ञासा आम्हांला होती. आम्ही एका विलक्षण स्तब्धतेंत शांतपणानें गोळा झालों होतों, परंतु स्वतःलाच हलकट ठरविणारे अप्रो ॲन्टाल्स आणि इतर कम्युनिस्ट मारेकरी यांचीं भाषणें ऐकून मात्र आम्हांला वाटणारी मनापासूनची तुच्छता आणि किळस आमच्या मुद्रांवर प्रतिबिंबित झालेली होती.

प्रेतयात्रेची ती एकाच ठेक्याची तालबद्धता जणुं लालभाईंच्या प्रचाराच्या दफनाचें पार्श्वसंगीतच भासत होती. कोणत्याहि चित्रपट

दिग्दर्शकाला याच्यापेक्षां अधिक विलक्षण अपूर्व दृश्य जमवितां आलें नसतें. जोराच्या वाऱ्यानें काळीं निशाणें इतस्ततः फडफडत होतीं. आकाशांत काळेकुट्ट भयप्रद ढग गोळा झाले होते. एक सोसाट्याचें वादळ जमत होतें. आणि तें वादळ सुरू व्हायला कांहीं फार वेळ थांबावें लागलें नाहीं. राज्कचें दफन म्हणजे एक इशारा होता, एक अपशकुन होता.

ऑक्टोबर २३ नंतरच्या ऐतिहासिक आठवड्याच्या दरम्यान कम्युनिस्ट प्रचाराच्या प्राणांतिक यातनेचे क्षण आले. कम्युनिस्ट वर्तमानपत्रांच्या आवृत्त्या रस्त्यावर आल्या कीं तात्काळ त्या जाळून टाकण्यांत येत. आम्हीं क्रांतिकारकांनीं आतां आमचें स्वतःचें वृत्तपत्र 'इगाझ्साग' (सत्य) सुरू केलें. लोकांपासून लुबाडलेल्या पैशांनीं बांधलेली 'स्झाबाद नेप'ची इमारत जमीनदोस्त करण्यांत आली. लालभाईंचें प्रचारसाहित्य स्वातंत्र्याच्या प्रचंड प्रवाहांत बुडालें, लुप्त झालें.

ऑक्टोबर ३१ ला बुडापेस्ट आकाशवाणीनें स्वतंत्र कोस्सुथ आकाशवाणी म्हणून आपल्यांत क्रांतीच्या बाजूचा बदल झाल्याचें ज्या भाषणांत घोषित केलें, त्यांतच कम्युनिस्ट प्रचाराच्या एका दशकाचें सार, मीं आधींच उध्दृत केलेल्या शब्दांत, सांगितलेलें आहे : "अनेक वर्षांपासून आकाशवाणी असत्याचें तुणतुणें बनली होती. ती रात्रंदिवस असत्य ओकीत होती. तिच्या सर्व ध्वनिलहरींवरून असत्यांचें थैमान चाललें होतें."

हंगेरीच्या स्वातंत्र्याच्या क्रांतीचें उद्दिष्ट त्या असत्यांचा नायनाट करण्याचें आणि त्यांच्या जागीं सत्याला आसनस्थ करावयाचें आहे.

प्रकरण चौथें

तहकूब झालेला विजय

हंगेरी चार दिवसापुरतां, ३१ ऑक्टोबरपासून ३ नोव्हेंबर १९५६ पर्यंत, स्वतंत्र होता. आमच्या देशांत रशियन फौजा अजूनसुद्धां होत्या, पण त्या शहरांमधून माघारीं गेलेल्या होत्या आणि युद्ध थांबलें होतें. सबंध राष्ट्रानें इम्रे नागी सरकारला मान्यता दिली होती. सरकार देखील, आतां अन्य पर्याय नसल्याचें कळून चुकल्यामुळें, जनतेच्या इच्छा अंमलांत आणायला तयार झालें.

सरकारची जनतेच्या इच्छेशीं अधिक समीपता निर्माण व्हावी म्हणून ३ नोव्हेंबरला त्याची पुनर्घटना करण्यांत आली. इम्रे नागी पंतप्रधान म्हणून तसाच राहिला, जोडीला दोन कम्युनिस्ट पण होते. स्वतंत्र अल्प-भूमिधारक पक्षाचे तीन प्रतिनिधी, तीन सोशल डेमोक्रॅट, शेतकरी पक्षाचे दोन आणि एक स्वतंत्र, यांचाहि समावेश करण्यांत आला. एकपक्षीय कम्युनिस्ट हुकूमशाहीचें जोखड राष्ट्र झुगारीत होतें. प्रधानमंडळाच्या सर्व सभासदांनीं, त्या तिघां कम्युनिस्टांनीं देखील, मॉस्कोच्या हुकुमाखालीं कांहीं वर्षें तुरुंगवास भोगला होता.

६५००० निवेदन
२०५५ २४५७

दा. म. ८७८०

चार दिवसांचें स्वातंत्र्य

आणि त्या चार दिवसांत हंगेरियन जनतेनें आपल्याला काय हवें होतें तें स्पष्ट दर्शवून दिलें होतें. स्वातंत्र्याच्या त्या चार दिवसांत, पार्श्वभूमीत रशियन रणगाडे असून देखील, प्रत्येकजण निर्भयपणानें बोलत होता. कुणावरहि नियंत्रण नव्हतें.

आपल्या एक नोव्हेंबरच्या भाषणांत इम्रे नागीनें, प्रत्येक वर्तमानपत्र, पत्रक, भाषण आणि आकाशवाणीवरील घोषणा यांच्यांतून जें जें घोषित झालें होतें, त्यांचाच पुनरुच्चार काय तो केला: "हंगेरीची जनता आणि तिचे शूरवीर यांनीं झुंज देऊन केलेला क्रांतीचा लढा सरते शेवटीं स्वतंत्रता आणि स्वाधीनता यांच्यासाठीं विजय संपादन करूं शकला... हंगेरीचे लक्षावधि कामकरी **स्वतंत्र, स्वाधीन, लोकसत्ताक आणि तटस्थ हंगेरीचें संरक्षण करीत** आहेत, त्याचे हात बळकट करीत आहेत."

स्वतंत्र कोस्सुथ आकाशवाणीनें ३ नोव्हेंबरला आढावा घेतला;— "हंगेरींतील प्रबल लोकमताच्या अनिवार दडपणाच्या भारामुळें परिणामतः क्रांति होऊन, तटस्थ, स्वाधीन आणि लोकसत्ताक असें राष्ट्र प्रस्थापित झालें आहे; आणि स्टॅलिनशाही जुलूम समूळ नष्ट करण्यासाठीं जसें तें सिद्ध झालें होतें, तितक्याच निर्धारानें व खंबीरपणानें तसेंच तें आपलीं लोकसत्ताक महत्कृत्यें पुनश्च प्रस्थापित करील."

सार्वत्रिक संप आणि लढाई यांच्यामुळें उद्योगधंदे जागच्या जागीं बसले होते. शेलगोळ्यांच्या माऱ्यानें अनेक कारखाने जमीनदोस्त झाले होते. पहिल्यापहिल्यांदा पुष्कळ कामगार, रशियनांनीं देशांतून संपूर्ण काळें केल्याशिवाय, आपल्या कामांवर परत जायला नाखूष होते. परंतु आवश्यक कामें मात्र सुरू करण्यांत आलेलीं होतीं.

सहस्रावधि तरुण स्वातंत्र्यसैनिकांनीं अजूनहि शस्त्रें धारण केलेलीं होतीं; त्यांतले बहुतेक विद्यार्थी अगर कामगार होते. अशा परिस्थितींत विरळा आढळून येणाऱ्या शिस्तीचें पालन त्यांनीं केलें. तेव्हां, आधीं

किंवा नंतर मुळींच लुटालूट झाली नाहीं. प्रसंगीं कांहीं गोळीबार कानीं येई. कांहीं अति कुप्रसिद्ध आणि अति दुर्वृत्त अशा 'अे. व्ही. अेच्.' हस्तकांच्या विरुद्ध सूड उगविण्याचे प्रकार थोडेसे घडले. विनाकारण कसल्याहि कुरापतीवांचून रशियानें केलेल्या स्वारीच्या समर्थनार्थ प्रयत्न करणारे कम्युनिस्ट प्रचारक ह्यालाच 'पांढरी दहशत' असें नांव आतां देतात. हे 'अे. व्ही. अेच्.' हस्तक तरुण देशभक्तांच्या नातेवाईकांचे आणि मित्रांचे छळकर्ते, तुरुंगपाळ, मारेकरी व विश्वासघातकी होते. 'अे. व्ही. अेच्.'वाले हंगेरीच्या नवोदित स्वातंत्र्याविरुद्ध रशियनांच्या विरुद्ध कट करीत होते. नियमित पोलिसदल आणि न्यायालयें अजून कार्यान्वित न झाल्याकारणानें आमच्या कांहीं तरुण मंडळींनीं आपल्या हातीं कांहीं गोष्टी कां घेतल्या, हें समजून घेणें कठीण वाटूं नये. नोव्हेंबर तीनच्या सुमारास हे प्रकार संपुष्टांत येऊं लागले होते.

प्राप्तपरिस्थितींतली अधिक आश्चर्यकारक घटना म्हणजे हे सूड उगविण्याचे प्रकार पुढें घडले नाहींत ही होय. केवळ अत्यंत कुप्रसिद्ध 'अे. व्ही. अेच्.' हस्तकांनाच काय तो धोका होता. कम्युनिस्टांच्या विरुद्ध–अत्यंत रशियनधार्जिणे, आणि जुन्या स्टॅलिनवादी राजवटीचे अति निर्दय पाठीराखे असणाऱ्या विशिष्ट कम्युनिस्टांच्या विरुद्ध सुद्धां,– हिंसेचे प्रकार घडले नव्हते.

नागी सरकारवरचा स्वातंत्र्यसैनिकांचा विश्वास, त्यांच्या शूर सेनानीला,– पॉल मॉलेटेरला, मेजर जनरलचा हुद्दा दिल्यामुळें आणि नंतर प्रधानमंडळांत संरक्षणमंत्रिपदीं त्याचा समावेश झाल्यामुळें, अधिकच बळकट झाला. मॉलेटेरनें स्वतः व्यक्तिशः किलियन बराकीवरील रशियनांचा जोराचा हल्ला, बराकीला असलेलें एकमेव प्रवेशद्वार आपल्या स्वतःच्या रणगाड्याच्या पाठीशीं घालून, कसा थोपवून धरला होता, याचें स्मरण त्यांना होतें.

पाश्चिमात्य पत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत मॉलेटेरनें स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धाची कहाणी अशी निवेदन केली :—

" क्रांति कुणीहि संघटित केलेली नव्हती. क्रांतीचा स्फोट झाला याचें कारण हंगेरीच्या जनतेला शांतता, स्थिरता, स्वतंत्रता आणि स्वाधीनता हवी होती, परंतु परकी तावेकऱ्यांनीं तिचें उत्तर तरवारींनीं दिलें. लढ्याच्या प्रारंभीं एकेकट्या, परस्परांपासून भिन्न, स्वतंत्र असलेल्या गटांनीं कसल्याहि प्रकारचीं शस्त्रें न वापरतां, बळजबरीनें घुसलेल्या आगंतुकांवर हल्ले चढविले आणि अशा रीतीनें शस्त्रसंभार मिळवून, त्यांच्या जोरावर विजय संपादन केला. हंगेरियन युवकांनीं आपलीं शस्त्रास्त्रें तयार करून घेतलीं. "

स्वातंत्र्याच्या त्या चार दिवसांत राजकीय स्वतंत्रतेला चटकन् चेतना आली. स्वयंपूर्ण, स्वतंत्र आणि तटस्थ हंगेरीच्या उद्दिष्टांप्रीत्यर्थ एकवटलेल्या लोकांच्या सर्व पक्षांनीं आपापलीं कार्यालयें स्थापन केलीं आणि स्वतःचीं वर्तमानपत्रें काढलीं. अल्पभूमिधारक, शेतकरी आणि सामाजिक लोकसत्तावादी (सोशल डेमोक्रॅट्) या सर्वांचे नेते सरकारांत होते. शेतकरी पक्षानें हंगेरीच्या स्वातंत्र्याचा महाकवि पेटोफी याच्या सन्मानार्थ आपलें नांव बदलून 'पेटोफी पक्ष' हें नांव धारण केलें. कम्युनिस्ट पक्षसुद्धां, आपलें तिरस्कृत अभिधान टाकून, 'समाजवादी कामकरी पक्ष' असें स्वतःला म्हणवून घेऊं लागला.

बुडापेस्टमध्यें ऑक्टोबर २३ च्या आधीं, सर्वस्वीं केवळ कम्युनिस्ट नियंत्रणाखालीं असलेलीं, फक्त पांच वर्तमानपत्रें होतीं. नोव्हेंबर चारला वर्तमानपत्रांची संख्या पंचविसावर गेली. इतःपर बातम्या किंवा मतें यांची गळचेपी होऊं शकत नव्हती.

स्वतंत्र सार्वत्रिक निवडणुकीच्या योजना वेगानें सुरू झाल्या. जीवनाला बळ देण्यासाठीं राजकीय स्वातंत्र्याप्रमाणेंच, धार्मिक स्वातंत्र्य देखील त्या चार दिवसांत परत आलें. कार्डिनल मिन्डस्झेंटी बुडापेस्टला परत आले, आणि आपल्या लोकांना उचंबळून सोडणारें भाषण त्यांनीं केलें,—" आम्हीं आमच्या पराकाष्ठेच्या गंभीर परिस्थितींत देखील आशा धरीत आहोंत, कीं आमच्याशीं वैर धरणारे कुणीहि नाहींत, कारण आम्हीच कुणाचे वैरी नाहीं आहोंत, सर्व लोकांशीं आणि सर्व राष्ट्रांशीं स्नेहभावाची नांदणूक

ठेवण्याची आमची इच्छा आहे....आतां आम्हांला अशा सर्वस्वीं दोष-मुक्त सार्वत्रिक निवडणुकीची गरज आहे, कीं ज्यांच्यांत सर्वच पक्षांना आपले उमेदवार उभे करतां येणें शक्य होईल. निवडणुकी आंतरराष्ट्रीय देखरेखीखालीं झाल्या पाहिजेत....वैयक्तिक सूड घेणें टाळलेंच पाहिजे,–तें बाजूला सारलेंच पाहिजे."

यहुद्यांचे (धर्मगुरु) राबी आणि यहुदी जमातीची क्रांतिकारी समिति यांनीं आकाशवाणीवरून सांगितलें, " हंगेरींतील यहुदी जमात आपलें धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त करून घेतल्यावर, क्रांतीच्या महत्कार्यांना सहर्ष अभिवादन करीत आहे, शूरवीरांना मानवंदना देत आहे आणि स्वतः स्वाधीन व स्वतंत्र मातृभूमीशीं एकरूप होत आहे."

प्रेस्‌बिटेरियन आणि ल्युथर पंथीयांनीं सार्वजनिक प्रार्थना आणि अन्य कृत्यें यांना प्रारंभ केला. कम्युनिस्टांनीं ज्याच्यावर राजीनामा देण्याची सक्ती केली होती, त्या बिशप लास्झलो रावास्झला हंगेरियन प्रेस्‌बिटेरियन धर्मपंथानें पुन्हां आपला नेता म्हणून नियुक्त केलें.

खेड्यांतून शेतकऱ्यांनीं आपल्या हिंवाळी नांगरणीला आणि पेरणीला पुन्हां प्रारंभ केला, आणि दररोज ते बुडापेस्टला अन्न पाठवूं लागले. सक्तीचा अन्नभरणा आतां रद्द करण्यांत आला–आणि एकदम अन्नाची विपुलता झाली. स्वातंत्र्याच्या त्या चार दिवसांत आणि त्यांच्या पाठोपाठ आलेल्या हालअपेष्टांच्या भयंकर काळांत बुडापेस्टमध्येंच राहणाऱ्या माझ्या पत्नीनें, नोव्हेंबरच्या आरंभींच्या त्या दिवसांत बुडापेस्टमध्यें दिसणाऱ्या अन्नाच्या राशी पाहून तिला कसें आश्चर्य वाटलें, याचेसंबंधीं मला सांगितलेलें आहे. शेतकरी आतां खुल्या बाजारांत आपलें उत्पादन विकत होते आणि त्यांत जरा देखील नफेबाजी घडत नव्हती.

अन्न आलें, तें हितकारकच ठरलें. प्रत्येकांनीं आपलीं कोठारें सांठवून ठेवलीं. नाहींतर पुढील दहा दिवसांत, जेव्हां रशियन रणगाड्यांनीं शहरां-मधील इमारतीमागून इमारती पाडून टाकल्या आणि रस्त्यावर दिसणाऱ्या

प्रत्येक मनुष्याला गोळी घालणें सुरू केलें, तेव्हां तळघरांत कसें तरी दाटी-वाटीनें एकत्र दडी मारून बसलेल्या लोकांचा निभाव लागणें कठीण झालें असतें.

खेडेविभागांत शेतकरी आणि त्यांचे पुढारी शेतांच्या संबंधींचे कायदे-कानू आणि नियम यांच्यांत करावयाच्या बदलांचा आराखडा तयार करीत होते. व्यक्तिशः जमीन कसणारे शेतकरी आणि शेतमजूर यांच्या पायावर अधिष्ठित असलेल्या स्वतंत्र शेतकीप्रधान अर्थव्यवस्थेचें उद्दिष्ट सर्वांना मान्य झालें. सामुदायिक शेतवाड्या विसर्जित केल्या तर जमीनजुमला, औत–अवजारें आणि संग्रहसांठे व्यक्तिगत शेतमजुरांना वांटून द्यावयाचें ठरलें. सरकारांत ठराविक दरानें सक्तीचे भरणे रद्द करण्यांत आले.

असें ठरलें कीं, कामगारांच्या गरजा आणि मागण्या कारखान्यांतील समित्या आणि कामगारांचे गट यांनीं पुढें मांडाव्यात, सरकारनें नव्हे. कम्युनिस्टांनीं गुन्हा ठरविलेला संप करण्याचा हक्क पुन्हां उचलून धरण्यांत आला. वेतन, किंमती, पेन्शनीचे हक्क, कार्यपद्धति व परिस्थिति यांच्या-संबंधानें आस्थेनें चर्चा आणि वादविवाद होऊं लागले.

अर्थव्यवस्था हळूहळू आपल्या पायावर उभी राहूं लागली. प्रत्येकजण सोबतीनें एकत्र रस्त्यावर येऊं पाहत होता. माझ्या पत्नीनें नंतर मला जें सांगितलें त्याची ग्वाही मला नोव्हेंबर दोनला संध्याकाळीं व्हिएन्ना येथें स्वतंत्र कोस्सुथ आकाशवाणीवरून ऐकलेल्या भाषणानें मिळालेली आहे :

—" बुडापेस्टमधील रस्त्यांचें एक चित्र : वाहतूक गजबजलेली आहे. उपाहारगृहें आणि कॉफीचीं दुकानें उघडीं आहेत. वर्तमानपत्रें विकणारीं पोरें वीस निरनिराळे मथळे ललकारीत आहेत. नेहमींपेक्षां अधिक लोक रस्त्यांत दिसत आहेत, कारण अजून कांहीं कामगार कारखान्यांत कामावर परतले नाहींत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अधिकाधिक कारखान्यांमधून काम सुरू होत आहे. गॅन्झ, लॅन्झ इत्यादि प्रचंड यांत्रिक कारखाने एकामागून एक आपण काम सुरू केल्याची घोषणा करीत आहेत. वाहतुकीच्या गाड्या आधींच सुरू झालेल्या आहेत."

· माझ्या पत्नीला जेव्हां मीं नोव्हेंबर तीनला टेलिफोन केला, तेव्हां तिनें मला या साऱ्या गोष्टी सांगितल्या आणि लोकांना वाटत असलेल्या 'उल्हासा'विषयीं उल्लेख केला. त्यांच्या अंतःकरणांत हर्षखेद दोन्ही होते. सकल आत्म्यांच्या पुण्यप्रदोषानिमित्त ('ऑल सोल्स नाईट') नोव्हेंबर एक तारखेला बुडापेस्टमधल्या प्रत्येक नागरिकानें एकेक मेणबत्ती (आमच्या हंगेरियन रिवाजाप्रमाणें) आपापल्या खिडकींत पेटविली, आणि याच वेळीं दुसरी मेणबत्ती पेटवून रस्त्यांतून नेली. या मेणबत्त्या नगरांतील मृत शूरवीरांच्या आत्म्यांसाठीं होत्या. स्वतंत्र कोस्सुथ आकाशवाणीवरून मोझार्टनें रचलेली 'मृतात्म्यांप्रीत्यर्थ प्रभूची आळवणी' ऐकायला येत असतांना नोव्हेंबरच्या त्या फिकट रात्रीं त्या मेणबत्त्या जळत होत्या.

परंतु रशियन फौजांनीं अजून आमच्या देशांतून काळें केलें नव्हतें. घडत होतें उलटेंच. रशियन रणगाडे आणि तोफखाना यांची रीघ सतत सरहद्दीपलिकडे लागत असल्याचे वृत्तांत अधिकाधिक येऊं लागले होते. ऑस्ट्रियाला लागून असलेल्या सरहद्दीवर चिलखती गाड्यांचीं पथकें सर्वत्र अशा मांडणींत विखरून ठेवलेलीं होतीं कीं पश्चिमेशीं हंगेरीचे संबंध पार तुटावेत. 'स्थलांतराच्या संरक्षण कार्याचें' ढोंगसोंग उभारून त्यांच्या रणगाड्यांनीं विमानतळ वेढून घेतले. आगगाड्यांचीं स्टेशनें आणि जंक्शनें, व आडवे रस्ते या ठिकाणीं रणगाडे ठेवण्यांत आले.

मॉस्कोचे समर्थक आपल्या नित्याच्या रूढ पद्धतीप्रमाणें खोटें बोलतच होते. रशियन फौजांची हंगेरींत जमवाजमव करण्यांत येत असल्याचें, किंवा लढाई पुन्हां सुरू करण्याचा कसलाहि बेत आंखल्याचे सर्व वृत्तांत निव्वळ 'लटके' आणि 'बदनामीकारक' असल्याचें त्यांनीं 'क्रेमलिन'मधें आणि संयुक्त राष्ट्र संघांत निषेधपूर्वक सांगून त्यांनीं कानांवर हात ठेवले. सोवियट रशियाचा परराष्ट्रमंत्री शेपिलाव यानें तीन नोव्हेंबरला भयंकर आवेशानें या नाकबुलींचा भडक पुनरुच्चार केला.

रशियनांची व्यूहरचना सुरू असल्याची माहिती हंगेरियन सरकारला होती. हंगेरीनें वॉर्सा करारांतून बाहेर पडून स्वतःची तटस्थता जाहीर

केल्याचें, संयुक्त राष्ट्र संघाला इम्रे नागीनें अधिकृतपणें कळविलें होतें. आतां त्यानें संयुक्त राष्ट्र संघाला असें कळविलें कीं नव्या "सोवियट लष्करांनीं देशाच्या सीमा ओलांडल्या...त्या फौजा बुडापेस्टच्या रोखानें चालून येत आहेत." त्यानें संयुक्त राष्ट्र संघाला आणि बड्या सत्तांना हंगेरीच्या तटस्थतेला मान्यता आणि हमी देण्यासंबंधीं विनंति केली.

रशियनांचें पुनरागमन

सोवियट रशियानें ४ नोव्हेंबर १९५६ ला उजाडतां सहा हजार रणगाडे, हजारों तोफा आणि चिलखती गाड्या, बॉम्बवर्षाव करणाऱ्या हलक्या विमानांचे काफिले, दोन लक्ष सैनिक–आणि असल्यांच्या भरतीची एक लाट, या आयुधांनिशीं हंगेरीवर आक्रमण केलें.

सकाळीं ५ वाजून २० मिनिटांनीं स्वतंत्र कोस्सुथ आकाशवाणीवरून इम्रे नागीनें पुढील घोषणा केली—

"मी इम्रे नागी पंतप्रधान बोलत आहें. आज उजाडण्याचे सुमारास सोवियट फौजांनीं कायदेशीर लोकसत्ताक हंगेरियन सरकार उलथून पाडण्याच्या स्पष्ट उद्देशानें आमच्या राजधानीवर आक्रमण केलें आहे. आमच्या फौजा लढत आहेत. सरकार आपल्या स्थानीं अढळ आहे. आमच्या देशांतील लोकांना आणि सबंध जगाला या वस्तुस्थितीची मी माहिती करून देत आहें."

ही घोषणा मग इंग्रजी, रशियन, हंगेरियन आणि फ्रेंच भाषांतून पुन्हां करण्यांत आली.

आठ वाजतां सकाळीं स्वतंत्र कोस्सुथ आकाशवाणीवरून हंगेरियन लेखक संघाचा जाहीरनामा वाचण्यांत आला :

"हंगेरियन लेखक संघाची ही विनंति आहे. जगांतल्या प्रत्येक लेखकाला, सर्व शास्त्रज्ञांना, सर्व लेखक संघांना, सर्व शास्त्रीय अकादमींना

आणि संस्थांना, जगांतील सर्व बुद्धिमंतांना उद्देशून आम्ही बोलत आहोंत! आमची तुम्हां सर्वांजवळ मदतीची आणि पाठिंब्याची याचना आहे. आतां फार थोडा अवधि उरला आहे! तुम्हांला खऱ्या गोष्टी माहीत आहेतच, तुम्हांला त्या मुद्दाम सांगत बसण्याची गरज नाहीं! हंगेरीच्या मदतीला या! हंगेरींतील लेखक, शास्त्रज्ञ, कामगार, शेतमजूर, आणि आमचे बुद्धिमंत यांना मदत करायला धांवून या!

"धांवा, धांवा, मदत करा!

"आत्मे आमुचे रक्षा सत्वर!–रक्षा सत्वर!–रक्षा सत्वर!"

नंतर स्वतंत्र कोस्सुथ आकाशवाणीचें अस्तित्व संपलें. मग नऊ तास केंद्रावरून ध्वनिक्षेपण झालें नाहीं. पांच वाजतां पुन्हां रशियन वर्चस्वाखालीं ध्वनिक्षेपणाला प्रारंभ झाला. सहा वाजतां तिच्यावरून कम्युनिस्ट पक्षाचा चिटणीस जानोस कादर याला पंतप्रधान नेमून, एका बेकायदेशीर सरकारचें बाहुलें उभारल्याची घोषणा करण्यांत आली.

प्रत्यक्ष काय घडलें याची सविस्तर माहिती उघडकीस आलेली नाहीं. आदल्या रात्रीं पॉल मॉलेटेर एका सहकाऱ्यासह रशियन सेनानीकडे माघार घेण्याच्या वचनासंबंधीं वाटाघाटी करायला गेले. रशियनांनीं आपल्या दगलबाजींच्या दावणींत आणखी एक दगलबाजी गोवली. त्यांनीं त्या दोघां शिष्टाईसाठीं आलेल्या दूतांना अटक केली आणि त्यांची तुरुंगांत रवानगी केली.

त्यांच्या फौजा ३–४ नोव्हेंबरच्या रात्रीं बुडापेस्टच्या रोखानें चालूं लागल्या. पार्लमेंट भवनांत नागीनें लष्करी आक्रमणासंबंधीं ऐकलें आणि त्यानें आपली आकाशवाणीवरील संक्षिप्त घोषणा तयार केली. लाल लष्कराच्या पलटणी येऊन थडकल्याचा आणि त्याला पकडणार असल्याचा इषारा मिळाल्यावरून, त्यानें सुमारें पन्नास जणांसह तेथून निसटण्याची आणि युगोस्लाव वकिलातींत आश्रय मिळविण्याची व्यवस्था केली.

(२२ नोव्हेंबरला कादरनें सुरक्षितपणें जाऊं देण्याची हमी कबूल केल्यावर त्यांनीं वकिलातीचा त्याग केला. आपला दगलबाजीचा पराक्रम तसाच चालूं ठेवून लाल लष्करानें त्यांना पकडलें, आणि त्यांची रवानगी रुमानियाला करण्यांत आली असें म्हणतात.)

रशियन येऊन थडकले तरी तेव्हां जानोस कादर पार्लमेंट भवनमध्येंच होता, असें म्हणतात. त्यांनीं त्याला स्वतः पंतप्रधान झाल्याची घोषणा करण्यास फर्मावलें, परंतु कादरनें प्रारंभीं नकार दिला. त्यांनीं कोणतीं दडपणें उपयोगांत आणलीं, हें कळत नाहीं, परंतु शेवटीं कादर हा भेंकड आणि दगलबाज असल्याचें सिद्ध झालें. रशियन कम्युनिस्टांच्या, आमची मातृ-भूमि जिंकून घेण्याच्या व व्यापण्याच्या कृत्यांत, त्यानें मॉस्कोचें बाहुलें बनण्याचें लज्जास्पद दुष्कर्म पत्करलें होतें.

हंगेरीभर सर्वत्र रशियन फौजांनीं आगगाड्यांचीं स्टेशनें, विमानतळ, जंक्शनें, पूल, रेल्वेंचीं आवारें, ह्या आधींच ठाणें दिलेल्या जागांचा ताबा घेतला. त्यांचे छत्रीधारी सैनिक गिओरनजीक भुईवर उतरले. त्यांनीं स्झेकेस्फेहेरवार, दुनाफोल्दवार, वेस्झप्रेम, आणि सोप्रोन यांच्यावर आघात केला. हंगेरियन फौजा, स्वातंत्र्यसैनिक आणि कामगार यांनीं पेक्स येथें युरेनियमच्या खाणींचें रशियनांच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठीं शर्थीची लढाई दिली. टाटाबान्याला खाणीकामगार आणि हंगेरियन फौजा यांनीं, ज्या बाजूनें लाल लष्कराला कुमक येत होती, त्या बाजूचा आग-गाडीचा मार्ग उडवून लावला. झेकोस्लोव्हाकियामधून अधिक चिलखती दलें घुसत होतीं. हंगेरियन विमानांनीं तिस्झा नदीवरील तराफे बांधून तयार केलेल्या तरत्या पुलांवर बॉम्बफेक केली.

स्वतंत्र आकाशवाणींनीं आपलें बेदरकार आव्हान घोषित केलें, " हंगेरियन सैनिक आक्रमकांच्या विरुद्ध एकरूप होऊन लढत आहेत. प्रसंग बिकट असला तरी हताश करणारा नाहीं. दांडगाईनें देशांत शिरलेल्यांच्या विरुद्ध सर्वत्र रणकुंड धगधगलें आहे. हंगेरियन लोक हो, आपल्या प्रिय देशांत रशियन फौजांना कत्तली करूं देऊं नका ! उठा,

उचला आपलीं हत्यारें, आणि आपल्या मातृभूमीच्या संरक्षणाचें पवित्र कार्य करण्यासाठीं एकजुटीनें लढा ! सोवियट स्वारीवाल्यांचा नाश होवो !"

परंतु एक कोटी हंगेरियनांचा सोवियट रशियन दैत्याविरुद्धचा प्रत्यक्ष लष्करी संग्राम फार काळ टिकूं शकला नाहीं. नोव्हेंबर चारच्या तिसऱ्या प्रहरीं एका स्वतंत्र केंद्रावरून दुःखदायक शब्द कानीं पडले :

" जगांतील सुसंस्कृत जन हो, ऐका आणि आमच्या मदतीला या, नुसत्या घोषणांसह नव्हे, तर फौजांसह, सैनिक आणि शस्त्रास्त्रें घेऊन या. बोल्शेविझमच्या रानटी भीषण हल्ल्याला मुळीं देखील घरबंध नसतो, हें विसरूं नका. एकदां का आमचा नाश झाला कीं मग तुमचीसुद्धां पाळी येईल !

" अमुचे आत्मे रक्षा सत्वर ! रक्षा अमुचे आत्मे सत्वर !

" युरोपच्या लोकांनो, शतकानुशतकें जंगली हल्ल्याविरुद्ध सामना देण्यासाठीं आम्हीं तुम्हांला साहाय्य केलें आहे,...अरिष्टाच्या विरुद्ध इषारा देण्यासाठीं वाजत असलेल्या हंगेरियन घंटांचा नाद ऐका...जगांतील सुसंस्कृत जन हो, न्यायाची, स्वातंत्र्याची, आणि सक्रिय एकजुटीच्या नैतिक तत्त्वबंधनाची ग्वाही सांगून आम्ही तुम्हांला आमच्या मदतीस येण्याची विनवणी करीत आहोंत. आमचें गलबत बुडत आहे, प्रकाश मंदावत आहे, हंगेरीच्या भूमीवर दर तासाला सांवल्यांचा घनदाट काळोख वाढत आहे. जगांतील सुसंस्कृत लोक हो, आमचा आक्रोश ऐका, आणि कृति करा. आपला बंधुत्वाचा हात आमच्यापर्यंत येऊं द्या.

" सत्वर रक्षा अमुचे आत्मे ! अमुचे आत्मे रक्षा सत्वर !–प्रभु तुमचा पाठीराखा होवो ! "

परंतु एकापाठीं एक स्वतंत्र आकाशवाणीचे आवाज दडपून त्यांच्या जागीं रशियन लष्करी हुकमतीचे आवाज आले. रशियन शस्त्रांच्या मुसंडीच्या प्रगतीच्या खुणा आकाशवाणी केंद्रांच्या बदलत्या नियंत्रणानें

दिसूं लागल्या. नोव्हेंबर चारला स्झोम्बाथेली आकाशवाणीचा पाडाव झाला. पांच तारखेला स्वतंत्र स्झोल्नोक आकाशवाणीची अंतकाळाची घरघर ऐकायला मिळाली. पांच तारखेच्या रात्रीं पेक्स आकाशवाणीवरून सोवियट लष्करी सेनापति आपले हुकूम कळवूं लागला. गिओर आकाशवाणी सात तारखेच्या सुमारास रशियनांच्या हातीं पडली.

सात आणि आठ तारखांना स्वतंत्र राकोक्झी आकाशवाणीवरून तिचे शेवटचे वृत्तांत आणि आर्जवें ऐकायला मिळालीं :

" हंगेरींतील सगळ्या प्रामाणिक लोकांच्या नांवानें आम्हीं जगांतील सगळ्या प्रामाणिक लोकांची आळवणी करीत आहोंत.

" तुम्हांला स्वतंत्रता प्रिय आहे ना ?—आम्हांला सुद्धां आहे.

" तुम्हांला मुलेंबाळें आणि बायका आहेत ना ?—आम्हांला सुद्धां आहेत आणि आमच्याजवळ खाण्यासाठीं रोटी मागणाऱ्या आमच्या मुलांबाळांना आम्हीं काय द्यावें ? रोटीचा शेवटचा घांस घेऊन संपला आहे.

" संयुक्त राष्ट्र संघाला पुढील रक्तपात थांबवितां येणें शक्य आहे किंवा जगाच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ आम्ही लढत असतांनाच जगाची विवेकबुद्धि आणि सभ्यपणा यांच्याठायीं आमची असलेली श्रद्धा आम्ही गमावून बसणार काय ?

" हंगेरींत लढत असलेल्या सोवियट सैनिकांना उद्देशून केलेली पुढील विनंति रशियन भाषेंतून पुन्हां उच्चारण्याची आम्ही तुम्हांला विनंति करीत आहोंत :

" सैनिक हो !

" आमची स्वतंत्रता चिरडून टाकण्याची इच्छा तुम्ही कां धरतां ? तुमच्याविरुद्ध ज्यांनीं शस्त्रें उचललीं, ते कांहीं कारखान्याचे मालक नाहींत, कीं जमीनदार नाहींत किंवा बुर्ज्वाजी धनकुबेर नाहींत, परंतु जिवावर उदार होऊन हंगेरियन जनताच लढत आहे.

संयुक्त राष्ट्र संघांतून सोवियट युनियनची हकालपट्टी करण्याबद्दल, मागणी करणारीं सार्वजनिक निदर्शनें केलीं. अेल साल्वादोरमधील सान्ता अॅनांत हजारों नागरिकांनीं पेटविलेल्या मेणबत्त्यांनिशीं रस्त्यांतून मूक मोर्चे काढले. कित्येक तास शहरांतल्या घंटा निनादत होत्या. प्रार्थनामंदिराजवळ मिरवणुकीचें विसर्जन झालें आणि तेथें प्रभूची एक हृदयंगम आळवणी गाण्यांत आली. पश्चिम जर्मनींत तीन दिवसपर्यंत निशाणें खालीं उतरविण्यांत आलीं होतीं.

रोम, पॅरिस, सायगांव, मॅद्रिद, लिस्बन आणि जिनेव्हा येथें विद्यार्थ्यांनीं हंगेरीतील रशियन आक्रमणाबद्दलच्या निषेधपर घोषणाफलक हातीं धरून, रस्त्यामध्यें मोर्चे काढले. अमेरिकेंत चर्चे आणि सिनेगॉग यांच्यांतून हंगेरियन जनतेसाठीं खास प्रार्थना करण्यांत आल्या, आणि महाविद्यालयें व विश्वविद्यालयें यांच्यामधील विद्यार्थ्यांनीं निषेधपर सभा भरविल्या.

हंगेरीच्या जनतेवर चाललेल्या कम्युनिस्टांच्या पशुतुल्य दडपशाहीबद्दल जगांतील स्वतंत्र कामगार गटांनीं सर्वत्र आपली निराशा व्यक्त केली. हंगेरींतील जनतेला सहानुभूति दर्शविण्यासाठीं बेल्जम, डेन्मार्क, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, ग्रीस, इटली, कोरिया, माल्टा, नेदरलॅन्ड, पाकिस्तान, फिलिपाइन्स, थायलंड, ट्युनिशिया आणि कॅरिबियन क्षेत्रांतील बरेच देश, यांच्यामधून काम बंद ठेवण्याचे प्रकार घडले.

ब्रिटिश ट्रेड युनियन काँग्रेसनें आपल्या संलग्न कामगार संघांना "सोवियट युनियनला 'परतभेटी'साठीं जाण्याचे त्यांचे कांहीं बेत असले तर ते सोडून देण्याचा" आदेश दिला. स्वीडिश ट्रेड युनियन फेडरेशनच्या कार्यकारी मंडळानें एक ठराव करून, "लोकसत्ताक स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय स्वाधीनता यांच्यासाठीं प्राणपणानें चाललेल्या हंगेरियन राष्ट्राच्या शौर्यशाली संग्रामाला चिरडून टाकण्यासाठीं हंगेरींतील हुकूमशाहीनें रशियन शस्त्रास्त्रांच्या पाठबळावर चालविलेल्या दहशतीच्या प्रकारांचा" निषेध केला.

"सैनिक हो ! हंगेरियन राष्ट्राच्या विरुद्ध शस्त्रें चालवूं नका !"

परंतु नोव्हेंबर नऊ तारखेच्या सुमारास हंगेरियन स्वातंत्र्याच्या आवाजांतला प्राणवायु संपला. मग उरलीं केवळ स्तब्धता, रशियनांच्या आज्ञा आणि कम्युनिस्टांचीं असत्यें !

एक आठवडाभर भीषण युद्ध चालू राहिलें. आमच्या शूरवीरांनीं स्वातंत्र्य गमावण्यापेक्षां मरण पत्करलें. द्यूनापेन्तेले, गिओर, पेक्स, कोम्लो, आणि बुडापेस्ट व त्याचीं उपनगरें येथें युद्ध चाललेंच होतें.

रशियन तोफा हालचाल करणाऱ्या कशावरहि–रेड क्रॉसच्या गाड्या, शाळकरी बालकें, रोटीसाठीं लागलेल्या रांगा, खिडकींतून डोकावणारा चेहेरा, यांच्यावर गोळे टाकत असत. परंतु लाल सेना अजून देखील घाबरत होत्या. बुडापेस्टमध्यें रस्त्यांतून एखाद्या रणगाड्याला एकटें जाण्याची हिंमत होत नसे; आणि अजूनसुद्धां ते रात्रींच्या वेळीं निरुंद रस्त्यांनीं जात असत.

तोफांनीं वर घरांचा आणि इमारतींचा फडशा पाडण्याचा क्रम ठेवला होता, तेव्हां खालीं तळघरांतून दडलेली बुडापेस्टमधली मुलकी प्रजा तिष्ठत होती. स्वातंत्र्यसैनिक, हंगेरियन लष्कर आणि कामगार यांनीं आठवडाभर घनघोर प्रतिकार चालूं ठेवला. लहान लहान टोळ्यांनीं ते घरांतून आणि बोळांतून लढत होते. ते एखाद्या रणगाड्यावर किंवा तोफेवर हल्ला चढवीत आणि वेगानें भुयारी रस्त्यांनीं आणि इमारतींच्या पाठीमागून निसटून जात.

कांहीं मोठ्या इमारतींमधून आणि कामगार वर्गाच्या विभागीय कारखान्यांतून अधिक मोठ्या प्रमाणावर तुंबळ रण जुंपलें होतें. दैत्याकार प्रचंड क्सेपेल पोलाद कारखान्यांत, आणि नगराच्या उत्तरेस असलेल्या उज्पेस्टमधील कारखान्यांच्या आंत, हजारों कामगार आणि तरुण स्वातंत्र्य-सैनिक यांनीं तात्पुरत्या तटबंदी उभारून त्यांचा आडोसा घेतला होता.

बुडापेस्टमध्यें स्झ्तालिनवारोस आणि पेक्समधील औद्योगिक क्षेत्रां-प्रमाणेंच कामगार वर्गाच्या विभागांनीं अधिक काळ टिकाव धरलेला होता.

जेव्हां रशियन तोफा आमच्या लोकांची कत्तल उडवत होत्या आणि आमचीं शहरें नेस्तनाबूद करीत होत्या, तेव्हांच त्यांचीं असत्यें आमच्या आत्म्यांवर आणि सबंध जगावर तिरंदाजी करीत होतीं. कादर आणि त्याचे दगलबाज जोडीदार आपल्या रशियन धन्यांच्या आज्ञा मुकाट्यानें पाळत होते. त्यांचीं आकाशवाणीवरील भाषणें आणि वृत्तपत्रें असें असत्य पसरवीत होतीं, कीं आमचें स्वातंत्र्याचें क्रांतियुद्ध,–मूठभर माथेफिरू, आणि देशद्रोही व रशियन हस्तक यांचा अपवाद सोडून दिल्यास–सबंध हंगेरियन राष्ट्राचा क्रांतीचा उठाव, हा फॅसिस्ट, प्रतिक्रांतिकारक, पाश्चिमात्य राष्ट्रांचे हस्तक, आणि नाझी यांचा एक कट आहे.

आणि त्यांनीं असेंहि एक असत्य प्रसारित केलें कीं कादर आणि त्याचे डझनभर रशियन बाहुले हेच 'हंगेरीचें सरकार' होत.

कुणाहि हंगेरियनाचा त्यांच्या या एकाहि असत्यावर विश्वास बसलेला नाहीं. ते जगाला तरी त्या असत्यांवर विश्वास ठेवायला भाग पाडणार आहेत काय?

हंगेरी स्वतंत्र होईलच!

नोव्हेंबर दहा तारखेच्या सुमारास मोठ्या प्रमाणावर चाललेली लढाई संपली. जोराच्या प्रतिकारांचीं कांहीं ठाणीं आणखी कित्येक दिवस नेट धरून टिकलेलीं होतीं. गनिमी काव्याच्या पक्षीय कृती चालल्याच आहेत आणि तेव्हांपासून चालतच आहेत.

हंगेरियन लोक शरण गेले नाहींत. आपल्या स्वातंत्र्याच्या क्रांति-युद्धांत त्यांना संपूर्णतया पराजय खावा लागला नाहीं. तेथें कांहीं प्रतिक्रांति घडून आलेली नाहीं. जें काय घडून आलें तें हें,–एका परकी साम्राज्यवादी

आक्रमकानें–सोवियट युनियननें–प्रचंड लष्करी सामर्थ्यानिशीं आमच्या राष्ट्रावर स्वारी केली. एका आठवड्याच्या तुंबळ संग्रामानंतर त्यानें रणांगणावर लष्करी विजय संपादन केला. लष्करानें व्यापलेल्या हंगेरीवर तो कांहीं कालापुरती सत्ता गाजवीत आहे. एका शिखंडी सरकारच्या,–सबंध राष्ट्रानें ठकबाजी म्हणून ज्याचा धिक्कार केला त्या कादर सरकारच्या–आडोशाचा तो उपयोग करीत आहे.

हंगेरी एकटाच होता. संयुक्त राष्ट्र संघ आणि स्वतंत्र जगांतील सरकारें यांनीं हंगेरीच्या आर्जवांना जबाब दिला नव्हता. आक्रमकांच्या विरुद्ध कुमक मिळाल्याशिवाय भरभक्कम उघड लष्करी झुंज देणें हंगेरियनांना अशक्य झालें होतें. स्वतंत्र जगांत आश्रय मिळविणें हाच काय तो एकमेव मार्ग सहस्रावधि लोकांना उरलेला होता.

तरी देखील स्वतंत्र जगांतील सरकारें ज्या वेळीं संभाव्य उपाययोजनांबद्दल वादविवाद घालीत होतीं, त्या वेळीं स्वतंत्र जगांतली जनता हंगेरियन स्वातंत्र्याच्या क्रांतियुद्धाला चिरडून टाकण्यासाठीं, कम्युनिस्टांचे रणगाडे आणि फौजा यांच्या करण्यांत आलेल्या पशुतुल्य उपयोगाविरुद्ध भीति आणि संताप यांच्यामुळें खवळून गेली. कामगार आणि विद्यार्थी दडपशाहीला बळी पडलेल्या हंगेरियन देशभक्तांना सहानुभूति दर्शविण्यासाठीं निदर्शनपर मोर्चे काढूं लागले किंवा हुतात्म्यांच्या सन्मानार्थ शांत-मौन उभे राहिले. स्वतंत्र जगामधील सोवियट वकिलातींच्यावर दगडफेक झाली. कम्युनिस्ट प्रकाशनगृहांना आगी लावण्यांत आल्या. बऱ्याच शहरांत निशाणें अर्धीं खालीं उतरण्यांत आलीं.

रशियन वर्चस्वापासून हंगेरीला मुक्त करण्यासाठीं ज्यांनीं आपले प्राण अर्पण केले, त्यांचें सुतक पाळण्यासाठीं लंडनमध्यें मोर्चातील जमावांनीं हातांवर काळे पट्टे बांधले. चर्चचा घंटानाद होत असतांना पांच मिनिटें डेन्मार्कमधील सबंध प्रजा मौन उभी राहिली. बोगोटांत कोलंबियांतील हंगेरियन नागरिकांनीं आपल्या मायदेशांतल्या पोषाखांत एक मोर्चा काढून, हंगेरीमधल्या लाल लष्कराच्या फौजा माघारीं नेण्याबद्दल आणि

संयुक्त राष्ट्र संघांतून सोवियट युनियनची हकालपट्टी करण्याबद्दल, मागणी करणारीं सार्वजनिक निदर्शनें केलीं. अेल साल्वादोरमधील सान्ता अॅनांत हजारों नागरिकांनीं पेटविलेल्या मेणबत्त्यांनिशीं रस्त्यांतून मूक मोर्चे काढले. कित्येक तास शहरांतल्या घंटा निनादत होत्या. प्रार्थनामंदिराजवळ मिरवणुकीचें विसर्जन झालें आणि तेथें प्रभूची एक हृदयंगम आळवणी गाण्यांत आली. पश्चिम जर्मनींत तीन दिवसपर्यंत निशाणें खालीं उतरविण्यांत आलीं होतीं.

रोम, पॅरिस, सायगांव, मॅद्रिद, लिस्बन आणि जिनेव्हा येथें विद्यार्थ्यांनीं हंगेरीतील रशियन आक्रमणाबद्दलच्या निषेधपर घोषणाफलक हातीं धरून, रस्त्यामध्यें मोर्चे काढले. अमेरिकेंत चर्च आणि सिनेगॉग यांच्यांतून हंगेरियन जनतेसाठीं खास प्रार्थना करण्यांत आल्या, आणि महाविद्यालयें व विश्वविद्यालयें यांच्यामधील विद्यार्थ्यांनीं निषेधपर सभा भरविल्या.

हंगेरीच्या जनतेवर चाललेल्या कम्युनिस्टांच्या पशुतुल्य दडपशाहीबद्दल जगांतील स्वतंत्र कामगार गटांनीं सर्वत्र आपली निराशा व्यक्त केली. हंगेरीतील जनतेला सहानुभूति दर्शविण्यासाठीं बेल्जम, डेन्मार्क, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, ग्रीस, इटली, कोरिया, माल्टा, नेदरलॅन्ड, पाकिस्तान, फिलिपाइन्स, थायलंड, ट्युनिशिया आणि कॅरिबियन क्षेत्रांतील बरेच देश, यांच्यामधून काम बंद ठेवण्याचे प्रकार घडले.

ब्रिटिश ट्रेड युनियन काँग्रेसनें आपल्या संलग्न कामगार संघांना "सोवियट युनियनला 'परतभेटी'साठीं जाण्याचे त्यांचे कांहीं बेत असले तर ते सोडून देण्याचा" आदेश दिला. स्वीडिश ट्रेड युनियन फेडरेशनच्या कार्यकारी मंडळानें एक ठराव करून, "लोकसत्ताक स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय स्वाधीनता यांच्यासाठीं प्राणपणानें चाललेल्या हंगेरियन राष्ट्राच्या शौर्यशाली संग्रामाला चिरडून टाकण्यासाठीं हंगेरीतील हुकूमशाहीनें रशियन शस्त्रास्त्रांच्या पाठबळावर चालविलेल्या दहशतीच्या प्रकारांचा" निषेध केला.

स्वतंत्र हंगेरीचा पक्ष हा आपलाच स्वतःचा असें मानण्याचा निर्धार आपण केल्याचें स्वतंत्र मानवांनीं सर्वत्र व्यक्त केलें आहे.

मध्यंतरीं स्वातंत्र्याची क्रांति आपल्या जखमा चाटीत आहे आणि आपलें सामर्थ्य एकवटीत आहे. संग्राम चाललेलाच आहे, परंतु मार्ग भिन्न आहेत. सविनय कायदेभंग, संप, दडपण आणण्याचे प्रकार, बेगुमान अवज्ञा, बहिष्कार, प्रभूची प्रार्थना या मार्गांनीं शेतमजूर आणि कामगार, कारकून आणि विद्यार्थी आणि साहित्यिक, बालकें आणि माता, आणि म्हातारेकोतारे सबंध हंगेरी राष्ट्रच संग्राम चालवीत आहे.

विजय तहेकूब झालेला आहे, गमावलेला नाहीं !

हंगेरी आपलें स्वातंत्र्य जिंकून घेणारच ! त्याला रोखून धरण्यासाठीं पुरेसें सामर्थ्य या धरतीवर कुठेंहि नाहीं !

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई
क्रमांक ८५००० कि: निर्बंध
दिनांक २०५५ दि. २६/३/०१

• कथा
• कादंबऱ्या
• आचार्य अत्रे वाङ्मय

आणि • नाटकें

यां साठीं

ग. पां. परचुरे

प्रकाशन मन्दिर

गोरेगांवकर चाळ क्र. २, मुंबई ४